खा॰वा

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा॰वा
दा. क्र. २९९६

IRBK-0102996
IRBK-0102996

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 OCT 1975

4 OCT 1977

मनोहर ग्रंथमाला प्रकाशन ५२ वें

# मा थेन थेन

स्त्री–जीवनाच्या विविध पैलूंचें
दर्शन घडविणाऱ्या नऊ कथा

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

जानेवारी
१९४९

★

IRBK-0102996

# अनुक्रमणिका


| कथा | | | पान |
|---|---|---|---|
| १ पतित | ... | ... | १ |
| २ पोपटाचा पिंजरा | ... | ... | १७ |
| ३ मुलींचें लग्न | ... | ... | ४१ |
| ४ बौदी | ... | ... | ५९ |
| ५ लगट | ... | ... | ७६ |
| ६ नागनाथ | ... | ... | ८८ |
| ७ मा येन येन | ... | ... | ९९ |
| ८ संस्कार | ... | ... | १२८ |
| ९ कुस्करलेलं फूल | ... | ... | १४६ |



प्रकाशक :—मनोहर महादेव केळकर,
मनोहर ग्रंथमाला, १९६।८५ सदाशिव, पुणें २.
मुद्रक :—नरहर विश्वनाथ सरदेशपांडे,
आदर्श मुद्रणालय, ३९५।५ सदाशिव, पुणें २.


## पतित : : १

गाडी वेगानं चालली होती. थंडीचे दिवस होते आणि मध्यरात्रीचा सुमार होता. गाडींत पुष्कळ लांबचा प्रवास करायचा असला आणि थंडीचे दिवस असले म्हणजे साहजिकच तोंडावरून पांघरूण गुरफटून घेऊन गुंगत पडावंसं वाटूं लागतं. दिल्लीहून रात्रीं नवाला निघणाऱ्या पेशावर एक्स्प्रेसमध्यें सारेच लांबच्या प्रवासाचे उतारू असल्यानें त्यांना लौकर आपलं स्टेशन येईल या भीतीनं जागत बसण्याचं प्रयोजन नव्हतं. डब्यांत बेसुमार गर्दी होती आणि ज्याला जिथं जागा मिळेल तिथं अंग दुमडून जो तो डुलक्या घेत होता. डब्यांत बहुतेक प्रवासी पंजाबचे शरणार्थी होते. त्यांत म्हातारे, तरुण, बायका आणि मुलं सर्वच प्रकारचे लोक होते. थंडीचा इतका कडाका असूनही त्यांपैकीं कित्येकांच्या अंगावर पुरेशीं कापडंदेखील नव्हतीं, तर कित्येकांच्या अंगावर मौल्यवान् कापडं विलसत होतीं. एकाच प्रांतांतून आणि परिस्थितींतून बाहेर पडणाऱ्या लोकांतदेखील ही विषमता पाहून आश्चर्य वाटल्यावांचून राहिलं नसतं ! दिल्लीहून गाडी सुटल्यानंतर किती तरी वेळ ते लोक घेतलेल्या प्रसंगांच्या हकीकती सांगत होते. दगडालादेखील पाझर फुटला असता तें सारं ऐकून ! वर्तमान-

पत्रांतून हकीकती वाचणं आणि प्रत्यक्ष तोंडून ऐकणं यांत फार फरक असतो. त्यांत कित्येक आई हरवलेलीं मुलं होतीं तर पति हरवलेल्या स्त्रिया होत्या. एक वृद्धा आपल्या तरण्याताठ्या एकुलत्या एक मुलाच्या रक्तानं डागळलेलं वस्त्र दाखवून त्या हत्याकांडाचं वर्णन करून सांगत होती, तर दुसरा एक तरुण आपल्या डोळ्यांदेखत आपल्या तरुण स्त्रीचं ‘ स्त्रीत्व ’ कसं नष्ट करण्यांत आलं हें दाढीचे केस ओरबाडून सांगत होता. लक्षावधि रुपयांची मालमत्ता नष्ट झालेला एक व्यापारी शून्य दृष्टीनें छताकडे पाहत बसला होता, तर मोठ्या थोरल्या जमीनदारीला मुकलेला दुसरा एक भकास दृष्टीनें खिडकीच्या बाहेर पाहत होता. साऱ्या डब्यांत अवकळेचं साम्राज्य पसरलं होतं! दैव नेईल तिकडे जाण्याकरितां ते सारे प्रवासी गाडीच्या त्या डब्यांत भविष्याविषयींच्या पूर्ण अंधकारांत बसले होते! कित्येक दिवस काळजीनं पापणीला पापणी न लागल्यानं तात्पुरत्या सुटकेच्या समाधानानं त्यांच्या डोळ्यांवर झोंपेची गुंगी आली होती आणि ते आतां पेंगूं लागले होते. त्यांच्या त्या हृदयद्रावक गोष्टी ऐकतां ऐकतां दाराजवळच्याच बाका-वर अंगाभोंवतीं ओव्हरकोट गुरफटून तो देखील पेंगूं लागला.

आणि इतक्यांत कसल्याशा आवाजानें तो एकदम जागा झाला. गार वाऱ्याचा झोत त्याच्या तोंडावर आला आणि तो डोळे उघडून पाहूं लागला. डब्यांतले सारे लोक झोंपलेले त्याला दिसत होते, पण डब्याचं दार उघडलेलं होतं आणि एक तरुण मुलगी दारांत उभी होती. दिल्लीपासून सात तासांच्या प्रवासांत त्यानें तिला पाहिलेलं नव्हतं, पण या वेळीं तिच्यावर दृष्टि जातांच त्याला आपली दृष्टि दिपल्यासारखं वाटलं आणि तो नीट सांवरून बसला. तिचं त्याच्याकडे लक्ष गेलं नसावं. तिनं उघडलेल्या दारांतून बाहेरच्या काळ्याकुट्ट अंधाराकडे पाहून घेतलं आणि येणाऱ्या वाऱ्यानं तोंडावर भुरुभुरु उडणारे केंस सांवरण्याचा वृथा प्रयत्न केला. नंतर आपला सैल सदरा

तिनें सर्व बाजूंनीं सलवारींत खोंचून घेतला आणि अंगावरील झिर-झिरीत ओढणी अंगाभोंवतीं घट्ट आवळून लपेटून घेतली. एक वेळ तिनें डब्यांत सगळीकडे नजर फिरवून सर्व लोक झोंपल्याची खात्री करून घेतली आणि दारावर हात ठेवून ती उभी राहिली. ती बाहेर उडी घेण्याच्या तयारींत उभी राहिली आहे हें त्याच्या ध्यानांत यायला वेळ लागला नाहीं. आतां ती झेंप घेणार इतक्यांत त्यानें आपला हात आडवा केला आणि तिचा जाणारा तोल हातावर झेलून धरला. दुसऱ्या हातानं तिचा बखोटा धरून त्यानें तिला खसकन् मागें ओढलं आणि पाठीच्या धक्क्यानं दार लोटून बंद केलं. बंद केलेल्या



"तुम्ही मॉडेल म्हणून माझा कां नाहीं उपयोग करीत ?" [पान ११]

दाराला तसाच टेंकून उभा राहून तो तिच्याकडे पाहूं लागला. कांहीं वेळ ती खालीं नजर वळवून उभी होती. नंतर तिनें वर तोंड करून त्याच्याकडे पाहिलं. तिच्या डोळ्यांत अश्रु उभे होते आणि 'मला कशाला रोकलंत !' हें विचारण्याचा भाव तिच्या तोंडावर दिसत होता.

केवळ हातभराच्या अंतरावर तो तिच्यापासून दूर उभा होता. केवढी भयंकर घटना होणार होती, पण तीसंबंधीं दोघेंही अगदीं गप होतीं. ती निःशब्द उभी होती तरी तिचं अंग-प्रत्यंग कसला तरी दारुण इतिहास मोठ्यानं ओरडून सांगत आहे असं त्याला वाटलं! ज्या अर्थीं सर्वांचा डोळा चुकवून ती उडी घेण्याच्या प्रयत्नांत होती त्या अर्थीं या प्रकारासंबंधीं कांहीं बोलायचं नाहीं असं त्यानंही ठरवलं. मधूनमधून जाणाऱ्या लहानसहान स्टेशनांकडे खिडकींतून डोकावून पाहत तो पुन्हा पुन्हा घड्याळाकडे पाहत तसाच उभा होता. अशाच स्थितींत पस्तीस मिनिटं निघून गेलीं आणि तीं दोघं निःशब्द जेथल्या तेथें उभीं राहिलीं. मधूनच प्रवाशांपैकीं एखाद्याला खोकल्याची उबळ येऊन तो उठून बसे किंवा झोंपीं गेलेलं मूल जागं होऊन रडूं लागल्यानं त्याला पुन्हा झोंपवण्याच्या प्रयत्नांत त्याची आई जागी होऊन इकडे तिकडे पाहूं लागे. या लोकांच्या दृष्टीला तीं दोघेंही उभीं असलेलीं पाहून नवल वाटण्याचं कारण नव्हतं; कारण रेल्वेच्या डब्यांत एकमेकांशेजारीं उभ्या असलेल्या प्रवाशांबद्दल कुणाला काय वाटणार!

गाडी थांबली. आपलं स्टेशन आल्याचं पाहून तो चट्कन् दारापासून दूर झाला. वरच्या बाजूला ठेवलेली आपली सूटकेस काढून त्यानें दार उघडलं आणि तिच्याकडे पाहिलं. ती अजूनही तशीच उभी होती. डोळ्याच्या इशाऱ्यानें त्यानें तिला खालीं उतरण्यास सुचवलें. ती तशीच उभी होती, पण एकाग्रतेनं त्याचा चेहरा न्याहाळीत होती. कांहीं क्षणांनंतर त्यानं पुन्हा डोळ्यांनीं सुचवलं आणि लगेच दुसऱ्या हातानं तिचा हात धरून तो तिला दाराकडे नेऊं लागला. कसलाही प्रतिकार न करतां शांतपणानें त्याच्या हाताचा आधार घेऊन ती डब्याखालीं उतरली आणि स्टेशनच्या बाहेर पडेपर्यंत ती तसाच त्याचा हात धरून चालत होती. इतकं झालं तरी दोघें अगदीं निःशब्द होतीं. जसं कांहीं काय बोलावं तें दोघांनाही

सुचत नसावं ! त्यानें टांगा ठरवला आणि ती मुकाट्यानें टांग्यांत चढून बसली. आतां फटफटीत उजाडलं होतं. टांगा त्याच्या दाराशीं जाऊन उभा राहिला. टांग्याचा आवाज ऐकून त्याची पत्नी दारांत येऊन उभी राहिली होती. पतीच्या पाठोपाठ एक गुलाबी आभा बाहेर पडल्याचं पाहून तिला आश्चर्य वाटलं. गुलाब उधळत येणाऱ्या उषेलाच तर आज आपण प्रत्यक्ष स्त्रीवेषांत पाहत नाहींना असं तिला वाटलं असावं ! जवळ येतांच पतीकडे पाहून डोळ्याच्या खुणेनं तिनें ही कोण म्हणून विचारलं आणि चट्कन् तो उत्तरला—'पंजाब शरणार्थी !' लगेच तिच्याकडे वळून पत्नीला अनुलक्षून हिंदींत तो म्हणाला, 'श्रीमतीजी !'

अगदींच औपचारिक ओळख होती ती ! याहून अधिक ओळख करून देतां येणं त्याला शक्य नव्हतं ! तिची कशी व्यवस्था करावी हा त्याच्यापुढें मोठा प्रश्नच होता. आणि ती तर एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणें वागत होती. कोणी सुचवील–सांगेल तसं करायचं— जसं कांहीं तिला स्वतःचं मन नव्हतंच मुळीं ! तिच्याजवळ तिचं स्वतःचं असं कांहींच सामान नव्हतं; त्यामुळं प्रवासांतले कपडे बदलायची तरी काय व्यवस्था करावी हा त्याच्यामुढें मोठा प्रश्नच होता. पण या बाबतींत त्याच्या बायकोची त्याला फार मदत झाली. ती तिला हाताला धरून आपल्या खोलींत घेऊन गेली आणि तिनें तिची सर्व व्यवस्था लावून दिली.

अर्ध्या तासानं तो आपलं स्नान वगैरे आटोपून फराळाकरितां मधल्या घरांत आला तेव्हां त्यानं पाहिलं—ती त्याच्या पत्नीशीं बोलत बसली होती. उत्तर हिंदुस्थानांतच राहत असल्यानें त्याच्या पत्नीला हिंदी चांगलंच बोलतां येत होतं, आणि त्यामुळं तिच्याशीं बोलण्यांत तिला अडचण पडली नाहीं. एकदम बदललेल्या वेशभूषेमुळं हीच का ती असा त्याला प्रश्न पडला. कारण अजूनपर्यंत त्यानें तिला नीट

पाहिलं नव्हतं! नीट निरखून पाहिल्यावर त्याला एकदम आश्चर्य वाटलं! किती सुंदर! जसं कांहीं टवटवीत मोगरीचं फूल! आणि इतका वेळ ही सुंदरी आपल्याबरोबर असतांना आपल्यासारख्या कलावंताच्या दृष्टीला तिचं हें विरळ सौंदर्य दिसूं नये याचं त्याला आश्चर्य वाटलं; पण त्याचबरोबर ज्या परिस्थितींत ती भेटली त्या वेळची आठवण होतांच अशा मनःस्थितींत तिच्या सौंदर्याचा विचार मनांत तरी कसा येणार हेंही त्याला कळून आलं!

चहा-फराळ मुकाट्यानंच झाला. समोर फराळाचं ठेवलं असूनही ती विमनस्क स्थितींत शून्य दृष्टीनें कुठेंतरी पाहत होती. तिची ही स्थिति ओळखून मृदु स्वरांत त्यानें म्हटलं, 'खाईये.'

तिनें वर दृष्टि करून त्याच्या डोळ्यांकडे पाहिलं. 'मला नको,' असा भाव तिच्या डोळ्यांत उमटलेला पाहून तो चट्कन् म्हणाला, 'ज्यादा सोचिये नहीं. आप नहीं खायेंगी तो मुझेभी भूखाही रहना पडेगा!'

विमनस्कतेनं ती किंचित् हंसली. जसं कांहीं पांढऱ्या ढगांच्या आडून पडलेलं फिक्कट चांदणं! मग तिनें शंकरपाळ्याचा तुकडा तोडून तोंडांत टाकला आणि चहाचा घोंट घेतला.

फराळ आटोपल्यावर त्यानें तिला आपल्या बसायच्या खोलींत नेलं. खोलींत त्यानं काढलेलीं कांहीं चित्रं टांगलेलीं होतीं. त्यांच्याकडे नजर जातांच ती प्रत्येक चित्रापुढं उभी राहून न्याहाळून पाहूं लागली. पाहतां पाहतांच मागें मान वळवून तिनें विचारलं, 'किसके बनाये हैं ये?'

'मैनेही बनाये हैं' तो उत्तरला.

'ओहो! तो आप आर्टिस्ट हैं!' असं म्हणून ती चित्रांऐवजीं त्याच्याकडेच निरखून पाहूं लागली. काय बोलावं तें न सुचून तो खालीं पाहूं लागला. पुन्हा कांहीं वेळ कोणी कांहींच बोललं नाहीं.

समोरच्च एका खुर्चीवर तळहातावर हनुवटी टेंकून ती जमिनीकडे पाहत स्वस्थ बसून होती. ती शांतता त्याला असहनीय झाली आणि शेवटीं त्यानें हिंदींतच तिच्याशीं बोलायला सुरवात केली :

'तुम्ही गाडींतून उडी कां घेत होतां?'

'जीव देण्यासाठीं!'

'पण जीव तरी कां देत होतां?'

'जगण्यासारखं कांहीं उरलं नव्हतं म्हणून!'

तिच्या या उत्तरानं तो कुंठित झाला. याच वेळीं त्यानें तिच्या डोळ्यांकडे पाहिलं. ते भरून आले होते. कडेला पाण्याचे थेंब सांचलेलीं जशीं कांहीं दोन कमळं! विनाकारण हा विषय काढून आपण तिच्या दुःखाला चाळवलं असं वाटून तो म्हणाला, 'क्षमा करा, हा विषय काढून मी उगाच तुमच्या मनाला दुखवलं—'

पालथ्या बोटानं आलेले अश्रु पुशीत ती म्हणाली, "विषय काढल्यानंच माझं दुःख जागं होईल इतकं तें झोंपलेलं नाहीं आणि खरं सांगूं का, मला या वेळीं तरी रडूं कसं येत आहे याचंच आश्चर्य वाटतं! कारण गेल्या वीस दिवसांत माझ्यावर एवढालीं संकटं आलीं पण मला रडूं आलं नाहीं आणि आज कारण नसतांना..." तिला एकदम हुंदका आला आणि ती रडूं लागली. दोन्ही हातांच्या ओंजळींत तिनें आपलं तोंड लपवलं, त्यामुळं हुंदक्यांनीं थरथरणारं तिचं तें वांकलेलं सुडौल शरीर पाण्यांत अर्धवट बुडालेल्या एखाद्या गोल पदार्थासारखं हेंदकाळत होतं. तिची ती विकलांग अवस्था पाहून त्याच्या पोटांत तुटलं आणि तिला पोटाशीं धरून तिचं सांत्वन करावं असं त्याच्या मायाळू मनाला वाटलं! पण ती स्त्री होती आणि त्यांतूनही तरुण स्त्री होती—त्याचे जन्मजात संस्कार त्याला तसं करूं देईनात! तो मुकाट्यानं तसाच बसून राहिला. पण त्याच वेळीं त्याची

पत्नी तिथं आली आणि तिनें तिची ती अवस्था पाहून चट्कन् मायेनें तिच्या पाठीवर हात ठेवला. मायेच्या त्या स्पर्शानं तिला आणखी उमाळा आला आणि त्याच्या पत्नीच्या गळ्यांत हात टाकून ती पंजाबी तरुणी ओक्साबोक्शीं रडूं लागली.

थोडा वेळ कोणी कांहींच बोललं नाहीं. हळूहळू पाठीवर हात फिरवीत त्याची पत्नी आपल्या पदरानें तिचे डोळे पुशीत होती. याचा परिणाम होऊन हळूहळू तिचं रडणं थांबलं आणि खालीं पाहत ती गप्प बसून राहिली. एवढ्या वेळच्या रडण्यानंच तिच्या चेहऱ्यांत केवढा तरी बदल घडून आलेला त्याला दिसला. जसं कांहीं पाणी शिंपडलेलं बासं फूल !

त्या शांततेचा तिलाच कंटाळा आला असावा. हलक्या स्वरांत ती म्हणाली, ' खरंच, किती हलकं वाटूं लागलंय् मला ! संकटांच्या कढईत तळून निघाल्यावर असल्या मायेची ऊब पुन्हा लाभेल याची मला कल्पना देखील नव्हती. किती चांगलीं माणसं आहांत तुम्ही !' जवळच उभ्या असलेल्या त्याच्या पत्नीचा हात दोन्ही हातांत धरून तिनें हळूच दाबला आणि तसाच वर उचलून आपल्या डाव्या गालावर दाबून धरला. कांहीं क्षण तसेच जाऊं देऊन त्याच्या पत्नीनें तिला हाताला धरून उठवीत म्हटलें—" चल, आपण आंत जाऊं स्वयंपाक-घराकडे." आणि त्या दोघी निघून गेल्या.

अशांतच आठदहा दिवस निघून गेले. त्या चित्रकारानें आपल्या घरांत एका तरुण पंजाबी स्त्रीला आश्रय दिल्याची बातमी गांवांत ज्याच्या त्याच्या तोंडीं सुरू झाली. नानाप्रकारचे तर्कवितर्क सुरू झाले. ज्याला जें वाटेल तें तो बोलूं लागला. विशेषतः तिची दुसरीकडे सोय लावण्याऐवजीं तिला घरांतच ठेवून घेण्याचा अर्थ काय, असं लोक आपसांत बोलूं लागले. आजपर्यंत एक उच्च दर्जाचा कलावंत म्हणून समाजांत त्याला मान होता. त्याच्याशीं परिचय करून घेण्यांत लोकांना

धन्यता वाटत असे. त्याच्या कलेची लोक मुक्तकंठानें स्तुति करीत. पण या घटनेनें लोकांची दृष्टि बदलली. खरा प्रकार काय आहे याची धड चौकशी देखील न करतां तो एक बदफैली बदमाष आहे अशा अफवा पसरविण्यास सुरवात झाली. तो जातिवंत चित्रकार नसून तसा आव आणणारा सामान्य चितारी आहे असं म्हणण्यापर्यंत लोकांची मजल येऊन ठेपली. एकानें तर उघड उघड त्याला प्रश्न विचारला, ' का हो, कलावंताच्या खासगी जीवनाकडे ढुंकून पाहण्याचं प्रयोजन नाहीं अशा मताचा मी आहें. तुमचं या बाबतींत काय मत आहे ? '

बिचारा कलावंत ! तो या प्रकारानं गांगरून गेला. मनांत कुठल्याही प्रकारची विकृत भावना नसतांना लोकांनीं मात्र घाणेरडे तर्क-वितर्क करावेत याचं त्याला आश्चर्य वाटलं ! तशांतच एक दिवस त्याच्या पत्नीनेंही नेमका तोच विषय काढला. कपाळ आंठ्याळून ती म्हणाली, ' हें असं किती दिवस चालायचं ? '

समजलं असूनही त्यानें विचारलं, ' काय ? '

' ही बया आपल्या घरांत किती दिवस राहणार ? '

' कां, ओझं वाटायला लागलं तुला तिचं ? '

' ओझ्याचा काय प्रश्न ! पण जातीची ना पातीची ! आपला संबंध काय तिच्याशीं ! संकटांत तिला मदत केली याचा अर्थ जन्मभर तिची जबाबदारी शिरावर घ्यायची असा तर होत नाहींना ! '

आपल्या घरांत कोणत्या प्रकारचं वातावरण उत्पन्न झालं आहे याची त्याला या उद्गारांवरून चांगलीच कल्पना आली. या प्रश्नाचा कसा निकाल लावावा तें त्याला कळेना. पत्नीच्या समाधानाकरितां तो म्हणाला, ' जन्मभर जबाबदारी कोण कुणाची पत्करतंय् ! पण तिची कांहीं सोय लागल्याशिवाय तिला जा तरी कसं म्हणायचं ! आणि ती राहिली तरी असा काय मोठासा भार पडतोय् तिचा ! '

'भाराचा प्रश्न नसला तरी इतर प्रश्न आहेतना! आज तुमच्याविषयीं लोक काय बोलतात याचा कांहीं विचार!'

'लोक बोलतात तें खरं आहे का? तुला त्यांचं म्हणणं खरं वाटतं का? तुला स्वतःला तसं कांहीं दिसून आलं का?'

'ते सारं खोटं असलं तरी मला ती या घरांत नको. वाटल्यास तुम्ही तिची सोय तुमच्या स्टूडियोच्या जागेंत करा. लोकांनीं तुम्हांला विनाकारण का होईना पण नांवं ठेवलेलीं मला सहन होत नाहींत. मी अगदीं निक्षून सांगतें हें!'

असं म्हणून ती फणकाऱ्यानें निघून गेली. पत्नीच्या या आकस्मिक हल्लयानें तो अगदींच हतबुद्ध झाला. जी गोष्ट मुळांतच नाहीं तिचा बाऊ करून पत्नीनें देखील आपल्यावर उलटावं याचं त्याला फार दुःख वाटलं! आपल्याच घरांत आपल्या मनाप्रमाणें वागण्याकरिता दुसऱ्याची संमति हवी! काय करावं तें त्याला सुचेना. तिची दुसरीकडे व्यवस्था करणं म्हणजे तिच्या पूर्वीच्याच स्थितींत तिला लोटणं—ज्या स्थितीला कंटाळून ती आत्मघात करायला तयार झाली होती! मग तिला आपण त्या वेळीं तरी कां वांचवलं!

याच वेळीं ती खोलींत आली. त्यानं कालच पूर्ण केलेलं चित्र तिच्या हातांत होतं आणि तिचा चेहरा आनंदानं उमललेला होता. येतांक्षणींच ती बोलूं लागली, 'अहाहा! किती सुंदर! खरंच, किती छान चित्रं काढतां तुम्ही!' शब्दांपेक्षां देखील किती तरी अधिक पटीनं तिचे डोळे तें चित्र पाहून वाटणाऱ्या आनंदाचा भाव प्रकट करीत होते. ते शब्द आणि तो भाव पाहून त्याला देखील अननुभूत आनंद वाटला. आजपर्यंत त्याच्या कित्येक चित्रांना प्रदर्शनांतून बक्षिसं मिळालीं होतीं आणि लोकांनीं देखील मुक्तकंठानं स्तुति केली होती. पण त्या गोष्टींत व्यावहारिकता होती. आज मात्र आपलं चित्र पाहून

०१८८
५४७८

एका जिवाला मनापासून खरा खरा आनंद होत असलेला तो पाहत होता. अशाच प्रकारचे उद्गार आपल्या पत्नीच्या तोंडून ऐकण्याकरितां तो किती तरी उत्सुक होता, पण ते तिनें कधींच काढले नव्हते. चित्र पूर्ण झालं म्हणजे तो तें पत्नीला दाखवी. तो दाखवी म्हणून ती पाही आणि थोड्या वेळानं बाजूला ठेवून देई. चित्रांत तिला कांहीं कळत नसेल, पण कांहीं विचारण्याचीदेखील तिनें उत्सुकता दाखविली नाहीं. तिच्या या उदासीन वृत्तीमुळें अलीकडे तो तिला चित्रं दाखवीनासा झाला आणि तीदेखील कधीं चौकशी करीत नव्हती. तिला त्याच्या चित्रांबद्दल कांहींच वाटत नसलं तरी चित्रकार म्हणून त्याला जो नांवलौकिक, दर्जा आणि पैसा प्राप्त होत होता तो तिला हवा होता. आपल्या पतीच्या कीर्तीबद्दल तिला अभिमान वाटत असे. पण तिचा स्वभाव आणि वृत्ति त्याच्याशीं मुळींच जुळणारी नव्हती. यामुळें तो मनांतून नेहमींच कष्टी असे. ज्या शब्दांकरितां आणि भावाकरितां तो भुकेला होता ते शब्द आज एका सर्वस्वीं परक्या व्यक्तीकडून त्याला ऐकायला मिळत होते. त्याचं हृदय आनंदानं भरून आलं. काय बोलावं तें न सुचल्यानं तो तिच्या हंसऱ्या चेहऱ्याकडे पाहत राहिला. किंचित् जवळ येत ती म्हणाली, 'पण एक सांगूं का, या चित्रांत तुम्हीं मॉडेल म्हणून ज्या बाईचा उपयोग करून घेतला आहे ती तितकीशी सुंदर नाहीं वाटत मला! तिचा चेहरा संस्कृत काव्यांतील नायिकेच्या रूपवर्णनाइतका सुंदर असेल कदाचित्, पण नुसता सुंदर चेहरा असलेल्या व्यक्तीची गणना सुंदर माणसांत कशी होऊं शकेल! त्याकरितां शरीरसौष्ठव देखील नको का?'

'खरं आहे तुमचं म्हणणं!'

'मला वाटतं या बाबतींत तुमच्या त्या मॉडेलपेक्षां मी खचित अधिक सुंदर आहे. तुम्ही मॉडेल म्हणून माझा कां नाहीं उपयोग करून घेत?'

२०,२८० का.वा. २४९० २०२५

'तुम्ही...तुमचा?'

'कां, कांहीं हरकत आहे?'

'तसं नव्हे! माझ्या देखील मनांत एक असा पुसटसा विचार आला होता, पण कदाचित् यांत तुम्ही आपला अपमान समजाल म्हणून विचारण्याचा धीर नाहीं झाला मला!'

ती एकदम हंसूं लागली. 'तुम्ही किती सरळ आणि चांगले आहांत' असंच तिचं तें हास्य दाखवीत होतं. नंतर ती म्हणाली, 'मग कधीं? आजच करान् सुरवात! चलूं मी तुमच्याबरोबर स्टूडियोंत?'

'अवश्य!' असं म्हणून तो कपडे करूं लागला. मध्येंच थांबून तो म्हणाला, 'एक प्रश्न विचारूं का? त्या दिवशीं गाडींत किंवा नंतरही तुम्ही माझ्यासारख्या पुरुषावर सर्वस्वीं विश्वास टाकण्यास कशा तयार झालांत? तुम्हांला माझी भीति नाहीं वाटली?'

त्याचा तो प्रश्न ऐकून ती थोडा वेळ स्वस्थ बसून राहिली. तिच्या चेहऱ्यावरील हास्य लोपून उदासीनतेची छाया पसरली. नंतर ती हलक्या स्वरांत बोलूं लागली, 'तुम्हीं जितक्या स्पष्टतेनं हा प्रश्न विचारलात तितक्याच स्पष्टतेनं मी याचं उत्तर देतें. खरं म्हणजे मला आतां तुमचीच काय पण कोणत्याही पुरुषाची भीति वाटण्याचं कारण उरलं नाहीं. स्त्रिया पुरुषांना भितात त्या त्यांना राक्षस समजतात म्हणून नव्हे, तर निसर्गानं 'स्त्रीत्व' म्हणून जी पवित्र वस्तु स्त्रियांच्या स्वाधीन करून ठेवली आहे किंवा युगायुगांच्या संस्कारांमुळें स्त्रिया ज्या वस्तूला प्राणापलीकडे जपत आल्या आहेत त्या त्यांच्या जिवा-भावाच्या ठेव्याचं अपहरण वाटेल त्या पुरुषाकडून होऊं नये म्हणूनच त्या पुरुषांना भीत असतात. पण माझ्या बाबतींत हा प्रश्न सुटलेला आहे. केव्हांतरी माझी हकीगत तुम्हांला सांगायलाच हवी होती ती आतांच सांगतें: "मी पंजाबमधील लुधियानाची राहणारी. जातीची

खत्री ! माझे वडील ज्यांना मी लालाजी म्हणत असें ते लोंकरीचे फार मोठे व्यापारी होते. माझी आई लहानपणींच वारली. माझ्या शिक्षणाच्या हव्यासानं मी या वयापावेतों अविवाहित राहून लाहोरला आर्ट कॉलेजमध्यें शिकत होतें. आणि एका हॉस्टेलमध्यें राहत होतें. भारताचे हिंदुस्थान आणि पाकिस्तान असे तुकडे पडल्यानंतर पंजाब-मध्यें हत्याकांड सुरू झालं आणि आपल्या एकुलत्या एक कन्येला घ्यायला आलेले माझे लाडके लालाजी माझ्या देखत माझ्या हॉस्टेल-मध्यें मुसलमानांच्या सुऱ्यांनीं तुकडे तुकडे होऊन मरून पडले. हं ! असं अंग शहारूं देऊं नका ! पुढें ऐका ! लालाजींना आणि इतर सांपडलेल्या पुरुषांना कापून काढून ती नरपिशाचांची टोळी आम्हां मुलींवर तुटून पडली. त्याही वेळेस माझ्या या सौंदर्यानं मी सर्वांनाच पसंत पडलें आणि माझे हाल सुरू झाले. पुढें काय झाले तें मला माहीत नाहीं. मी किती दिवस बेहोष होतें हेंही मला ठाऊक नाहीं. मेलें कशी नाहीं याचंच आश्चर्य वाटतं ! कुठून कशी फिरत फिरत मी हिंदुस्थानांत आलें तें देवाला माहीत. गाडींत ज्या लोकांच्याबरोबर होतें त्यांना मी ओळखत नव्हतें. ते कुठें जात होते आणि मी त्यांच्याबरोबर कां जात होतें हेंही मला माहीत नव्हतं आणि म्हणूनच या जीवनाला कंटाळून गाडींतून उडी घेत होतें. तुम्हीं मला कां वांचवलंत हेंही मला माहीत नाहीं. आतां सांगा, पुरुषांना भिण्याचं मला काय कारण ? ज्याकरितां भ्यायचं तें जळून गेलं. शरीर-सौख्याच्या मधुर कल्पनेची राखरांगोळी झाल्यावर आतां तुम्हींच काय पण प्रत्यक्ष मदन जरी माझ्यापुढें येऊन उभा राहिला तरी मला मोह उत्पन्न होणें शक्य नाहीं. इतकी विटलें आहे मी या बाबतींत ! पण तेवढ्यांतही अगदीं पहिल्या दृष्टिक्षेपांत मला तुमचा भलेपणा दिसून आला आणि गेल्या आठदहा दिवसांच्या सहवासानं मला निश्चित कळून आलं कीं, माझं लक्ष्यशून्य जीवन जर आणखी कांहीं

दिवस जगवायचं असेल तर तें तुमच्यासारख्या सज्जनांच्या सहवासांतच शक्य आहे. संपली माझी कथा ! चला, आपण स्टूडियोकडे जाऊं ! ”

तिची ती भयंकर कथा ऐकून आणि त्या कथेची नायिका समोर पाहून त्याचं हृदय भरून आलं. त्याला असा दुःखित झालेला पाहून ती चट्कन् उठली आणि त्याचा हात धरून म्हणाली, ‘ चला, चला ! आतां त्या गोष्टीचा विचार करून काय होणार ! ’

याही गोष्टीला कांहीं दिवस लोटले. यापूर्वी तिनें चित्रकलेचा थोडा-फार अभ्यास केलेला होता. तोच अभ्यास पुढें चालू ठेवण्याची तिनें इच्छा दाखवतांच त्याला फार आनंद झाला. त्याचा स्टूडियो घरा-पासून थोड्या अंतरावर दुसऱ्या एका जागेंत होता. चित्रकलेचा अभ्यास करायला भरपूर वेळ मिळावा आणि इतर व्यवधानं मागें असूं नयेत, अशी तिची समजूत घालून त्यानें तिची राहण्याची सोय स्टूडियोंतच केली आणि अशा रीतीनें पत्नीची इच्छा पूर्ण केली. तिला याबद्दल कांहींच वाटलं नाहीं.

आतांशा त्याच्या चित्रकलेसंबंधीं सर्व सुप्त भावना उफाळून आल्या होत्या. अनन्य उत्साहानं तो आपल्या कलानिर्मितींत दंग होऊन गेला होता. असाच एक दिवशीं दुपारीं तो एक चित्र काढीत बसला होता. मॉडेल म्हणून ती समोर आळसावलेल्या स्थितींत पहुडली होती आणि त्या स्थितीला अनुसरून तिच्या अंगावरील वस्त्रं अस्ताव्यस्त झालेलीं होतीं. याच वेळीं त्याची पत्नी स्टूडियोंत आली. समोरचं दृश्य पाहून तिच्या अंगाचा भडका उडाला. लोकांच्या टीकेमुळें पूर्वग्रहदूषित झालेल्या तिच्या मनाला त्या परिस्थितीचं नीट आकलन करण्याची देखील आवश्यकता वाटली नाहीं. चिडून ती म्हणाली, “ लोक बोलतात त्याला कांहीं भूमिका असतेच ! तुमचीं हीं थेरं मला मुळींच पसंत नाहींत. मी स्पष्ट सांगतें, तुमच्या जीवनांत ही सौंदर्यदेवता

तरी राहील किंवा मी तरी राहीन. दोघींना राहतां येणं शक्य नाहीं." असं म्हणून ती तावातावानं तशीच निघून गेली.

त्याच्या हातांतील कुंचला गळून पडला. आपलं काय चुकलं म्हणून जगानें हा असा गहजब चालवलेला आहे हें त्याच्या लक्षांत येईना. त्यानं समोर पाहिलं, ती उठून बसली होती. आणि तिच्या डोळ्यांत अश्रु दिसत होते. भारावलेल्या आवाजांत ती म्हणाली, "तुमचं चित्र झालं का पुरं? नसलं तर संपवून टाका. पुढें तुम्हांला माझा उपयोग होणार नाहीं. इथंही पुन्हा माझं सौंदर्य आडवं आलं! तुमचं जीवन विषाक्त करणारं माझं विष बाजूला फेंकून द्यायलाच हवं! मला जायलाच हवं इथून!"

तिच्या त्या उद्गारांनीं तो एकदम उठून उभा राहिला. कसल्या तरी निश्चयानं त्यानं आपलं डोकं हालवलं आणि दृढ स्वरांत तो म्हणाला, "तूं कुठं जातेस? मी काय आहें हें तुला कळलं आहे. माझ्यांत असलेल्या गुणांचा अधिकाधिक विकास करण्याकरितां तूं झटते आहेस. माझ्या आवडत्या कलेशीं मी तुझ्या सहाय्यानं आज तन्मय झालों आहें आणि तूं मला सोडून जाणार? नाहीं, शक्य नाहीं तें! रूढीला अनुसरून विवाहसंस्थेनं माझ्या जीवनाशीं जखडून टाकलेली माझी पत्नी--तिचं आणि माझं मन कधींच जुळलं नाहीं तिला माझं वैभव हवं, कीर्ति हवी, प्रत्यक्ष मी हवा कीं नको, हा प्रश्नच आहे आतां! जगाला नावडता झालेला तिचा पति तिला तरी कसा आवडणार! तिनं कधीं माझ्या कलेला उत्तेजित केलं नाहीं. संबंध काय तिचा माझ्या कलेशीं! सुंदर लुगडीं, दागदागिने आणि ऐषआराम या गोष्टींनींच नवऱ्याचा मोठेपणा सिद्ध होत असतो, चित्रांनीं नव्हे—ही तिची विचारधारा! जगाला देखील मी पाहिजे तो मी जर त्याच्या तंत्रानें वागणारा असेन तर! मला स्वातंत्र्य नाहीं. माझी कला देखील त्याच्या इच्छेची गुलाम हवी! त्याला हवं तसं मीं

माझ्या कलेला राबवायला हवं! तें माझ्याकरितां कांहींच सोसायला तयार नाहीं. मीं मात्र लोकांचं मन सांभाळायला हवं! कां—कां ही माझ्यावर जबरदस्ती! तुमच्या सामाजिक नियमांच्या आड मी येत नाहीं, समाजाची घडी विस्कटेल अशी कोणतीही अश्लाघ्य गोष्ट मी करीत नाहीं, तरी केवळ वाटेल ते संशय माझ्या वागणुकीला चिकटवून माझ्यावर हा जुलूम कां? नाहीं—मी तुला जाऊं देणार नाहीं. माझ्या बाबतींत तुझी आणि तुझ्या बाबतींत माझी दृष्टि जोंपर्यंत निर्मळ आहे तोंपर्यंत आपण एकमेकांना सोडण्याचं कांहीं कारण नाहीं. मला जगाची पर्वा नाहीं. खरी कला जगाच्या मेहेरबानी-वर जगत नसते! मूठभर लोकांच्या न्यायालयांत अभिजात कलेचा न्यायनिवाडा होत नसतो. वाटेल त्याच्या इच्छेप्रमाणें वागण्यापेक्षां—गुलाम म्हणून जगण्यापेक्षां—अशा प्रकारचा पतित म्हणून जगायला मी तयार आहें. जाऊं नकोस तूं!"

---

# पोपटाचा पिंजरा : : २

डाकेची वेळ झाली होती.

भित्र्या आतुरतेनें नानासाहेबांनीं दूर कोठें पोस्टमन दिसतो का म्हणून दिवाणखान्यांतल्या खिडकींतून पाहिलं. त्यांना वाटत होतं, नयेच येऊं आज पोस्टमन. पण लगेच त्यांना वाटलं आज नाहीं तरी उद्यां तरी तो येणारच ना? मग आज कां नको? काळाप्रमाणें पोस्टमनसुद्धां थांबत नाहीं. बातमी वाईट असो, चांगली असो, ठरलेल्या वेळीं येऊन तो ती पुरवीतच असतो. तसाच तो आजही आला.

अन् त्याला बंगल्याच्या फाटकाच्या आंत शिरतांना पहातांच नाना-साहेब जिन्यावरून धाड् धाड् खालीं आले. अन् त्यांनीं पोस्टमननं दिलेलीं तीनचार पत्रें घाईनं घेतलीं. परीक्षेचा निकाल हातांत आल्यावर आपण आपलाच नंबर अगोदर पहातों, इतरांचे नंबर आपल्या डोळ्यांत भरतच नाहींत मुळीं, त्याचप्रमाणें त्यांनीं साऱ्या पत्रांचे कोपरे घाईनं तपासायला सुरवात केली. पण त्यांना फारसं तपासावंच लागलं नाहीं. दुसऱ्याच पाकिटाच्या कोपऱ्यांतली " भाऊराव फाटक, संगमनेर " हीं अक्षरं त्यांना चाळिशीशिवाय दिसलीं. त्यांना वाटलं इथंच फोडून वाचावं तें पत्र अन् म्हणून त्यांनीं पाकीट फोडण्याकरतां हात देखील उचलला. पण लगेच त्यांच्या लक्षांत आलं, विमलाबाई—त्यांच्या पत्नी—त्यांच्याजवळच उभ्या होत्या. फारसा विचार न करतांच त्यांनीं जिना गांठला ! अन् वर पोंचतांच टेबलावरची चाळिशी डोळ्यांना घाईघाईनं लावीत ते खिडकीपाशीं गेले अन् पत्र फोडलं देखील त्यांनीं. आंत

जहरी सुया आहेत याची पूर्ण कल्पना असूनही त्यांना इतकी घाई कां झाली होती कोण जाणे !

संगमनेर, दि. १४ मे.

प्रिय वकीलसाहेब,

आपलं दि. ११ चं पत्र मिळालं. पत्र वाचून काय वाटलं असेल असं आपल्याला वाटतं ? खरं सांगू, आनंद वाटला. अन् त्याचं कारणही उघड आहे. कारण आपली शूर, कलाप्रेमी कन्या नलू हिचं आमच्या चिरंजिवांशीं लग्न झाल्यानंतर कांहीं " असा " प्रकार झाला असता तर आमची अब्रू विनाकारणच गेली असती, नाहीं का ? वास्तविक तुमच्यासारख्या सुशिक्षित लोकांनीं मुलीच्या पसंतीची चौकशी अगोदरच करायला पाहिजे होती. पण तुम्हांला वाटलं, कोर्ट आपलं ऐकतं तर काय मुलगी ऐकणार नाहीं ? पण नानासाहेब, इथंच आपण चुकलात. अहो, प्रेमयुग आहे हें ! आपले दिवस आतां संपले. पण, तरीहि लग्नापूर्वी आपली भूमिका प्रकट केल्याबद्दल नि आपली कन्या व आमची " माजी–भावी सून " कुमारी–पण कुमारचि का–नलिनीदेवींचे मनापासून आभार मानतों. अन् तरीही त्यांना पुढेंमागें त्यांचा ठावठिकाणा लागलाच तर तसं कळवा. झाला प्रकार एकूण आश्चर्यकारक झाला. तरीपण त्याला तुम्ही काय करणार म्हणा ! अर्थात् तुमची मुलगी तिचं लग्न तुम्हीं ठरवलं असतांना भल्या पहाटेंच उठून आपल्या प्रियकराबरोबर–एका नाटक्याबरोबर–सारीं बंधनं तोडून–पळून जाते यावरून इतकं मात्र म्हणतां येईल कीं, तिचं प्रेम अपूर्व होतं, अगर तुमचा तिला धाक यथातथाच होता. तिच्या या पलायनामुळं तुमची जशी अब्रू गेली तसाच आमचाही थोडाफार तोटा झालाच कीं ! उद्या लोक शंका घेतील कीं, फाटकांच्या स्थळांत तर कांहीं " गोम " नाहीं ना ? शिवाय आमच्या घरीं या "मंगल विवाहाची " तयारीही धूमधडाक्यानं चालू होती. फक्त नशीब म्हणून आपलं पत्र येईपर्यंत परगांवीं निमंत्रणपत्रिका टाकायच्या तेवढ्या राहिल्या होत्या. पोरीचं धाडस मात्र आपणही कौतुक करावं असंच आहे हो ! असो.

एक गोष्ट मात्र लिहावीशी वाटते कीं, झाल्या प्रकारानं आपल्या अल्पशा स्नेहांत मात्र तूट पडायचं कांहींच कारण नाहीं. तुमचे निर्दोषित्व मला पटतंय्. तेव्हां तशा तऱ्हेनं कुठलाच गैरसमज करून न घेतां पूर्ववत् प्रेम असूं द्यावं, ही विनंति.

अन् शिवाय असल्या प्रकारानं झालेल्या आपल्या मानहानींत, नुकसानींत अन् शोकांत आमचाही वांटा आहेच कीं !

असो. लोभ आहेच. वृद्धि व्हावी.

आपला,

**भाऊराव फाटक**

नानासाहेबांनीं पत्र मिटलं अन् टेबलावर फेंकलं. त्यांना पुन्हां बघवेना देखील त्या पत्राकडे. त्यांतलें कांहीं कांहीं शब्द—पण कुमारीच का—पुढेंमागें त्यांचा ठावठिकाणा लागलाच तर—तुमचा तिला धाक यथातथाच होता—आठवले. तेव्हां कोणीतरी डोक्यांत घण मारतंय् असंच वाटलं त्यांना. अन् हीं वाक्यं कोणी तरी पुन्हां पुन्हां कानांशीं ओरडतंय् असं वाटूनच कीं काय कोण जाणे त्यांनीं आपले कान घट्ट झांकून घेतले; अन् आरामखुर्चीवर अंग टाकून दिलं. तरीपण पत्राचा शेव-टचा भाग आठवून त्यांना थोडंसं समाधान वाटत होतं. भाऊरावांनीं आपलं निर्दोषित्व मान्य केलं. यांतच त्यांना आनंद होता. अन् एकूण पत्र वाचून फांशीची शिक्षा ऐकायला मन घट्ट केलेल्या माणसाला जन्म-ठेपेची शिक्षा ऐकून वाटणाऱ्या समाधानाइतकंच समाधान त्यांना वाटलं होतं. तरी पण त्यांची मनःस्थिति विलक्षण बिघडली होती. अन् तसं पाहिलं तर गेल्या साऱ्या आठवड्यांत क्षणभर तरी त्यांचं मन शांत कुठं होतं !

× × ×

नानासाहेब चिटणीस हे श्रीपूरचे एक विख्यात वकील होते. त्यांचा वकिलींत चट्कन् बसलेला जम, त्यांच्या इतर व्यवसायबंधूंत ईर्ष्या, स्पर्धा, उत्पन्न करणारा होता. त्यांचं कुटुंब छोटसंच होतं. ते, त्यांच्या पत्नी विमलाताई, अन् दोन मुलं. त्यांचा थोरला मुलगा माधव यंदा बी.

एस्. सी. ला बसणार होता अन् धाकटी मुलगी नलू १७।१८ वर्षांची होती. तिची शालेय प्रगति यथातथाच म्हणजे ४।५ इंग्रजी इयत्तेपर्यंतच असली तरी तिच्यांतलं आकर्षण म्हणजे तिचा गोड आवाज. ती एखादं भावगीत जरी सहज काम करतां करतां, आळवूं लागली तरी घरांतलेच काय पण शेजारच्या ४।२ बंगल्यांतले रसिक लोकसुद्धां क्षणभर आपला श्वास रोखून धरीत अन् जणुं काय ते मंजूळ स्वर आपल्या हृदयांत ठासून भरून ठेवीत. नलूच्या गोड अन् मंजूळ आवाजाचं कौतुक लहानपणापासून होत गेलं होतं, पण तिचं अभ्यासांत लक्ष तितकंच असल्यानें तिचा आवडीचा विषय म्हणून मित्रमंडळींच्या आग्रहानं अन् विमलाबाईच्या हट्टानं नानासाहेबांनीं तिला आतां " स्वरकिन्नर " संगीत विद्यालयांत घातलं होतं. या विद्यालयांतून बहुतेक लोक बाहेर पडल्यावर उत्तम कलावन्त म्हणून नांव कमवीत अन् अशा या संगीत विद्यालयांत नलू आतां शास्त्रोक्त संगीत शिकत होती. सारं गोड होतं पण......!

त्या कुटुंबांत एकच वाईट गोष्ट सर्वांना जाणवे, अन् ती म्हणजे नानासाहेबांचा तापट, किरकिरा, करारी स्वभाव. वास्तविक ते सारा दिवस–रात्र आपल्या कामांतच गुंग असत, पण थोडाफार वेळ जरी मोकळा मिळाला तरी ते कुणाशींच कधीं मनमोकळेपणानं बोलत नसत. गांवांत अगर जवळपास ते व्याख्याते अगर अध्यक्ष म्हणून अनेक ठिकाणीं जात. तिथं तोंड भरून खूप बोलत, पण घरीं आले कीं त्यांच्या चेहेऱ्यावर गांभीर्य पसरें अन् तसंच तें परत बाहेर जाईपर्यंत टिके. त्यांच्या मनांत एखादी गोष्ट आली कीं ती ते कुणालाहि न विचारतां खुशाल करीत त्यांत त्यांना दुसऱ्याच्या पसंती–नापसंतीचा विचार करायची कधी जरूरच भासत नसे. अन् त्याविषयीं कोणीहि जरी थोडीफार कुरकुर केली तरी त्यांचं मन असला भयंकर रुद्रावतार धारण करी कीं बस्! अन् या साऱ्याचा परिणाम विमलाबाईवर अन् नलू-माधवावर असाच झाला होता कीं, त्यांना नानांशीं कुठलीच गोष्ट मनमोकळेपणानं बोलायची भीति वाटे. पत्नी म्हणून विमलाबाईशीं अगर अपत्यें म्हणून नलू-माधवशीं ते कधींच मोकळेपणानं बोलत नसत,

अन् बोललेच तर कोर्टाच्या भाषेत. या साऱ्याचा परिणाम म्हणजे सर्वां-ऱ्याच मनावर कुठलें तरी दडपण पडलेलं होतं. नानांच्या काटेकोर-पणाला सारे अगदीं मनापासून कंटाळलेले होते, तरी पण त्यांची शिस्त मात्र अद्याप कोणी मोडू शकलं नव्हतं.

पण तोही प्रसंग आलाच एकदां. अन् प्रसंगही साधा नव्हता, अगदीं और होता! आज सुमारे दोन वर्षे नलू संगीतशिक्षण घेत होती. तरीपण तिच्या संगीत कलेबरोबर तिचं वयही वाढतंय् याचीही कल्पना नानासाहेबांना होती. म्हणून त्यांनीं आपली नजर जावयावर ठेवली होती. नलूचा रेखीवपणा, मुसमुशीत तारुण्य अन् लावण्य यामुळें तिला कोण पसंत करील हा मुळीं प्रश्नच नव्हता; उलट आपल्या पतीला शोभेल असा पति नलू करतां शोधणं हेंच थोडसं अवघड होतं. पण तोहि प्रश्न लवकरच सुटला. संगमनेरचे श्रीमंत जमिनदार श्री. भाऊराव फाटक यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. नरहरपंत यंदांच बी एजी. झाले होते, अन् सरकारी खात्यांत त्यांना एक मानाची जागाही मिळाली होती. नानासाहेबांचा अन् भाऊरावांचा अल्पसा परिचय झालाच होता. तेव्हां त्यांना त्यांनीं एकदां शब्द टाकलाच अन् अपेक्षेप्रमाणें त्यांनींही पण तो झेलला. नलीनी–नरहर विवाह ठरला होता. पण त्याच दिव-सापासून कां कोण जाणे नलू अगदीं विचित्र वागत होती. तिचे अन् आईचे सदानकदा खटके उडत असत. पण कसंही असलं तरी त्यांतलं एकही अक्षर नानांना कोण सांगणार? वीस मेचा मुहूर्त ठरला होता. पाहुणे-रावळे देखील यायला सुरवात झाली होती. तयारी जारीनं सुरू होती. पण काय झालं अन् कसं झालं हें कुणालाच समजलं नाहीं. दहा तारखेला नलू पहांटेपासून घरीं नव्हती, सकाळीं तपास सुरू झाला, पण छे! कुठंच तपास लागेना. विमलाबाईंना कांहीं ठाऊक होतं वाटतं, पण त्या तरी कुणाला काय अन् कसं सांगणार? नानासाहेबांनीं आपलं अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलं. त्यांना वाटलं पोरीच्या अंगावर ५।७ तोळे सोनं होतं म्हणून त्यांनीं पोलिसांतही वर्दी दिली. साऱ्यांचे सारे उपाय संपले. पण, सुमोर ११ वाजतां पोस्टमननें एक पत्र आणून दिलं; त्यामुळें सगळंच वातावरण एकदम बदललं, पत्रांत लिहिलं होत–" तुम्हीं

ठरवलेलं लग्न होणं अन् झालं तरी यशस्वी होणं शक्यच नव्हतं. त्याचं कारण तुम्हांला सांगण मला तूर्त शक्य नाहीं. मला पाहिजे असणाऱ्या एका व्यक्तीकडे मी स्वखुषीनें जात आहें. तिथें सुखरूप आहें. काळजी करूं नका. पुढेंमागें शक्य झालं तर पत्ता कळवीन, तूर्त तपास करूंच नका. तुम्हांला आतां कायमची अन्तरलेंय् मी. ”

नानासाहेब संतापानं लाल झाले. पण काय करणार ! त्यांनीं पुष्कळांना विचारलं पण कोणींच कांहीं सांगितलं नाहीं. शेवट विमलाबाईनीं मात्र सांगितलं कीं तिचं यशवंत मोरे नांवाच्या एका नटावर प्रेम होतं. ती तिकडेच गेलीय. आतां मात्र नानासाहेब इतके तापले कीं, त्यांच्या तोंडून शब्दही निघेना. “ आगोदर कां नाहीं सांगितलस् म्हणजे गळा दाबून प्राण घेतला असता कार्टीचा ! ” असंही ते म्हणाले.

आलेल्या पाहुण्यांनीं आपले बाडबिस्तारे आवरते घेतले. कालच्या लग्नघराला आजच स्मशानवैराग्य आलं होतं. केवळ कठोर कर्तव्य म्हणून त्यांनीं ही बातमी भाऊराव फाटकांना कळवली होती. गेले २।३ दिवस त्यांचं मन ठिकाणावरच नव्हतं. फाटक आपल्याला किती शिव्या देतील, ते आपल्याला काय म्हणतील, इकडेच त्यांचं सगळं लक्ष लागून राहिलं होतं अन् ते त्यांच्या पत्राचीच भित्र्या आतुरतेनं वाट पाहत होते अन् तेंच पत्र आज आलं होतं.

× × ×

कितीतरी वेळ तसंच खुर्चीत पडून राहिल्यावर “ हरे राम ” म्हणून ते खुर्चीतून उठले. त्यांचं लक्ष जेव्हां पुढें पडलेल्या पत्रावर गेलं तेव्हां त्यांच्या लक्षांत आलं कीं, आणखीही कांहीं पत्रं आलीं आहेत. त्यांतलीं दोनं त्यांच्या व्यवसायासंबंधींचीं होतीं अन् एक लग्नपत्रिका होती. “ असेल झालं कुणाची तरी. हल्लीं काय सीझनच आहे ! ” असं म्हणतच त्यांनीं तीं फोडलीं अन् वाचायला घेतलीं. पण ते वाचायला लागले अन् क्षणाक्षणाला त्यांची दृष्टि कांगरी व्हायला लागली. त्यांच्या डोळ्यांपुढं अंधेरी यायला लागली न् आपलं कांही चुकलं तर नाहींना म्हणून त्यांनीं तीं परत वाचायला सुरवात केली.

वन्दे हिन्द

संभाजीनगर,
" माणिक मोती "
दि. १२ मे.

सप्रेम प्रणाम,

आम्ही उभयतां दि. १९ मे रोजीं सकाळीं ९ वाजून २३ मिनिटांनीं वैदिक पद्धतीनुरूप विवाहबद्ध होण्याचें निश्चित केलें आहे. तरी या आनंद प्रसंगीं आपण अवश्य उपस्थित राहून आपले मंगल आशीर्वाद आम्हांस द्यावेत अशी नम्र विनंति आहे.

आपली अनुपस्थिति समारंभास कमतरता आणणार आहे.

विवाह स्थळ :—११२ " माणिकमोती ", संभाजीनगर.

आपले नम्र,
**यशवन्त मोरे** ( मयूर नाट्यम् )
**नलिनी चिटणीस**

आतां मात्र नानासाहेबांच्यानें राहवेना. ते एकदम ओरडले, "अग ए ऐकलस का ?" घाबरूनच विमलाबाई वर आल्या अन् त्यांनीं काय झालं म्हणून शांतपणें विचारलें. पण शांतपणें उत्तर देण्याच्या मनःस्थितींत ते कुठं होते. संतापानं उसळून ते म्हणाले, " काय झालं ? लावले तुझ्या कार्टीनं दिवे. लग्न ठरवलंय. अन् आपल्याला अगत्याचं बोलावणं पाठवलंय्. नाटक्याच्या पाठीमागं लागलीय कार्टी... आतां एकदां थिएटरांत नाचल्याचं ऐकलं म्हणजे झालं. गंगेत घोडे न्हाले. कुलकलंक अवदसा......!" पण आपण कांहींच बोललों नाहीं तर त्यांचा संताप वाढेल म्हणून विमलाबाई म्हणाल्या, " असं काय करताय् तें ? काय झालं तें तर सांगा. " अन् मग नानासाहेबांनीं ती पत्रिका त्यांच्या हातांत दिली. त्या पत्रिका वाचीत होत्या पण नानासाहेबांचा ओरडाआरडा सुरूच होता. ते म्हणाले, " ठीक आहे. आतां पत्ता मिळालाय्; आतां जातों पोलीस घेऊन, अन् कसं काय लग्न लागतय् तेंच पाहतों......"

नानासाहेबांनीं खरंच असं कांहीं एकदां ठरवलं तर मग मात्र त्यांचं मन बदलणं कठीण आहे म्हणून विमलाबाई म्हणाल्या, " असं करून कसं चालेल. अशा सक्तीनं तिला घरीं आणून ठेवलंत तरी त्याचा काय उपयोग. तिचं जर खरंच मोऱ्यांच्यावर मनापासून प्रेम असेल तर असलं कांहीं करून तरी काय उपयोग! त्यापेक्षां आपण माधवला पाठवूं. गोडीगुलाबीनं तिचं मन वळलं तरच ठीक आहे. " त्यांचा हा विचार कसा कोण जाणे नानांना पसंत पडला अन् माधवला संभाजी-नगरला पाठविण्यांत आलं. विमलाबाईंचा विश्वास होता, नलू माधवचं ऐकेल; म्हणूनच माधव गेल्यावर तो परत येतांना नलूला घेऊन येईल अशी त्यांना फार फार आशा वाटत होती अन् त्या माधवची सारखी वाट पहात होत्या.

संध्याकाळीं माधव आला. घाईघाईनं विमलाबाईनीं अन् नाना-साहेबांनीं देखील त्याला काय झालं म्हणून आशेनं विचारलं. पण... नलू येत नाहीं अन् तिचं मत बदलणंही शक्य नाहीं हेंच उत्तर त्यांना ऐकावं लागलं. उलट तिनें आईवडलांना एक निरोप दिला होता— " बाबा, आई, नलूनं केलं तेंच योग्य आहे असा विश्वास ठेवा." झालं. साऱ्यांच्या आशाज्योती मावळल्या होत्या. वातावरणांत पूर्वी-पेक्षां अधिकच भीषणता मिसळली गेली. कोणीच कुणाशीं बोलत नव्हतं, अन् प्रत्येक जण जणूं झालं गेलं सारंच विसरून जाण्याचा कांटेकोर प्रयत्न करीत होता.

अन् आज १९ मेचा दिवस उगवला. जरी प्रत्येक जण आपल्या हृदयाचे कप्पे दुसऱ्यापासून लपवीत असला तरी पण प्रत्येक व्यक्ति मनांत चूर होती. घड्याळांत ९॥ चा ठोका पडला अन् झट्कन् एकदोन विरहाश्रु विमलाबाईंच्या डोळ्यांच्या कडा सोडून खाली पडले. माडी-वर नानासाहेबांच्या तोंडातून एक खिन्न आलाप बाहेर पडला. नालिनी यशवंताची झाली. पुष्कळशा वर्तमानपत्रांनी मयूर नाट्यम्‌च्या फ्री पासाच्या आशेनं लग्नाची भरपूर जाहिरात केली. प्रत्येक वर्तमानपत्र नलूच्या " निर्भीड कलाप्रेमावर " बेहद्द खुष होतं

नानासाहेबांना तोंड बाहेर काढवत नव्हतं. सगळं दुःख, सारा अपमान, त्यांना निमुटपणें गिळावाच लागत होता, त्यांच्या चेहेऱ्यावर कमालीचं नैराश्य पसरलं होतं.

आणि आणखी तीनचार दिवस कसेतरीच गेले. एका सकाळीं नानासाहेब स्वत.वरच विनाकारण रागवत आदळआपट करीत असतांच पोस्टमनची आरोळी आली. अ ज इतक्या लवकर डांक, अशा आश्चर्यकारक मुद्रेनंच ते बाहेर गेले अन् त्यांनी पत्र घेतलं. पण तें एक्सप्रेस ( Express ) होतं. मला अन् एक्सप्रेस पत्र कोणी बुवा धाडलं असावं, असा विचारच ते करीत होते तोंच पोस्टमननं त्यांना परत ' साहेब ' म्हणून हाकारलं तेव्हा त्यांच्या लक्षांत आलं कीं, आपण पोस्टमनला ताटकळत ठेवलंय् त्यांनीं सही केली, पोस्टमन निघून गेला.

वर जाऊन त्यांनीं आतुरतेनं पत्र कुठलं आहे म्हणून जरा बारीक नजरेनं पाहिलं. पत्रावरचा संभाजीनगरचा शिक्का पाहून त्यांना संतापाचा झटका आला. त्यांनीं लगेच ओळखलं. पत्र नलूचं होतं. त्यांच्या मस्तकाच्या शिरा तडातडा उडूं लागल्या. ते म्हणाले देखील— " एवढं तोंडाला काळं फासून अजून नाहीं वाटत समाधान झालं. आतां कशाला पत्र पाठवून आणखी डागण्या देतेय्—परवां लग्नाला बोलावणं केलं, आज काय पोराच्या बारशाला बोलावलंय् कीं काय कोण जाणे." त्यांना वाटलं, नाहींच वाचूं तें पत्र अन् म्हणून त्यांनीं तें पत्र न फोडतांच टेबलावर फेंकलं.

पण अशी एक दोन मिनिटं गेलीं नसतील तोंच त्यांना काय वाटलं कोण जाणे त्यांनीं एकदम अधीरतेनं पत्र उचललं अन् कितीतरी घाईनं फोडून वाचायला घेतलं. पण पत्र खूप मोठ होतं. तें इतकं मोठं पत्र पाहून त्यांना वाटलेलं आश्चर्य पत्र आलं हें पाहून वाटलेल्या आश्चर्यापेक्षां मोठं होतं. ते स्वतःशीं म्हणाले देखील, " परवां लग्न नाहीं झालं तर इतकं मोठं पत्र लिहायला हिला वेळ तरी कसा मिळाला, का तो मोऱ्या नाहींय् इच्याजवळ......"

त्यांनीं उत्कंठेंत पत्र वाचायला सुरवात केली.

संभाजीनगर,
" माणिक, मोती " २३ मे

तीर्थरूप नानांचे चरणीं सौ. नलूचा सादर नमस्कार—

( पत्रांतला ' सौ. नलू ' हा शब्द त्यांच्या मनाला न कळत बोंचलाच. )

नाना, आई, रागावलांत ना माझ्यावर! तोंड पहायलाही तयार नसाल. लग्नपत्रिका पाठवली तेव्हां तुम्हांला वाटलं असेल कीं नली शोकावर, दुःखावर, डागण्या देतीय्. पण नाना तसं नव्हतं हो! मला वाटलं होतं कीं तुमच्या नलूनं जळल्या–करपल्या हृदयावर आनंदाचे साज शृंगारून लग्नमाळांचा जो शृंगार केलाय् तो पहायला–आपली कार्टी चुकली तरी तिचे अन् आपले आयुष्याचे संबंध तोडणाऱ्या तिच्या लग्नप्रसंगीं जड मनानं, मर्जीविरुद्ध का होईना पण आशीर्वाद द्यायला तुम्ही याल. लग्न मंडपांत लग्न लागेपर्यंत चोरट्या मनानं मी सारखी तुमची वाट पहात होतें. तुम्ही आला असतां तर माझ्या अश्रूंनीं तुमचे पाय भिजले असते. पण मला वाटतं लग्नमंडपांत अश्रूंचा अपशकून नसावा म्हणून तुम्ही आला नसाल किंवा तुम्हांला माझं तोंड नसेल पाह्यचं पण तरीही मला आशा होती निदान तुमचं आशीर्वाद पत्र तरी येईल, पण तीही आशा संपली. अन् मग मला वाटलं मी साऱ्यांना अंतरलें. माझ्यापासून माझे ते सारे दूर पळाले. मी एकटी राहिलें. आपल्या प्रेमाचं–मायेचं जवळ कोणीही नसलेल्या परिस्थितींत मी चिटणिसांची मेरे झालें.

अगदीं माझ्या अपेक्षेप्रमाणं लग्नपत्रिकेच्या पत्त्यावर भाऊ येऊन गेला. पण मला त्याला विन्मुख परत पाठवावं लागलं. पण, नाना, जातांना तो माझं सारं नातं तोडून गेलाय्. एकाला स्वतःशीं जोडतांना मला इतर साऱ्यांना तोडावं लागलं. खरंच आतां भाऊ मला ताई नाहीं का मानणार? पण माझा विश्वास आहे हें पत्र म्हणजे दोन किनारे जोडणारी नौका ठरेल. बाबा इथें भाऊ म्हणाला होता, ' नलू ' प्रेमविवाहच तुला करायचा होता तर आपल्या घरांत का कोणी भट मंडळी होती? प्रेमविवाहाला तुला खात्रीनं परवानगी मिळाली असती.

वधूवरांनीं आपली स्वतःची निवड स्वतः केली तर नको कुणाला, पण तशी निवड करतांना आपल्या घरांतल्या मायेच्या माणसांच्या पसंतीचा शिक्कामोर्तब त्या निवडीवर अवश्य पाहिजेच. गाईनं खाटकाची निवड केलेली कुणाला अन् कशी आवडेल !" त्याचं हें म्हणणं मला फार पटलं. तें खरं आहे. मी गाय होतें, अन् मी खाटकाचीच निवड केली आहे.

नाना, हें वाचून तुम्हांला वाटेल कीं प्रेमविवाहाचं प्रेम मंगलाष्टकांचे आवाज वातावरणांत विलीन होण्यापूर्वीच विलीन झालं. तुम्हांला शंका येईल कीं, माझं अन् यशवंतरावांचं भांडण झालं अन् माझीं मतं बदलली असावींत पण तसा गैरसमज करून घेऊं नका. माझीं हीं मतं तुमच्या घरून निघण्यापूर्वीचीं आहेत. गाय जाणूनबुजून कसाईखान्यांत शिरली आहे, नव्हे तिला शिरावं लागलंय्. कारण आज ना उद्यां तिला बाकीचे सारे दरवाजे बंद होणार होते.

तुम्ही घोटाळ्यांत पडाल म्हणून स्पष्टच लिहितें, नाना, जग म्हणेल नलूनं प्रेमविवाह केला, पण मी म्हणेन मोऱ्यांनीं परिस्थितीच्या खड्ड्यांत पकडून नलूशीं राक्षस विवाह लावला. त्या खड्ड्यांतून बाहेर काढायला दुसरा कुणाचाच हात नव्हता म्हणूनच मला नाइलाजानं का होईना पण शेवट त्यांचाच हात धरावा लागलाय्. पत्र पूर्ण वाचण्यापूर्वीं तुम्ही म्हणाल नली नालायक कुलकलंक निघाली. पण पत्र पूर्ण करतांच तुम्हांला म्हणावं लागेल नलूनं कुलाची अब्रू वांचवण्याकरतां फार त्याग केला. नाना तुमची नलू तुमच्या, माझ्या अन् आपल्या साऱ्यांच्या अब्रूकरतां प्रेमाचा बुरखा पांघरून सती गेलीय्. हें मला करावं लागलं नसतं पण याला कारण तुम्हीच आहांत. आणीबाणीच्या प्रसंगींही तुमच्याशीं मोकळेपणानं बोलायची आम्हांला भीति वाटते. तुमचा कांटेकोर स्वभाव नडतोय् मला. तुमच्यापुढं मनमोकळेपणानं बोलायला कधीं तोंडच उघडलं नाहीं. पण इतके दिवस मिटलेलं तोंड आज उघडलंय्.

आज मात्र तुम्ही रागावणार नाहीं अगर इतके मोठे भयंकर रागावला आहांत त्यांत थोडी भर पडेल असं समजून मी माझं हृदय, हृदय

कुठलं–अंगार आहे हा–तुमच्यापुढं पसरणार आहे. त्याची प्रखरता पहा अन् तरीही पण आपलंच बरोबर होतं असं तुम्हांला वाटलं तर नलू मेली अगर जन्मालाच आली नाहीं म्हणून सोडून द्या. मेलेल्या माणसाचा कालांतरानं विसर पडतो तसाच माझाही पडेल. पण माझा विश्वास आहे कीं, पत्र वाचून तुमच्या डोळ्यांत आंसवें तरारतील अन् त्या अश्रूंनीच मग माझा हा हृदयांगार शांत होईल.

सुमारें दोन वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. माझ्या गोड आवाजानं साऱ्यांना भुलवलं. तुम्ही आईच्या म्हणण्यापेक्षां तुमच्या मित्रांच्या आग्रहानं मला " स्वरकिन्नर " विद्यालयांत घातलंत. पण नाना, पोपट गोड बोलतो म्हणून त्याच्या नशिबीं पिंजरा येतो. कोणी कावळे पाळीत नाहींत. फुलं सुंदर दिसतात अन् सुवास देतात म्हणून त्यांना एखाद्या दोरखंडांत बद्ध होऊन एखाद्या देवतेभोंवतीं अगर प्रसंगीं एखाद्या प्रेतावर आपलं चार क्षणांचं आयुष्य काढावं लागतं. मला वाटतं माझ्या या गोड आवाजानंच माझं आयुष्य मातीमोल केलं गोड गळ्याची मैना जाळ्यांत पकडली गेली.

माझी अन् यशवंतरावांची पहिली गांठ स्वरकिन्नर विद्यालयांतच पडली. ते मूळचे याच विद्यालयांतले विद्यार्थी. पुढें संगीताच्या जोरावर ते 'मयूर नाट्यम्' मध्यें शिरले. अन् तिथेंच उत्कृष्ट नट म्हणून त्यांनीं प्रसिद्धि मिळवली. पहिल्या भेटींत त्यांच्या गोड वाणीनं अन् सभ्य वागणुकीनं मला भुरळ पाडली. मला वाटलं नाटक कंपन्यांत सुद्धां सभ्य लोक असतात हो. आमची मास्तरांनीं करून दिलेली ओळख हळूहळू वाढीला लागली. आम्ही एकमेकांशीं मोकळेपणानं बोलत असूं. क्लासांत त्यांनीं माझं गाणं अनेकवार कौतुकानं ऐकलंय्. अन् त्या प्रत्येक वेळीं ते माझ्या आवाजाची कौतुकपूर्ण स्तुति करीत. तरुणी स्तुतिप्रिय असतात हें त्यांना चांगल ठाऊक असावं. एकदां त्यांचा एक मित्र त्यांच्या बरोबर क्लासांत आला होता. माझं गाणं ऐकून तो म्हणाला. " गोड आहे हो आवाज ! " त्यावर मोरे चटकन् म्हणाले " अरे नुसता आवाजच काय नलू सारी गोड आहेय् ! " अन् असं म्हणत साशंकपणें मजकडे पहात ते म्हणाले, " Excuse

हं." स्तुतीनं माझे गाल ओथ्रेगोथ्रे झाले होते. मी म्हटलं, "काहो कशाबद्दल?" जणूं ते प्रश्नाचीच वाट पहात होते. ते म्हणाले "अहो, गाण्यावर शेरे मारण्याच्या भरांत मी तुम्हांला नलू म्हटलं." मी म्हटलं, "हं त्यांत काय मोठं, मला मुळीं मोठेपणा आवडतच नाहीं." पण मला काय कल्पना कीं, माझं हे वाक्य म्हणजे मंदिराची निखळलेली पायरी होती. यानंतर ते मला नेहमींच एकेरी संबोधूं लागले. फार काय, पण नलू नले, नलिनी, अशा गोड नांवानेंच ते मला हांकारीत, पण त्यांच्या स्तुतीमुळं मला आनंदाचा सागर मिळाला होता त्यांत मी स्वैर डुंबत होते. "नलू सारी गोड आहे!" त्या दिवशी तें वाक्य पुन्हां पुन्हां कितीतरी वेळा स्वतःशीं म्हटलं. घरीं आल्यावर मी कितीतरी वेळ आरशापुढें बसले होतें. माझं मनोगत आईला समजलं वाटतं. ती कां कोण जाणे म्हणाली, "अग नलू, काय पहातेस आरशांत. खरंच सुंदर आहेस हो तूं! अगदीं राजपुत्रच मागणी घालणार आहे आतां!"

त्यानंतर सुमारें एक महिन्याचा प्रसंग. मी क्लासांत गेलें होतें, पण, त्या दिवशीं मास्तर आजारी होते म्हणून क्लास बंद होता. म्हणून मी परत फिरलें. वाटेंतच मला मोरे भेटले. त्यांनीं मला थांबवून विचारलं, "कां आज लवकर परत?" मी "त्यांना मास्तर आजारी असल्यानं क्लास बंद असल्याचं" सांगितलं. "मग मी तरी क्लासांत जाऊन काय करूं?" असं म्हणून ते परतले. ते अन् मी रस्त्यानं बरोबर चाल-ण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. रस्त्यातले तरुण टकमकां पहात होते. पण तो प्रसंग सहज घडून आला होता. अन् म्हणूनच त्यांत मला कांहींच वाटलं नाहीं.

आम्ही रामघाटाच्या बाजूनं घराकडे येत होतों. वाटेंतच आराम रेस्टॉरंट लागतं. तिथं मोरे म्हणाले, "नलू, चहा घेणार?" मी "नको" म्हटलं. "पण तुला घेतलाच पाहिजे" असं ते म्हणाले. तरुणीला आग्रह आवडतो कीं काय कोण जाणे, पण, माझ्या मनाचा कल होकाराकडे असूनही मी वरवर नाहीं म्हणत होतें. पण शेवट त्यांनीं थोडासा आग्रह केल्यावर मी आंत शिरलें. कोपऱ्यां-तल्या एका रूममध्यें आम्ही शिरलों. मोरे माझ्यासमोर बसले होते.

पण थोड्याच वेळांत काय अन् कसं झालं तें मला अजून कळत नाहीं. टेबलावरचा पाण्याचा ग्लास लवंडला अन् त्या बाजूच्या खुर्चीवर पाणी सांडलं. ते उठून माझ्या शेजारच्या खुर्चीत बसले. मात्र बसतांना ते मला " चालेल ना ? " म्हणून विचारायला विसरले नाहींत. त्यांच्या प्रगतीचीं तीं पावलं मला समजलींही नाहींत. चोर पावलं होतीं तीं. मी त्यांना म्हटलं " काय झालं न चालायला......"

चहा घेतांना माझा हात खालीं यायला अन् त्यांचा वर जायला एकच वेळ झाली. एक लहानसा धक्का लागला मला त्यांचा, पण तें माझ्या लक्षांतही लगेच आलं नाहीं. मात्र एक धक्का सहन केल्यावर दुसरा–चवथा सहन करावा लागला.

चहा घेऊन झाल्यावर माझ्या लक्षांत आलं कीं ते माझ्या हाताकडे निरखून पाहाताहेत. मीं त्यांना म्हटलं, " काय पाहताय् तें ? " माझ्या जणुं या प्रश्नाचीच ते वाट पाहत होते. ते लगेच म्हणाले, " खरंच भाग्यवान् आहेस नलू तूं ! काय सुंदर आहेय् तुझी भाग्यरेषा ! " भाग्यांत काय आहे हें पहायची आवड कुणाला नसते ? त्यांच्या एक-दोन वाक्यांनींच मी बेहोष झालें अन् त्यांना मी विचारलं, "कशावरून म्हणतां ? "

जणुं माझ्या तोंडांतून अपेक्षित प्रश्नच आज बाहेर पडत होते. झटकन् माझा हात हातांत घेऊन हळूवारपणें दाबीत त्यांनीं मला माझ्या हस्तरेषा भाग्यरेषा दाखवल्या. त्या रेषेंतलं भाग्य आज स्पष्ट दिसतंय् मला. त्या वेळीं भाग्याभिलाषेमुळें मी त्यांच्या हातांत हात दिला तो तसाच कायम ठेवावा लागला. दोनअडीच मिनिटं माझा हात त्यांच्या हातात होता. तारुण्य लपवून लपत नसतं. कुठल्यांशा गोड संवेदना मला होत होत्या. पण एकदम मी शुद्धीवर आलें. " कोणीं पाहिलं तर. ' म्हणून मी माझा हात त्यांच्या हातांतून सोडवून घेतला. आम्ही बाहेर पडलों.

अन् असेच दिवस जात होते. काल आम्हांला जोडीत होता आमच्यांतला परकेपणा दूर पळाला होता. आम्ही खूप मोकळेपणानं बोलत होतों. आतां तुमच्यापासून कशाला लपवून ठेवूं, नाना ? मला मोठ्यांशीं बोलायला मनापासून आवडत होतं. आम्ही गप्पा मारीत

क्लासांत तासचे तास काढीत असूं. एकदां मी माझी एक मैत्रीण अन् मास्तर मोऱ्यांच्या एका नाट्यप्रयोगालाही गेलों होतों. अर्थात् मी आईची परवानगी काढली होती. त्यांच्या नाट्यकौशल्यानं माझ्या मनाची पक्कड घेतली.

नाना, तुम्ही मोऱ्यांना ओळखत नसाल कदाचित्. पण तुम्ही लग्नाला आलां असतात तर त्यांना पाहून आश्चर्य वाटलं असतं. घरीं कोणीही नाहीं त्यांना. लहानपणापासून मोलमजुऱ्या अन् हलकींसालकीं कामं केलींत त्यांनीं. जीवनाकरतां दशदिशा भटकाव्या लागल्यात. पण एका गुणग्राहकानं त्यांची पुढें पारख केली अन् त्यांना आसरा दिला. त्या सद्‌गृहस्थाच्या मदतीनंच ते पुढें त्यांची आवडती संगीत कला शिकले अन् त्याच कलेच्या जोरावर "मयूर नाट्यम्" मध्यें पुढें आले. पण त्यांच्या या तपश्चर्येमुळं त्यांच्या स्वभावांत माधुर्य आहे, लीनता आहे. त्यांच्या अल्पशा परिचयानं त्यांच्याविषयीं कुणाचंही मत चांगलंच होईल. तसचं माझं झालं होतं. ते मला आवडूंही लागले होते पण ......

त्यानंतर एक दिवस आम्ही असेच "आराम" मध्यें गेलों होतों. त्या दिवशीं त्या संध्याकाळीं मोऱ्यांनीं बोलतां बोलतां एकदम माझं चुंबन घेतलं. मी घाबरलें, बावरलें, अनपेक्षित प्रसंगानं माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला. आपलं कांहीं तरी चुकलं हें मला स्पष्ट समजलं अन् क्षणांत मला मोऱ्यांचा तिटकारा आला. पण आतां त्याचा काय उपयोग ? मी "मोरे" म्हणून मोठ्यांदा ओरडलें. पण ते म्हणाले, "ओरडूं नकोस. शेजारींपाजारीं लोक आहेत." त्याही परिस्थितींत त्यांच्या बोलण्याचं आश्चर्य वाटलं अन् मी म्हटलं, "काय निर्लज्ज-पणा हा !" पण माझं हेंही विधान त्यांनीं हाणून पाडलं. ते उलट आश्चर्यानें म्हणाले, "निर्लज्जपणा ! यांत निर्लज्जपणा कुठला ? उलट नलू, मी किती शान्तपणें सारं आटोपलंय्. शेजारच्या खोलींत सुद्धां आवाज गेला नसेल." आतां मात्र माझा संताप वाढला. मी त्यांना दरडावून विचारलं, "मी ओरडलें अन चार लोक गोळा केले तर?" पण यावर ते मोठ्यादां हंसले अन् म्हणाले "ओ हो ! चार लोक तूं

गोळा करणार ? अन् त्यांना काय सांगणार ? मोऱ्यांनीं माझें चुंबन घेतलं म्हणून ? अन् त्यावर समजा त्यांनीं विचारलं कीं, तूं माझ्या-बरोबर इथं कशी अन् कां आलीस तर काय सांगणार आहेस तूं ? वेडे, तारुण्याचं राजवैभव आहे हें. या देवळांचा मीं पुजारी, गुरव आहें; मग गुरवाचा हक्क नैवेद्यावर असतोच मुळीं. फुकट पूजा कोण करील ? तारुण्याच्या राज्यांतली आनंदाची ललकारी आहे ही. अन त्यांतून तुला वाटतंच असलं तर लोक गोळा करायचा त्रास तूं कशाला घेतेस. मीच तुझ्यासाठीं तें करतो." अन् असं म्हणून त्यांनीं "बॉय" म्हणून हांक देखील मारली. हॉटेलच्या एका कोंपऱ्यांतून "जी साब" असे स्पष्ट आवाज माझ्या कानांवर आले. मला विचार करायलाही वेळ मिळण्यापूर्वी बॉय दार लोटून आंत आला. अन् मोरे मला म्हणाले, "नलू, सांग काय सांगायचंय तें." माझं तोंडहि उघडत नव्हतं. डोकं सुन्न झालं होतं. एकदोन मिनिटं अशीं गेल्यावर मोरे म्हणाले, "का ग नलू, सांगतेस ना ?" माझी असहायता चेहेऱ्यावर लपूंच शकत नव्हती. माझी मुद्रा क्षणांत केविलवाणी झाली अन् मग दोन क्षण थांबून मी कांहींच बोलत नाहीं असं पाहून ते म्हणाले, "बरं तर मी सांगतों." ते काय सांगणार याची कल्पनाही करवली नाहीं मला, तोंच ते म्हणाले, "बॉय, दोन चहा आ.ण." त्यांच्या या वागणुकीचं मला त्याही मनःस्थितींत कौतुक वाटलं माझी असाहाय्यता त्यांनी पूर्णपणें ओळखली होती. अन् चहा घेण्यापूर्वी परत . !!

त्यांतून सुटण्याकरतां घाईघाईनं मी पुढें आलेला चहा गाल पुशीतच घेतला अन् उठून बाहेर आलें. माझ्या मागें तेही पण उठले आजपर्यंत मी कॅशरकडे कधींच निरखून पाहिलं नव्हतं. आज माझं लक्ष त्याच्याकडे गेलं. तो हंसत होता वाटतं.

मी घरीं आलें. मोरेही गेले. मी अस्वस्थ झालें होतें, पण काय करणार ? कुणाला सांगणार ? कुणाची मदत मागणार ? उलट नाना, मला भीति वाटत होती कीं, तुमच्या कानांवर हा प्रकार येता तर तुम्ही......अजूनही मला भीति वाटते. तुमच्याशीं तर बोलणंच शक्य

३०.३.७० का.वां. २०९० बाबाब



मला विचार करायलाही वेळ मिळण्यापूर्वी बॉय दार लोटून आंत आला. अन् मोरे मला म्हणाले, " नलू, सांग काय सांगायचेंय् तें." माझं तोंडही उघडत नव्हतं. डोकं सुन्न झालं होतं.

नव्हतं. अन् सांगूं तरी काय अन् कसं ? कारण कोणीही म्हटलं असतं तूं त्यांच्याबरोबर हॉटेलांत गेली होतीस कशाला मरायला ? अन् खरंच याचं उत्तर माझं मलाच अद्याप सांपडत नाहीं. ती रात्र मी किती विचित्र तऱ्हेनं काढली ! झोंप येईना अन् थोडीफार आली कीं माझ्या गालावर अन् ओंठावर कसली तरी वळवळ होई अन् मी धाबरून उठे.

माझ्या मनांत मी कुठलीशी भीति घेतली होती. दुसरे दिवशीं मी क्लासांत गेलें ती भीतभीतच. नेमके मोरे तिथं हजर होते. त्यांना पाहून तर मी फारच घाबरलें. त्यांच्या डोळ्याला डोळा द्यायचं धाडस माझ्यांत नव्हतं. त्या दिवशीं गायला माझा आवाज लागेना. आवाजांत कंप येत होता कसाबसा तास आटोपून मी लगेच घरीं निघालें. पण रोज काम आटोपल्यावर निदान १५।२० मिनिटं साऱ्यांशीं मी गप्पा मारीत असे. आजची माझी वागणूक निश्चित आश्चर्यकारक होती; म्हणून मास्तर म्हणाले, “ का हो, मिस् चिटणीस ! आज एकदम परत. कांहीं विशेष आहे वाटतं. ” त्यावर मोरे नेमके एकदम म्हणाले, “ मास्तर, विशेष कांहीं म्हणून काय विचारतांय्. पुष्कळ घडलंय सांगेन मग. ”

झाला प्रकार निदान कुणाला कळूं तरी नये असं मला वाटणं स्वाभाविक होतं. म्हणून मी मोऱ्यांना म्हणालें, “ मोरे, जरां बाहेर येतां ? माझं थोडं काम आहे.” ते लगेच बाहेर आले. मी म्हणालें, “ मोरे कृपा करून झाला प्रकार कुणाला सांगू नका हं. कराल ना एवढं नलूकरतां ? ” माझ्या करुण दृष्टीचा त्यांच्यावर चांगलाच परिणाम झाला वाटतं. ते म्हणाले, “ नलूकरतां काय करणार नाहीं ? क्षमा कर मला, चुकलों मी. तूं रागावली तर नाहींसना माझ्यावर ? ” मनाविरुद्ध कां होईना पण मी “ नाहीं ” म्हटलं. अन् खरंच त्यांनीं तो प्रकार कुणालाही कधींच सांगितला नाहीं. जगांत तो कुणालाच माहीत नाहीं. आज तुम्हांला मी माझ्या तोंडानं सांगितलाय् !

सारे प्रकार गुप्त राहिले. लोकांना फसविण्याकरतां मी मोऱ्यांशीं वरवर मोकळेपणानं बोलत होतें. मात्र आम्ही एकांतांत कधींच येत नव्हतों. पण या फसवणुकीनंच शेवट मी फसलें—

क्लासचं गॅदरिंग होतं. सौ. निर्मला भोसलेचं गाणं होतं रात्रीं ८ वाजतां मी आईला विचारून गेलें होतें. अन परतायला वेळ होईल म्हणूनही सांगितलं होतं सुमारें १२-१२।। ला गाणं संपलं. मी अन् माझ्या मैत्रिणी वगैरे घरीं यायला निघालों. मेरे, मास्तर वगैरे बरोबरच होते. मोऱ्यांना आपल्या शेजारच्या "नादरंग" थिएटरात यायचं होतं तालमीला. आपल्याच बाजूला येणारी कुमुद कोठारीहि होती आमच्याबरोबर. मास्तरांनीं जातां जातां आम्हां दोघींना पोंचवायला मोऱ्यांना सांगितलं. अन इतर कांहीं मुलींना पोंचवायला ते स्वतः गेले. वास्तविक तसं करण्यांत मास्तरांच्या दृष्टीनं कुठलंच गौण नव्हतं, अन मलाहि पण सांगायला कुठलीच सबब नव्हती. वाटेंत मोऱ्यांनीं कुमुदला पोंचवलं अन ते मला म्हणाले, "नलू, येतेस खोलीकडून जाऊं. मला पुस्तक घ्यायचय." कुठलं उत्तर द्यावं हेंच समजेना मला. १२-१२।। वाजण्याचा सुमार. रस्त्यानं एकटं येणंही शक्य नव्हतं. नाइलाजानं मी त्यांच्यामागून चालूं लागलें. त्यांची खोली त्या वेळीं "शिकारखान्यांत" होती. ते तळमजल्यावरच रहात होते. आम्ही खोलीवर पोंचलों. मला कांहीं तरी भयंकर वाटत होतं. आम्ही त्यांच्या वाड्यापर्यंत आलों. ते पुढं काय म्हणताहेत तें ऐकायला माझे कान मी टवकारले. पण...ते म्हणाले, "नलू, जरा उभी रहा हो रस्त्यावर. मी आतां येतों पुस्तक घेऊन." माझी मलाच लाज वाटली तें ऐकून. पण पायऱ्या चढतांना ते हंसत हंसत म्हणाले, "पण जरा जपून हो! आमच्या या गल्लींत फार भुतं आहेत." त्यांचं वाक्य संपतय न संपतय तों खरंच भूत मागें लागल्याप्रमाणें मी त्यांच्यामागें पळालें. त्यांनीं मागें पाहिलंहि नव्हतं. ते सरळ पुढें गेले अन् खोलीचं कुलूप काढून ते सरळ आंत शिरले. अंधारांत बाहेर उभं रहायचीहि भीति वाटली अन् मी आंत शिरलें. मी म्हटलं, "दिवा लावाना." पण माझ्या कानावर "दिवा काय करायचाय्" म्हणून आवाज आला. दार लागलं गेलं अन अंधारांतच मला कोणी तरी ओढलं. भूत म्हणून मी ओरडणार तोंच माझं तोंड दाबल गेलं अन माझ्या कानावर आवाज आले, "नलू, ओरडायला काय झालं? मी तुझाच आहे"—— पुढचं काय अन् कसं लिहूं? सुमारे १०-

१५ मिनिटांनींच दिवा लागला गेला. त्यांची खोली मी आजच पाहिली. टेबलावर माझा एक फोटो होता. तो त्यांनीं केव्हां अन् कुठं कसा घेतला होता कोण जाणे! दिव्याच्या उजेडांत त्यांचे डोळे जणूं विजयानें चमकत होते पण मला मात्र अंधेरी आली होती. त्यांनीं मला घरीं पोंचवलं घरांतून बाहेर पडतांना मी कुमारी होतें पण परततांना... फूल इच्छेविरुद्ध कां होईना पण हुंगलं गेलं होतं.

माझं कौमार्य मोऱ्यांनीं प्रगतीच्या शिस्तींत पावलं टाकून आस्ते आस्ते हस्तगत केलं होतं. माझ्या पोटांत आग उसळली होती. चेहेरा भेसूर झाला होता. आईनं मला विचारलं, " काय झालं ? " पण काय सांगूं! दुसरी कुठलीहि गोष्ट मी आईला सांगितली असती, पण ही कशी सांगूं? आईला वाटलं मी कुठें भ्यायलें वाटतं...पण तिनं तें तुम्हांलाही सांगितलं नाहीं.

त्याच दिवसापासून माझी प्रकृति कां कोण जाणे खंगूं लागली. आई उपाय करीत होती. तुम्हांला वाटलं माझं वय झालं म्हणून असं ...अन् म्हणून तुम्ही स्थळं धुंडूं लागलांत. काय बोलावं, काय करावं कुणाला अन्, कसं सांगावं, हेंच मला उमजत नव्हतं. मनांतले गोंधळ जगांतून लपवण्याकरतां मी माझे सारे दैनंदिन कार्यक्रम पार पाडीत होतें. अन् मोऱ्यांशींही मला बोलावं लागत होतं.

त्यांतच तुम्ही फाटकांचं स्थळ पाहिलंत. फाटकांनीं मला पसंत केलं अन् सगळं जमलं. ही बातमी कशी कोण जाणे मोऱ्यांना समजली. त्यांनीं मला एकदां क्लासांतच टोमणा मारला. ते म्हणाले, " आतां कशाला क्लासला येतेस ? मोटेवरचीं गाणीं गायला संगीत शास्त्रपूर्ण असावं लागत नाहीं. गोड गळ्याची पाटलीण सुंदर गाऊन गांव गाजवील. " त्यांच्या बोलण्याचा रोख पूर्णपणें कळूनही मी गप्प बसलें, पण माझ्या गप्प बसण्यानंच ते फार चिडले वाटतं. मी परततांना मला त्यांनीं रस्त्यांत गांठलं अन् म्हणाले, " नलू कुठलीही गोष्ट गुप्त आहे असं समजूं नकोस. मला सगळं समजतंय्! पण तुला पसंत आहे हें ?" मीही उद्धटपणें म्हणालें, "काय झालं नसायला?" त्यावर ते म्हणाले, " नलू, तुला माझं हृदय अद्याप समजूं नये हें दुर्दैव आहे माझं. माझी

अपेक्षा होती कीं......!" पण ते एकदम गप्प बसले. मीही त्यांना जोरांत विचारलं, "कसल्या अपेक्षा होत्या तुमच्या?" अन् ते ओरडून म्हणाले, "झालेल्या साऱ्या गोष्टी गुप्त ठेवून तुझं भावी जीवन सुखाचं व्हावं म्हणून तरी तूं नाकारशील. तुझं सौभाग्य आज माझ्या हातांत आहे. डिवचला गेलेला नाग डाव धरतो हें विसरूं नकोस. माझ्या मनांत आलं तर......पण जाऊं दे. पुढं काय होतंय् तें फक्त पहा." ज्या गोष्टीला मी नेमकी भीत होतें तीच गोष्ट ते बोलले. मी घाबरलें अन् "मोरे" म्हणून एक केविलवाणी हांक मारली. अन् मग ते शांतपणें म्हणाले, "नलू तूं शहाणी आहेस; झाल्या गोष्टी कशाही असोत, पण आज मला डावलून माझ्या दुःखावर तूं फाटकांना माळ घालून स्वतःचं सुख उभारूं पाहत असशील तर माझ्या घराचं फाटक तुलां सदैव बंद राहीलच, पण माझ्या संतापलेल्या मनाला त्यांत अपमान वाटून सूड म्हणून फाटकांच्या घराचीं दारं तुझ्याकरतां बंद करायला मला कितीक वेळ लागेल! मग फाटक नाहींत, नाना नाहींत, अन् मीही नाहीं. काय करायचं तें तूंच ठरव. तूं माझी झालीस तर माझं हृदयमंदिर तुझ्या प्रेमाकरतां मोकळंच आहे. तूं मला पाहिजे आहेस. जास्त काय सांगू? विचार कर अन् मार्ग दिसेल अन् रुचेल अर्थात् भावी आयुष्यांत पचेल, त्या मार्गानं जा."

अन् नाना, पुष्कळ विचार केला मी. मला कुठलाच मार्ग दिसेना.

नाना, या परिस्थितींत मी तुमच्या म्हणण्याप्रमाणें फाटकांशीं लग्न केलं असतं तर संतापानं अन् अपमानानं चिडलेले मोरे काय करूं शकले नसते? सारं सत्य होतं. त्यांत असत्य कांहींच नव्हतं. मग हें जर पुढेंमागें फाटकांना समजलं असतं तर त्यांच्या मनांत त्यांनीं जी मूर्ति उभी केली होती तिचं काय झालं असतं! असला प्रकार त्यांच्या कानीं गेला असता तर लग्नमाळा निर्माल्य होण्यापूर्वीच माझी जीवन-वेल........त्याचं काय झालं असतं, तुम्हीच मनांत कल्पनेनं तें दृश्य उभारा. कदाचित् अंगच्या वस्त्रानिशीं घराबाहेर पडावं लागलं असतं मला. मग मी कुणाकडे जाऊं शकलें असतें? कुठलं दार माझ्याकरतां उघडलं असतं?

किंवा मी म्हणतें, फाटक देवतास्वरूप आहेत. त्यांनीं मला क्षमाही केली असती. पण देवतेची पूजा का निर्माल्यानं करायची? मर्जीविरुद्ध का होईना पण हुंगलं गेलेलं फूल पूजेला चालत नाहीं.

भीषण भविष्य मला भिववीत होतं. "माझी हो अगर सगळ्या जगांतून उठ." हेंच ठराविक उत्तर मला मोरे देत होते. माझी कुठलीच गोष्ट ते ऐकायला तयार नव्हते. घरांत तर लग्नघाई चालली होती. मी तुम्हांला काय अन् कसं सांगणार? कुठलीच गोष्ट शांतपणें तुम्ही कधींच ऐकून घेतली नसती.

दिवा मालवण्यापेक्षां तेववणंच चांगलं नाहीं का? जीवनाचा नाश करण्यापेक्षां मग त्याग कां करूं नये. माझे विचाराचे वारे बदलले अन् पूर्ण विचार करून मी मोऱ्यांना म्हटलें : "मी तुमची झालें तर?" आनंदातिशयानं ते म्हणाले : "तर मला अस्मान ठेंगणं वाटेल. झालेला अपमान धुवून निघेल एका गरीब अबलेच्या जीवनांत केवळ द्वेषानं विष कालवण्याचं पाप वांचेल. तुझ्या जीवनांस निवारा मिळेल."

अन् मग निश्चित विचारांतीं मी मोऱ्यांशीं लग्न करायचं ठरवलं अन् म्हणून तुमच्या घरांतून मला जावं लागलं. जाण्यापूर्वी मी आईला सारं सांगितलं होतं, पण तिलाहि तुम्हांला सांगायचं धाडस नव्हतं.

क्षमा करा, नाना. तुमच्या अब्रूकरतां, माझ्या अब्रूकरतां, फाटकांच्या अब्रूकरतां अन् मोऱ्यांच्या प्रेमाकरतां तुमच्या नलूनं हा मार्ग स्वीकारलाय. स्वतःच्या आशा आकांक्षांचा होम करून तिनं स्वतःच्या त्यागानं तुमची अब्रू वांचवली असंच वाटतं मला. मनाप्रमाणें मनाला पटेल त्या मार्गानें लग्न लावणं ही बेअब्रू नव्हे. पण कौमार्यभंगाचा नगारा लग्नानंतर वाजणं ही मात्र नक्कीच बेअब्रू होती असं मला वाटतं. मला वाटतं, नाना तुम्हांलाहि तें पटेल. अन् तसं झालं असतं तर फाटकांच्या हृदयाचे तुकडे झाले नसते कां? मी झिडकारलं म्हणून मोरे कष्टी झाले असते. त्यांना त्यांत निश्चित अपमान वाटला असता. त्यांनीं साऱ्या गोष्टींवर प्रकाश पाडला असता. मगही तुमची अब्रू नक्कीच गेली असती. तुम्ही दुःखी झाला असतां. मग त्यापेक्षां मी स्वतःच्या "तुमच्या कल्पनेप्रमाणें सुखाचा" त्याग करून मोऱ्यांना सुखी करूं

शकलें. तुमची भयंकर बेअब्रू वांचवली. फाटकांच्या हृदयाचे तुकडे नाहीं होऊं दिले त्यांत नाना, माझं काय अन् कुठं चुकलं सांगा.

आणि म्हणून मी त्या पहाटे मोऱ्यांबरोबर तुमच्या घरांतून तुम्हांला साऱ्यांना सोडून निघून गेलें. मायेचे सारे पाश तटातट तोडतांना माझ्या शिरा नसतील तुटल्या असं कां तुम्हांला वाटत!

पण.........तुमच्या घरून निघाल्यानंतर अन् माझा मार्ग निश्चित ठरल्यानंतर मला समजलं मी सांपळ्यांत सांपडलें होतें. गोड गळ्याची मैना सांपळ्यांत सांपडली गेली. नाना, तुम्हांला माहीतच आहे कीं, मोरे उत्तम नट आहेत. अन् तसेच ते महत्त्वाकांक्षीहि पण आहेत. कळूं लागल्यापासून आपली स्वतःच्या मालकीची एक कंपनी काढण्याची इच्छा त्यांना होती. कल्पना पूर्णत्वांत येण्याचे सुमारासच मोऱ्यांची अन् माझी ओळख झाली. माझ्या गोड आवाजावर ते खुष झाले अन् आपल्या कंपनीकरतां असली गोड नटी मिळाली तर... अशी एक कल्पना त्यांना आली. सामोपचारानं तें शक्य नव्हतं. मला नाटकांत काम करायला तुम्ही परवानगी देणं शक्य नव्हतं आणि मीहि केलं नसतं म्हणून या मार्गानं त्यांनीं मला आपलंस केलं. मास्तराची पत्नी मास्तरीण, वकिलाची पत्नी वकिलीण, तशीच नटाची पत्नी नटी झाली. लग्नाच्या दुसऱ्याच दिवशीं आमच्या स्वतःच्या कंपनीचा मुहूर्त झाला. "कलाप्रेम" मंडळाचा "स्थितीचा किंकर" हा नाट्यप्रयोग आपल्याला आपल्या जवळच्याच "नादरंग" मध्यें लवकरच पहायला मिळेल. त्यांत माझी महत्त्वाची भूमिका आहे. थिएटरवर प्रेक्षकांची झुंबड उडेल. आपण अवश्य या हं. मला अगोदर कळवा तसं. कारण नाटक पाहून आपल्याला पडलेलं सारं कोडं उलगडेल. एक सत्यकथा रंगवलीय आम्ही. अन् तुम्हांला माहीत आहे ती कथा—

मला आतां असं समजतय्; पण मला वाटतं तुम्हांला अद्याप आठवत असेल, मी दोन तीन वर्षांची असतांना आपल्याकडे "येश्या" नांवाचा एक पोऱ्या होता. तुम्ही त्याला किरकोळ कारणावरून केवळ तुम्हांला वाटतं म्हणून खूप मारून पगार न देतां हांकललंत. त्याबद्दल तुमच्यावर आई देखील रागावली असं समजतय्. पण तुम्ही मुळीं

कधीं चुकतच नाहीं. त्या पोऱ्याचं पुढं काय झालं ठाऊक आहे? त्यालाही पुढं एक गुणग्राही माणूस मिळाला. त्यानं संगीताचं शिक्षण घेतलं अन् पुढं " मयूर नाट्यम् " मध्यें नांव कमावलं तेंच हे यशवंतराव मोरे !

जास्त काय लिहूं. तितकी मनःस्थितीहि नाहीं. आईला सांगा रागावूं नकोस. क्षमा कर नलूला. भाऊला सांगा, भाऊ, तूं तोडलेलं नातं ताईचे अश्रू परत जोडील. नातं अन् प्रेम तोडूं म्हणून तुटत नसतं. श्री. फाटकांना म्हणावं, क्षमस्व ! मी कदाचित् त्यांनाच एखादं पत्र टाकीन. अन् नाना, हें पत्र वाचूनहि तुम्हांला वाटलं कीं नलू चुकली, तर ती मेली म्हणून सोडून द्या. यानंतर कदाचित् आपली दृष्टादृष्टही होणार नाहीं.

दया असावी.

तुम्हांला कदाचित् कायमची अंतरलेली

तुमची मुलगी

**सौ. नलू मोरे**

× × ×

नानासाहेबांनीं पत्र मिटलं. १५।१७ वर्षांपूर्वींचा तो बावळट 'येश्या' त्यांच्या डोळ्यांपुढं थैमान घालीत होता.

# मुलीचें लग्न : : ३

पुण्यांतील प्रसिद्ध उंबऱ्या गणपतीजवळच्या माझ्या घरांतून निघून मी सरळ रस्त्यानें सिटी पोस्टाकडे चाललों होतों. सेवासदन संस्थेच्या इमारतीजवळ मी गेलों, तेव्हां दोन मुली त्या इमारतीच्या पायऱ्या उतरून मी येत असलेल्या दिशेकडे तोंड करून पुढें येऊं लागल्या.

त्यांपैकीं एका काळेल्याशा मुलीकडे पाहतांच मी थबकून उभा राहिलों. मला पाहतांच ती मुलगीही हंसली, आणि तिनें मला नमस्कार करण्यासाठीं हात जोडले.

"काय, कालिंदी," हंसत उलट नमस्कार करीत मी म्हणालों, "केव्हां आलीस इथं?"

"झाले आठदहा दिवस" तिनें सांगितलें.

"आठदहा दिवस?" मी उद्गारलों, "एकटीच आलीयेस् कीं..."

"नाहीं, एकटी नाहीं बुवा, अप्पा आलेतना बरोबर..."

"अरे वा! माझं घर इथून जवळच जरा पुढें गेलं कीं आहे!"

माझ्या बोलण्याचा रोख कालिंदीनें ओळखला, आणि ती मोकळेपणानें हंसून म्हणाली, "हो, आहे ठाऊक. तसं कांहीं पुणं बदललेलं नाहीं! पण आम्ही उतरलों आहोंत रास्ता पेठेंत. तिथून..."

मी हंसत असलेला पाहून आपली न येण्याची सबब पटण्यासारखी नाहीं हें तिनें ओळखलें आणि ती झट्कन् म्हणाली, "अप्पा रोज तुमच्याकडं यायचं यायचं म्हणतात, पण कामामुळं तें राहून जातं."

"तूं सुद्धां त्यांना मदत करत्येस् वाटतं?"

" हो, तसं म्हणायला कांहीं हरकत नाहीं. पण माझं मला काम आहेच कीं."

" कसलं ? "

" अहो कसलं काय ? अभ्यास ! "

अरे हो खरं, तूं यंदा मॅट्रिकच्या परीक्षेला बसणार आहेस नाहीं का ? केव्हां आहे परीक्षा ? "

" पुढच्या एकोणीस तारखेला— "

" असं... म्हणजे महिना आहे अजून जवळजवळ. मग इतक्या लवकर येऊन करत्येस् काय ? "

" वा ! म्हणजे पुण्यांत यायला अगदीं आगगाड्यांसारखं Time Table केलं पाहिजे वाटतं ? "

आम्ही तिघंही हंसूं लागलों.

" बरं मग आमच्याकडे केव्हां येणार आहेस ? " कालिंदीबरोबर दुसरी एक अनोळखी मुलगी असल्या कारणानें मी बोलणें आखडतें घेतलें.

" उद्यां दुपारीं अगदीं नक्की."

" किती वाजतां ? "

" अं...साडेतीन–चारला."

" अच्छा ! " असें म्हणून मी चालूं लागलों.

* * *

सांगितल्यप्रमाणें कालिंदी दुसरे दिवशीं चारच्या सुमारास माझ्या घरीं आली. ती आल्याबरोबर मी म्हणालों, " अगदीं आगगाडी-सारखी वेळेवर आलीस ! "

" हें आमचं Terminus होतंना पूर्वीं, मग कशी नाहीं येणार ? "

तिच्या समयसूचक उत्तराचें मला कौतुक वाटलें. सुमारें अडीच वर्षां-पूर्वीं कालिंदी माझ्या वाड्यांत बिऱ्हाडकरू म्हणून राहत होती. तिचे वडील रेल्वेंत नोकरीला होते. त्यांची पुण्याला बदली आली तेव्हां त्यांना जागेची मोठी पंचाईत पडली. त्यांचं आणि माझं कांहींतरी नातं लागत होतं--काय तें मला कधींच उलगडलेलं नाहीं–त्याचा फायदा घेऊन त्यांनीं माझ्या मालकीच्या प्रशस्त वाड्यांत, कसंही करून, कांहीं

दिवसांपुरत्या दोन खोल्या तरी देण्याची मला विलक्षण गळ घातली. मी माझ्या अडचणी त्यांना सांगितल्या. त्यांना जागा द्यावयाची म्हणजे कांहीं भागांत सामायिक वापर करावा लागणार होता. त्यांतून कांहीं कटकटी उत्पन्न होतील असेंही मीं सुचविलें. पण ते म्हणाले, " त्याची तुम्हांला बिलकुल चिंता नको. तुम्हांला माझ्या घरांतल्या कोणत्याही माणसाकडून कसलाही उपद्रव होणार नाहीं असं मी म्हटलं म्हणजे नाहींच होणार!"

विचार करून, बायको नको म्हणत होती, तरी भिडेला बळी पडून, मी त्यांना सांगितलें, " बघा, तुम्हांलाच तें त्रासदायक होईल. पण तुमची नडच आहे म्हणून मी थोडीशी जागा तुम्हांला वापरायला म्हणून देतों. भाड्यानें नव्हे. मला तुमच्याकडून भाडें मुळींच नको. तुमची तात्पुरती सोय मी करीत आहें हें लक्षांत बाळगून तुम्हांला चार-दोन महिने येऊन रहायचं असेल तर रहा."

अप्पांच्या कुटुंबांत चार मुलें आणि तीं स्वतः नवराबायको अशीं सहा माणसें होतीं. पैकीं अप्पा वगळून बाकीचीं माणसें मला आवडलीं. दोन मुलें लहान होतीं. त्यांच्याबद्दल विशेष प्रश्न नव्हताच. पण निर्मला वहिनी, कालिंदी आणि तिच्यापेक्षां दीड वर्षांनीं मोठा असलेला भाऊ परशुराम, ही मंडळी समयोचित वागणारी होती. प्रत्यक्ष आपल्या मित्रानें नेहमींच आपल्याशीं एकाच पद्धतीनें सलगी केलेली आपणांस आवडते असें नाहीं. कांहीं वेळेला मित्रसुद्धां आपल्याकडे येऊं नयेत असें वाटतें. कांहीं कांहीं वेळां त्यांची मूक सहानुभूतिच आपल्याला प्रेमळ वाटते. अप्पांच्या या जाणत्या मंडळींत दुसऱ्यांचा 'मूड' जाणून त्याप्रमाणें वागण्याची एक विशेष हातोटी मला दिसून आली. त्या कारणानें तीं आम्हांला लवकरच हवींहवींशीं वाटूं लागलीं. अप्पांच्या वागणुकींत गैर कांहींच नव्हतें. व्यवहार संभाळण्यांत ते अगदीं कुशल होते. पण त्यांच्यांत विनोदप्रियता, सहृदयता मला कमी दिसून आली. पण माझ्या मतानें त्यांच्यांत असलेली ही उणीव माझ्या घरांत त्यांना राहूं न देण्यासारखी मुळींच नव्हती.

तेव्हां, कालिंदीच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, माझें घर हें त्या मंडळींचें दोन–सवा दोन वर्षे Terminus होतें. पुण्याहून अप्पा बदलून गेल्यानंतर एकदांच त्यांची आणि माझी भेट झाली होती. त्या वेळीं ते मला जरा फिकिरींत दिसले, कारण त्यांच्या मोठ्या मुलाची प्रकृति नीट नव्हती. आमचें घर सोडल्यापासून कालिंदी मात्र काल प्रथमच मला पुण्यांत दिसली होती.

कालिंदी आमचें घर सोडून गेली तेव्हां माझें कुटुंब दोनच माणसांचें होतें, तें आतां तीन माणसांचें झालें होतें. कालिंदीला ही गोष्ट ठाऊक नव्हती, तेव्हां अर्थातच माझ्या पत्नीच्या कडेवर एका गोंडस मुलाला पाहिल्याबरोबर ती चकित झाली आणि अतिशय आनंदली. " अय्या! " ती ओरडली, " ताई, तुमचं का बाळ ? "

पत्नी नुसतीच हंसली.

कालिंदीनें विचारलें, ' मुलगा का मुलगी ? '

" ओळख पाहूं ! "

" मुलगी."

" हं. पुष्कळ जण फसतात पण या भुंड्या नारळावरून ! "

कालिंदीनें बाळाच्या भुंड्या डोक्यावरून गमतीनें हात फिरविला, आणि त्याला आपल्याजवळ घेत तिनें विचारलें, " नांव काय ठेवलंयत् बाळाचं ? "

" वासंती. "

" ओ हो गोड नांव ! " असें उद्गारून कालिंदीनें वासंतीचे पटापट पापे घेतले.

मग आम्ही स्वैपाकघरांत जाऊन बोलत बसलों.

अप्पा बदलून गेले होते त्या गांवची–अंगारीची–रहाणी, तेथलि रेशनिंग, शाळा वगैरेसंबंधींची बोलणीं संपल्यानंतर मी सहज म्हणालों, " इथून गेल्यापासून तूं जरा काळी दिसायला लागल्येस् ! "

" म्हणजे तुम्हीं मला गोरी ठरविली होतीत कीं काय ? "

" गोरी नाहीं, पण उजळ दिसत असस तूं. "

" मग आतां मला पुन: पुण्यांत येऊन राहिलं पाहिजे ! अन् तें सुद्धां तुमच्याच जागेंत ! "

आम्ही हंसूं लागलों. माझी पत्नी हंसत हंसत म्हणाली, " अग, आतां पुण्यांतलाच नवरा पहा म्हणजे झालं. हक्काची जागा होईल."

" अहो, पण आधीं उजळ झाल्याशिवाय पुण्यांतला नवरा मला मिळेल कसा ? काळी म्हणून मला इथं नाकारतात ! "

" अस्सं, " मी उद्गारलों, " म्हणजे नवऱ्यांच्या पाठीवर तूं पुण्यास आल्येस् तर ! पत्ता लागून् दिला नाहींस पण इतका वेळ ! "

" माझ्यासारख्या मुलीला पुण्यांत आलेली पाहिल्यानंतर म्हटलं तुम्ही सहजच तर्क कराल ! "

" तुझ्यासारख्या मुलीला पाहिली म्हणूनच मीं तसा तर्क केला नाहीं. दुसरी कोणी असती तर केलाही असता तसा तर्क. "

" म्हणजे, माझं लग्न होणं शक्य नाहीं असं तुम्हांला वाटतंय् कीं काय ? "

मी खो खो हंसूं लागलों. पत्नी म्हणाली, " अग, तुझी पुष्कळ शिकण्याचीं मनोराज्यं होतींना ? म्हणून म्हणत असतील हो हे असं ! खरं ना ? "

" बरोबर तर्क केलास ! " मी म्हणालों, " कालिंदी, घाबरूं नकोस तूं. कुठल्याही माणसाचं, हात धरून, तुझ्याशीं लग्न लावून दाखवीन मी ! "

" पुण्यांतले वर तुमच्या मुठींत दिसतात कीं ! विवाहमंडळांना कळविलं पाहिजे तुमचं नांव ! "

" बरं, थट्टा जाऊं दे, कालिंदी, " मी म्हणालों, " पण तूं लग्नाला तयार झालीस कशी तें सांग. "

" अहो, लग्नाला तयार होऊं नको तर करूं काय ? मुलगी पडलेंना मी ? अप्पांनीं ठरवलं मॅट्रिकपर्यंत शिक्षण मुलीच्या ' जातीला ' पुरे. वेळेवर खेळ झालेला बरा. शिवाय परशुराम माझ्याबरोबरच मॅट्रिक होणार. त्याचं अन् माझं दोघांचीं शिक्षणं कशीं जमणार ? "

" पण परशुराम तुझ्यापुढं होताना एक वर्ष ? "

" हो होता, पण मध्यें त्याला कितीतरी दिवस मलेरिया लागला होता...अगदीं क्षयावर जातं कीं काय अशी भीति उत्पन्न झाली होती. त्यामुळें त्याचं एक वर्ष बुडालं. अजूनसुद्धां त्याला मधूनमधून खोकला होत असतो."

" अस्सं? तेव्हां वेळेवर खेळ करायचं ठरवून अप्पांनीं तुला जोडी-दार पाह्यला सुरुवात केली म्हणतेस. हं, मग किती ठिकाणीं दाखविलं तुला आतांपर्यंत ?"

" अप्पांच्या डायरींत आहे ती सगळी नोंद !" कालिंदीनें खुबीनें उत्तर देण्याचं टाळलं.

" पण काय ग," माझी पत्नी म्हणाली, " तूं अगदीं एकदांसुद्धां अप्पांजवळ म्हणाली नाहींस का कीं मला पुढं शिकायची हौस आहे म्हणून ?"

" म्हणालें तसं एकदोनदां; पण आमचं डोकं पडलं सामान्य, तेव्हां फ्रीशिप, स्कॉलरशिप मिळण्याचा मला कांहीं संभव नाहीं. मग कशाच्या जिवावर मी हट्ट धरून बसूं? परशुराम आमचा चांगला स्कॉलर आहे, तेव्हां त्याच्यावर अप्पांची मदार आहे, व त्याला ते पुष्कळ शिकविणार आहेत. माझं लग्न करून दिलं म्हणजे त्यांना एका जबाबदारींतून सुटल्यासारखं वाटेल. अन् आमच्या अप्पांचं असं आहे. एकदां एखादी गोष्ट करायची त्यांनीं ठरविली कीं त्यांचा बेत सहसा बदलायचा नाहीं.

" बरं, लग्न झाल्यावर शिक आतां" तिचें सांत्वन करण्याकरितां मी म्हणालों, " अप्पांजवळ तुझा हट्ट नाहीं चालला तरी नवऱ्याजवळ नक्की चालेल."

" तो कसा काय ?"

" कारण जसा बालहट्ट कठिण तसा स्त्रीहट्टही कठिण म्हणतात !"

" हो, हो," माझी पत्नी ओरडली, " तो फक्त कपड्यांचा अन् दागिन्यांचा !"

" नाहीं तरी बायकांना दुसरं हवं असतं काय ?" मी उगीच कांहीं-तरी बोलून गेलों.

"तुमचा प्रेमविवाह झालेला असून तुम्हीसुद्धां कसं हो असं बोलतां?" कालिंदीनें मला टोमणा मारला.

मी जरासा ओशाळलों आणि विषय बदलला.

आमचं चहा, खाणं, वगैरे आटोपल्यानंतर सुमारें अर्धा-पाऊण तास कालिंदी माझ्याकडे बसली होती. मग ती निघाली तेव्हां तिला पोंचविण्याकरितां मी वाड्याच्या बाहेर रस्त्यापर्यंत गेलों. आम्ही कांहींतरी बोलतच होतों, इतक्यांत तिनें झट्कन् मला नमस्कार केला, आणि ती जरा घाईनें चालूं लागली.

तिचें तें जाणें मला जरा चमत्कारिक वाटलें. वाड्यांत परत शिरण्याकरितां मीं तोंड वळविलें तों माझा मित्र अनंता हंसत माझ्या अगदीं जवळ आलेला दिसला.

"काय अंताजी!" मी उद्गारलों, "जरा आधीं आला असतास तर तुझी एका फक्कड मुलीशीं ओळख करून दिली असती!"

"कोण? आत्तां तुला नमस्कार करून गेली तीच कीं काय?"

"हो."

अनंता क्षणभर कालिंदी चालली होती तिच्याकडे पाहत राहिला, तेवढ्यांत तिनेंही जरा मागें वळून पाहिलें. मग अनंता म्हणाला. "तिला तूं फक्कड म्हणतोस वाटतं?"

"वा! फक्कड नाहीं वाटतं? बाकी तुम्हां आजकालच्या पुणेंकर तरुणांना गोल पातळाशिवाय कोणतीही मुलगी कसली फक्कड दिसते म्हणा! पण तिच्याशीं तूं थोडा वेळ बोलला असतास म्हणजे कळलं असतं तुला कशी चुणचुणीत पोर आहे ती!"

"अं:!" अनंता हेटाळणीच्या स्वरांत उद्गारला, "मॅट्रिक शिकलेली मुल..."

पण तो एकदम अडखळला. तेव्हां त्याच्याकडे आश्चर्यानें रोंखून पाहत मी म्हणालों, "म्हणजे तुझ्या माहितीची आहे वाटतं ही मुलगी?"

"छे छे!" स्वतः वाड्याच्या दारांतून आंत शिरून मला आत ओढीत अनंता म्हणाला, "अरे सुतानं स्वर्गाला जातां आलं पाहिजे. बरं, जाऊं दे तें. आज नाटकाला येणार आहेस काय?"

अनंतानें सरळ थाप मारली होती हें मी तावडतोब ओळखलें. शिवाय, त्याला पाहिल्यामुळेंच कालिंदी मला नमस्कार करून घाई-घाईनें निघून गेली असली पाहिजे असें मला वाटलें, आणि म्हणून माडीवर माझ्या खोलींत आम्ही जाऊन बसल्याबरोबर मीं त्याला छेडा-वयाला सुरुवात केली.

पण मला फार छेडावें लागलेंच नाहीं. अनंतानें चट्कन् कबूल केलें कीं, कालिंदीची आणि त्याची 'तोंड' ओळख झालेली होती.

"तोंडओळख म्हणजे ?" मी खवचटपणानें विचारलें.

"म्हणजे तिचा चेहरामोहरा पाहून झालाय् माझा. आतां जास्त जवळ यावं कीं काय हें विचारण्यासाठींच आलोंय् तुझ्याकडे मी! मला कळलं ही मुलगी तुझ्या माहितीची आहे.

"अरे गुलामा," मी आनंदानें ओरडलों, मला बनवीत होतास काय ? बरं, बोल आतां—कुठपर्यंत झाल्यैय् प्रगति ? तुला पसंत आहे कीं नाहीं मुलगी ? तुझ्या घरचीं माणसं काय म्हणतात ?"

"घरच्या माणसांना पसंत आहे सगळ्यांना. फक्त आमच्या कुमु-दला मात्र ती पसंत नाहीं. तिच्या मतानें ती काळी आहे, आणि तिच्या नाकाचें बोंड जरा वर उचललेलें आहे! पण मी तिला सांगितलं, असलंच नाकाचं बोंड मला आवडतं, कारण त्यामुळें नाकांतील सिमिट्री नजरेंत भरते!"

"अस्सं, म्हणजे तुला पसंत आहे तर ती ? मग मघांशीं मीं तिला फक्कड म्हटलं तेव्हां कां रे नाक उडवलंस ? तुझ्या नाकाची सिमिट्री दाखवायला कीं काय ?"

"बरं थट्टा राहूं दे. ती फक्कड नाहीं, पण बरी आहे. अन् तिच्या काळसर नाकावरील चमकी तिला फारच खुलून दिसते. आतां पुढचं बोल."

"पुढचं काय बोलायचं ? सांगायचं मुलीच्या बापाला मुलीचं नाक पसंत आहे म्हणून! आणि हुंड्यांत फारसं ओढून धरायचं नाहीं कीं बसलीच वेसण अंताजीरावांना !!"

थट्टा बंद करून मी कालिंदीची सगळी हकीगत अनंताला

सांगितली तेव्हां स्वारी खुष झाली. कालिंदीची उठावणी करण्यांत माझ्या पत्नीनेंही भाग घेतला तेव्हां तर तो चांगलाच रंगांत आला.

दुसरे दिवशीं सकाळीं कालिंदीचे वडील, अप्पा, माझ्याकडे आले, आणि अनंतासंबंधीं माहिती काढूं लागले तेव्हां त्यांचीही आम्हीं खूप उटावणी केली. अनंता माझ्याकडे आल्याचेंही मीं सांगून टाकलें आणि त्याला स्वतःला आणि त्याच्या घरांतील सर्व मंडळींना कालिंदी पसंत असल्याचा 'रहस्यस्फोटही' मीं त्यांच्याजवळ करून टाकला.

वरपक्षाकडून औपचारिकरीत्या 'पसंती' कळल्यानंतर मग ठरवा-ठरवी करूं असें बोलून आणि त्या वेळीं हजर असण्याचा मला आग्रह करून अप्पा निघून गेले.

ज्या दिवशीं अप्पा माझ्याकडून येऊन गेले त्याच दिवशीं वरपक्षा-कडून 'पसंती' कळविली गेल्याचें मला समजलें, आणि ठरवाठरवीचा दिवस, जागा आणि वेळही मुक्रर झाल्याचें कळलें.

कालिंदीचें अनंताशीं लग्न ठरणार आणि ठरल्यानंतर लगेच तें होऊन जाणार याबद्दल मला खात्री वाटूं लागली.

पण मुली नकट्या नसल्या तरी त्यांच्या लग्नांत विघ्नें येतच नाहींत असें थोडेंच आहे! 'लग्न पहावें करून' अशी जी म्हण पडली आहे ती उगीच नाहीं!

'बोलणीं' करण्याचा जो दिवस ठरला होता त्याच्या आदल्या दिवशीं दुपारीं सुमारें दोनच्या सुमारास अप्पांना त्यांच्या घरून तांतडीची तार आली कीं, परशुराम आजारी आहे. तावडतोब निघून या.'

मुलाच्या आजाराची तारेनें बातमी कळल्याबरोबर अप्पांना धक्काच बसला. दोन–चाळीसची गाडी गांठावयाचें त्यांनीं ठरविलें, आणि घाईघाईनें कांहीं खरेदी केली. प्रथम कालिंदीलाही बरोबर नेण्याचा त्यांचा विचार होता, पण आयत्या वेळीं जवळपास कोठें टांगा मिळेना तेव्हां ते एकटेच जावयास निघाले, आणि अगदीं जरूरीपुरतें सामान घेऊन त्यांनीं एकदम स्टेशनची वाट धरली. जातां जातां त्यांनीं कालिं-दीला सांगितलें, "गेल्याबरोबर पत्र पाठवितों मी."

कालिंदी म्हणाली, “ नको तारच करा. अन् दर दोन दिवशीं अगदीं अवश्य पत्र टाका. ”

“ हो, हो, टाकीन. अन् हें पहा आज संध्याकाळीं नाहीं तर उद्यां सकाळीं तरी विनायकरावांकडे ( माझ्याकडे ) जा, अन् त्यांना सांग सारी हकीकत. अन् त्यांना म्हणावं तुम्हीच त्या वेहेऱ्यांकडे कळवा अन्...पण तें करतीलच काय तें. आला तुला इथं कंटाळा तर चार दिवस विनायकरावांकडे गेलीस तरी चालेल. ”

अप्पा गेले त्याच दिवशीं संध्याकाळीं कालिंदी माझ्याकडे आली आणि तिनें सर्व हकीगत मला सांगितली. ती अगदीं घाबरून गेलेली मला दिसली. तिला धीर देण्यासाठीं मीं म्हणालों, “ तिथं घरांत कुणी नाहीं म्हणून तुझ्या आईनं तार केलेली असेल. आधींच ती घावरट, त्यांतून त्याला मागं दुखणं येऊन गेलेलं. तापबीप आला असेल एकदम, अन् तो उतरला नसेल, म्हणून केली असेल तार. ”

कालिंदीनें नुसतेंच ‘ हं ’ केलें आणि जरा थांबून ती म्हणाली, “ असेल साधाच ताप. पण त्याला खोकला ताबडतोब होतो अन् तो अशक्त आहे म्हणून भीति वाटते. ”

“ तें साहजिक आहे ” मी म्हणालों, “ पण करणार काय ? सगळंच आपल्या मनासारखं कुठं होतं ? ”

नंतर मी उठलों आणि बाहेर जाण्याची तयारी केली. माझा विचार अनंता वेहेऱ्याकडे जाण्याचा होता; आणि तसें मी कालिंदीला सांगितलें. त्यावर ती म्हणाली, “ तुम्ही सांगाल तें त्या माणसांना खरं वाटेल का नाहीं कुणास ठाऊक ? ”

“ वा ! खरं न वाटायला काय झालं ? अशी कांहीं आपत्ति येत नाहीं वाटतं कधीं कुणावर ? ”

“ येते, पण हीं वरपक्षाकडलीं माणसं निमित्ताला टेंकलेलीं ! ”

“ नाहीं, पण हीं वेहेरेमंडळी सरळ आहेत. शिवाय मी सांगितल्या-नंतर त्यांचा विश्वास बसेल. ”

“ त्यांचा विश्वास बसला तरी ती आमच्यावर विसंबून थांबतीलच असें कशावरून ? ” कालिंदीनें आशंका काढली.

" नाहीं थांबली तर नाहीं. तुला त्यांत विशेष वाईट वाटणार आहे का ? " मी म्हणालों आणि तिच्या चेहऱ्याकडे निरखून पाहूं लागलों.

कालिंदी गोंधळली आणि तिनें माझ्याकडे पाहण्याचें टाळलें. त्यावरून तिचें मन मला स्पष्ट कळून आलें. " कालिंदी, " आरशांत पाहून डोक्यावरील टोपी नीट करीत मी म्हणालों, " तूं काळजी करूं नको. अनंता माझा चांगला मित्र आहे. हें स्थळ मी हातचं जाऊं देणार नाहीं. इतकं कशाला ? परशुरामाला जरा बरं वाटल्याचं कळलं कीं मीच तुझा अनंताशीं वाङ्निश्चय करून टाकतों. मग तर झालं ! "

" इश्श् ! " कालिंदी उद्गारली, पण तिच्या चेहऱ्यावरचा संभ्रम मला अतिशय गोड वाटला.

" तुला अप्पांचं पत्र आलं " माझ्या खोलींतून बाहेर पडतां पडतां मी तिला म्हणालों, " कीं तूं माझ्याकडे रहायलाच ये. "

* * *

अप्पांची प्रथम तार आली ती विशेष आशादायक नव्हती. कालिंदी अस्वस्थ झाली आणि भावाला भेटायला जाण्याचें बोलूं लागली. मीं तिला सांगितलें तारेंतला मजकूर विशेष आशादायक नाहीं तसा निराशाजनकही नाहीं. तारेंतील मजकूर स्पष्ट असूं शकत नाहीं. अप्पांच्या पत्रावरून जर परिस्थिति गंभीर वाटली तर मग तूं जा.

कालिंदीनें माझें ऐकलें.

तीन दिवसांनंतर अप्पांचें पत्र आलें. त्यावरून आमची चिंता पुष्कळच कमी झाली. परशुरामाचा ताप उतरला होता आणि खोकलाही कमी झाला होता.

कालिंदी आनंदी दिसूं लागली ; आणि मग ती माझ्याकडे रहावयालाही आली. कालिंदीच्या आणि माझ्या मित्राच्या लग्नांत उत्पन्न झालेलें विघ्न टळलें. आतां परशुरामाला चांगलें बरें वाटलें कीं अप्पा पुनः पुण्याला येतील आणि लग्नाचें कायम करतील हें ठरल्यासारखें मला वाटूं लागलें. आणि म्हणून मीं अनंताला आणि कालिंदीला दोघांनाही खुष करण्याचा घाट घातला.

एकदां मीं अनंताला चहाला बोलाविलें आणि आम्हीं सगळ्यांनीं गप्पांचा अड्डा बसविला. कालिंदी प्रथम पुष्कळच बुजली आणि लाजली, पण मग ती खूपच मोकळेपणानें गप्पांत सामील झाली.

मग अप्पांचें आणखी एक पत्र आलें. त्यांत आतां भीतीचें कोणतेंही कारण उरलेलें नाहीं असें अगदीं स्पष्टच लिहिलें होतें.

अनंता कालिंदीला आवडला होता आणि तीही त्याला आवडली होती हें मला आणि माझ्या पत्नीलाही रोज जास्त जास्तच उघड दिसून येऊं लागलें.

एकदां अनंतानें सिनेमाचा कार्यक्रम काढला. मी म्हटलें, 'माझं डोकं दुखतंय्.' पत्नी म्हणाली, 'वासंती जरा किरकिर करत्येय् आज.'

'सरळ यायचं नाहीं म्हणून सांगाना' अनंता म्हणाला.

"यायचं नाहीं असं मुळींच नाहीं बुवा" माझी पत्नी ओरडली, "पण वासंतीकरितां मी हें करत्येय्. जर कालिंदी राहत असली घरीं तिला संभाळायला तर ही मी निघालें पहा!"

मी मोठ्यानें हंसूं लागलों. कालिंदी म्हणाली, 'मी संभाळीन, वहिनी, वासंतीला, पण विनायकरावांच्या डोक्याचं काय तें तुम्ही आपलं बघा. तुम्ही गेलांत कीं तें जास्तच दुखायला लागेल!"

तिच्या बोलण्यावर खुष होऊन अनंता हंसत सुटला. मग तो म्हणाला, "मग येताय् का नाहीं कुणी? नाहीं तर हा मी चाललों. वेळ होत आली."

"जा कीं कालिंदी, एवढा अनंता बोलावतोय् तर!" मी म्हणालों.

"मला कुठं कोण बोलावतंय्? नांव तरी घेतलंय् माझं?" कालिंदी म्हणाली.

तिच्या बोलण्यांतील गर्भित कोटी मला फारच मार्मिक आणि मजेदार वाटली. मी कौतुकानें तिच्याकडे पाहतच राहिलों. तेवढ्यांत अनंता म्हणाला, "विनायक,..."

"अरे पण माझं नांव कां?" मी उद्गारलों, "बस् तें कांहीं नाहीं अनंता, तूं कालिंदीचं नांव घेऊन तिला सिनेमाला चल असं म्हटल्याशिवाय मी सिनेमाला येणार नाहीं."

" आणि कालिंदी, " माझ्या पत्नीनें पुस्ती जोडली, " तूं अनंताचं नांव घेऊन......"

" जुलूम झाला हा ! " अनंता ओरडला, " कालिंदी, या जुलुमा-पुढें आपण मान तुकवायची नाहीं. यांच्या राज्यांतून हद्दपार होऊन आपण सिनेमाला जाऊं कशीं ! "

कालिंदी खुद्‌कन् हंसली; तिचे गाल आणि कान अगदीं लाल होऊन गेले. " बस् " मी म्हणालों, " असं सरळ आव्हान येऊं दे. उगीच आडपडदा हवाय् कशाला ? आतां आमची तयारी झाली. हो, कालिंदी-च्या तोंडांतून नांव बाहेर पडलं कीं आमचं पाऊल दाराबाहेर पडेल. "

" हं आटप, कालिंदी," माझी पत्नी म्हणाली, " नाहीं तर नेहमीं-प्रमाणें वायकांकडून खोटी होईल हो. जायचं म्हणजे आपला आणखी पातळ बदलण्यांत वेळ जाईल. "

" अंतच बघतांय् तुम्ही माझा!" कालिंदी अनेक संमिश्र भावनांनीं दबलेल्या कंपित स्वरांत म्हणाली, " मग आतां अनंताला हांक मारूं नको तर कोणाला ? "

कालिंदी एकदम आंत पळाली. आम्ही आनंदभरानें हंसूं लागलों. कालिंदीनें घेतलेलें नांव ऐकल्याबरोबर अनंतानें टाळीसाठीं माझ्यापुढें हात पसरला. मीं टाळी दिली. माझा हात पकडून तो गदगदां हालवीतच राहिला.

आम्ही सगळीं जणं सिनेमाला गेलों. पण मी आणि माझी पत्नी आधीं संकेत केल्याप्रमाणें मधूनच उठून आलों.

अनंताला आणि कालिंदीला घरीं यायला जरा उशीरच झाला. आम्ही मधूनच निघून आल्याबद्दल अनंतानें रागावण्याचा प्रयत्न केला, पण तो हवेंत तरंगत होता हें त्याच्या चेहऱ्यावरून आणि बोलण्यावरून अगदीं उघड दिसत होतें.

अनंता घरीं जायला निघाला. माझी पत्नी आणि तिच्या पाठोपाठ कालिंदीही बाहेर आली. कसलीतरी विलक्षण आतुरता, ओढ आणि आनंद मला तिच्याही चर्येवर दिसत होता.

* * *

मॅट्रिकच्या परीक्षेसाठीं परशुरामाला घेऊन अप्पा पुण्याला आले. आल्याबरोबर अप्पांनीं मला जी बातमी दिली ती ऐकून मी सर्दच झालों. कालिंदीसाठीं एक नवें चांगलें स्थळ त्यांच्या आढळांत आलें होतें. परशुरामाच्या आजारीपणांत अंगारी येथें नवीनच आलेल्या तरुण सरकारी डॉक्टरांनीं फार मेहेनत घेतली होती. ते अविवाहित आहेत असें अप्पांना कळल्याबरोबर त्यांनीं त्या दृष्टीनें त्यांची भेट घेतली. डॉक्टरांनीं आपणांस विवाह कर्तव्य असल्याचें सांगितलें, आणि मुलगी साधारण नीटस व मॅट्रिकपर्यंतच शिकलेली त्यांना हवी होती. अलीबागला त्यांचें घर आणि बरीच शेतीवाडी होती. अप्पांना सर्व दृष्टींनीं अनंत बेहेऱ्यापेक्षां हें स्थळ जास्त सरस वाटत होतें.

अप्पांची हकीगत ऐकून घेतल्यानंतर मी कांहींच बोललों नाहीं. आपण आपल्या आयुष्यांत एक फारच मोठी चूक केली असें मला वाटूं लागलें. संधि साधून मीं सर्व हकीगत पत्नीला सांगितली. तिनें मला सांगितलें, "अप्पांना सांगा, बेहेऱ्यांना मीं खात्री दिलेली आहे लग्न ठरण्याची." मी म्हणालों, "अनंताचा आणि कालिंदीचा निकट सहवास घडवून आणण्याला आपण कारणीभूत झालों. आतां जें आपण केलं तें स्पष्ट अप्पांना सांगणं माझं कर्तव्य आहे असं मला वाटतं."

"हो" पत्नी म्हणाली, "अन् अनंतराव तरी म्हणतील काय? कांहीं झालं तरी त्यांच्याशींच आतां कालिंदीचा विवाह झाला पाहिजे."

भीत भीत अप्पांना मीं परिस्थितीची साधारण कल्पना दिली. माझं बोलणं ऐकून घेतल्यानंतर अप्पा म्हणाले, "कालिंदीचं मन झालं असेल आकर्षित अनंताकडे. नाहीं असं म्हणत नाहीं मी. पण तरुणपणांत सगळीकडेच धांवत असतं माणसाचं मन!"

मी या सिद्धांतावर कांहींच बोललों नाहीं. पुढें अप्पांनीं दुसरी अडचण माझ्यापुढें मांडली. ते म्हणाले, "तुम्ही जसे इकडे शब्दानें गुंतून बसल्यासारखे झालेले आहां तसा मी तिकडे झालों आहें. कारण डॉ. गद्र्यांना मी कालिंदी दाखविण्याचं कबूल केलंय्. परीक्षा आटोपून येथून आम्ही गेलों कीं मुलगी पाहण्याचा कार्यक्रम होणार आहे. असं ठरलंय् आमचं. आम्ही कांहीं बेहेऱ्याचं स्थळ कायम केलं नव्हतं.

कायम केलेलीं लग्नंसुद्धां मोडतात, मग आम्हीं तर काय त्या दृष्टीनें बोलाचालसुद्धां केलेली नाहीं. तेव्हां त्यांत मला कांहीं वाटत नाहीं. तुम्ही सांगा अनंतरावांना मुलगी कांहीं माझी नाहीं. केला होता मी अंदाज......पण......थांबा. पण यांतून आपण तोड काढूं. मी कालिंदीला अंगारीला घेऊन जातों, लगेच डॉ. गद्र्यांना दाखवितों, त्यांचा होकार आला कीं मी तुम्हांला लगेच कळवीन, मग तुम्ही बेहेऱ्यांना सांगा; अन् डॉक्टरांनीं नकार दिला, तर मी लगेच पुनः येथें येईन अन् आपण बेहेऱ्यांशीं कायम करूं! कसं काय वाटतं तुम्हांला हें ?"

"अहो, पण मी बेहेऱ्यांना सांगूं काय ? अन् कसं ?" मी किंचित् चिडून म्हणालों.

अप्पा घुटमळले, पण मग म्हणाले, "तें तुम्ही करूंच नका. मींच त्यांना तार करीन माझं नाहीं असं ठरलं तर. मग तर झालं ?"

"ठीक आहे. मग माझं कांहीं म्हणणं नाहीं. पण तुम्हांला एवढंच सांगतों कीं माझ्या मताप्रमाणें अनंताशीं विवाह झाल्यानं कालिंदीला जेवढं सुख होईल तेवढं तुमच्या डॉक्टरांशीं करून होणार नाहीं."

"कशावरून म्हणूं शकतां तुम्ही असं ?" अप्पा जरा वरच्या स्वरांत म्हणाले, "अहो, मलासुद्धां माणसाची पारख आहेच कीं, अन् मी मुलीचा प्रत्यक्ष बापच आहे !"

अप्पांच्या बोलण्यातील गर्भित सूचना मी उमगलों, आणि त्या विषयासंबंधीं अधिक कांहीं न बोलण्याचें ठरविलें.

* * *

अप्पा आणि कालिंदी अंगारीला निघून गेल्यानंतर अनंताला भेटण्याचें मीं मुद्दाम टाळलें. डॉ. गद्र्यांना जशी मुलगी हवी होती तशी कालिंदी असल्या कारणानें ते तिला पसंत करणार याबद्दल मला जवळ-जवळ संशय नव्हता. डॉ. गद्रे आणि कालिंदी यांच्या विवाहाची कुंकुमपत्रिका कोणत्याही दिवशीं येण्याची मी अपेक्षा करीत होतों. पण ती कुंकुमपत्रिका येण्यापूर्वीं मला एका अवघड प्रसंगांतून जावें लागणार

होतें, आणि त्यालाच मी भारी भीत होतों. तो प्रसंग म्हणजे अप्पांची तार घेऊन माझ्याकडे आलेल्या अनंताशीं बोलण्याचा !

अप्पा गेल्यानंतर चवथ्या दिवशीं तो प्रसंग माझ्यावर आला. ती वेळ रात्रीची साधारण साडेआठची होती. एक दिवस अनंताला भेटल्या-शिवाय किंवा तार आल्याशिवाय गेला म्हणून कांहींशा खुषींत मी जेवीत होतों. इतक्यांत ' देशपांडे आहेत का ? ' असें कोणीतरी दाराशीं ओरडलें. माझी पत्नी पुढें झाली आणि ओरडली, " कोण आहे ? " बाहेरून उत्तर आलें, ' तार आहे देशपांड्यांची ! ' ' तार आहे कोणाचीशी ' माझ्या पत्नीनें मला तार पोंचविली. मी खडबडून पानावरून उठलों आणि मोरीशीं गेलों.

इतक्यांत दार उघडलें गेल्याचा आणि पाठोपाठ कोणीतरी मोठ्यानें हंसल्याचा आवाज माझ्या कानावर आला. तो आवाज अनंताचा होता हें मी ताबडतोब ओळखलें.

" अहो तारवाले, " मी झट्कन् पुनः पानावर बसत ओरडलों, " तुम्ही कांहीं लोकांच्या जेवणाखाणाच्या वेळा बघतां का नाहीं ? "

" हो हो, बघतों तर, " स्वैपाकघरांत येत अनंता म्हणाला, " जेवून-खाऊन आलोंय् मी. "

अनंता खुषींत दिसत होता. तेव्हां मी तर्क केला अजून अनंताची निराशा झालेली नसावी.

माझें जेवण संपून आम्ही बैठकीच्या खोलींत आल्यानंतर तो मला म्हणाला, " काय रे, कालिंदीनं अन् तूं माझ्याविरुद्ध कट रचला होतात वाटतं ? "

" कट ? कसला कट ? " मीं चमकून विचारिलें.

" अरे वा ! वरंच नाटक करतोयस कीं रे ! तुला जसं कांहीं माहीतच नाहीं ! खरं सांग, कालिंदीला इथून घेऊन जायला तूंच तिच्या वडिलांना सांगितलंस का नाहीं ? "

मला कांहींच उलगडा न झाल्या कारणानें मी अचंब्यानें नुसतेंच " हूं ! " केलें.

"त्या मुलीची अन् माझी ताटातूट करून तुला स्वतःचा भाव वाढवून घ्यायचा होता काय रे? पण बाबा, मिया-बिब्बी राजी तो क्या करेगा विनायकजी?" असें म्हणून तो हंसूं लागला.

"हें पहा अनंता," मी गंभीर होत म्हणालों, "उगीच भलभलते आरोप माझ्यावर कांहीं करूं नकोस. लेका, बिब्बीचं नुसतं तोंड दिसलं न दिसलं तोंच माझ्यावर फिरलास! मग बिब्बीचा बुरखा काढल्यावर काय करशील?"

आम्ही दोघेही हंसूं लागलों. मग त्यानें आपल्या खिशांतून एक तार काढून माझ्या हातीं दिली. ती तार अप्पांकडून आलेली असून आपण अमुक तारखेस लग्न ठरविण्यास येतों असें लिहिलें होतें. तार वाचल्याबरोबर मी अनंताची पाठ बडविली, आणि त्याचा हात हातांत घेऊन गदगदां हालविला. तेवढ्यांत माझ्या डोक्यांत विजेप्रमाणें एक कल्पना चमकून गेली. मी अनंताला म्हणालों, "अन्त्या, अरे हालवून खुंटा बळकट करावा लागतो! मी अप्पांना साळसूदपणानें सांगितलं तुम्ही आपल्या गांवीं जा व चार दिवस विचार करा. कालिंदीलाही विचार करूं द्या. अनंता माझा मित्र आहे म्हणून भिडेला बळी पडूं नका. कालिंदीलाही मी हळूच सांगितलं चार दिवस तुला काय वाटतं तें बघ......पण कांहीं नाहीं. ठीक जमलं आतां सगळं!"

"विन्या, केमिस्टचं दुकान आहे तुझं," अनंता म्हणाला, "तेव्हां 'गुण वाटला तर पैसा द्या' अशी डिप्लोमसी तूं करावीस हें साहजिकच आहे!"

* * *

कालिंदीचा सासरीं म्हणजे अनंता बेहेरेकडे 'गृहप्रवेश' झाला. तेव्हां समारंभ संपल्यानंतर मी, कालिंदी आणि माझी पत्नी एकत्र असतां मी हळूच कालिंदीला म्हणालों, "काय कालिंदी, जमिनीवर आहेसना? डॉ. गद्रे की जय!"

तिनें झट्कन् आजूबाजूला पाहिलें आणि ती हलक्या आवाजांत म्हणाली "कालिंदी बेहेरे की जय करा!"

" तें काय म्हणून ? "

" अहो, डॉक्टरांना मी दर्शन दिलें, पण मागून विनयानें पण व्यवस्थित त्यांना लेखी कळविलें कीं, ह्या मूर्तीची आधींच प्राणप्रतिष्ठा झालेली आहे ! "

मी चकित होऊन तिच्याकडे पाहत राहिलों. पण मग म्हणालों, "समज, त्यांनीं तुझें पत्र मनावर न घेतां तुला पसंत केलं असतं तर?"

" तर रामदासांप्रमाणें मी बोहल्यावरून पळालें असतें ! " ती खोडसाळपणानें हंसत म्हणाली.

" आम्ही नसता हो पण आमच्या घरांत तुला थारा दिला!" पत्नी गमतीनें म्हणाली.

" आहेस खरी चाळीसची कुमारी ! " मी म्हणालों.

" इश्श् ! " ती उद्गारली, " अजून दृष्टीच्या टप्प्यांतसुद्धां नाहीं कीं चाळिशी माझ्या ! "

" अग, " मी हंसत म्हणालों, " चाळीसची कुमारी म्हणजे विसाव्या शतकांतली चाळीस ते पन्नास सालांतील कुमारी हो ! "

# बौदी : : ४

" आज संध्याकाळीं तुझी एका हिंदी गृहस्थाशीं ओळख करून देणाराय् मी. तयार रहा हं बरोबर सात वाजतां. आपल्याला गांवांत जायचंय्. "

माझ्या मित्रानें–बन्सीधरानें–माझ्या डोक्यावर टपली मारून सूचना दिली. मलायासारख्या परक्या देशांत तेथें स्थायिक झालेल्या एखाद्या हिंदी गृहस्थाची ओळख होणं ही केवढी आनंदाची गोष्ट! परंतु इतक्या थोड्या अवधींत बन्सीधरानें ओळख पाडलेली पाहून मी कौतुक-मिश्रित स्वरांत म्हणालों,

" अरे वा! इतक्यांत मैत्री देखील केलीस का तूं! येथें पोंचून दोन दिवस झाले नाहींत तोंच? प्रवासांत गरम झालेलं मोटारीचं इंजिन देखील अजून थंड झालं नसेल. तरीच म्हटलं काल स्वारी कुठं बेपत्ता झाली होती? "

" पण मी स्वतःच कुठं गेलोंय् मैत्री करायला. तो गृहस्थ स्वतः होऊनच माझेकडे आला. येथें पोंचल्याबरोबर साहेबलोकांसाठीं फर्निचरचा बंदोबस्त करायचा हुकूम दिलाना मला. जणुं कांहीं बेटे वर्षानुवर्षे येथेंच ठाण मारून बसणार आहेत. जपाननं शस्त्रत्याग करून चार दिवस झाले नाहींत तोंच यांच्या टेबलाखुर्च्यांच्या मिजाशी सुरू झाल्या. लढाई चालू असतांना चांगले वठणीवर आले होते. गुडघाभर चिखलांत बसून दोन्ही तंगड्यांचं टेबल बनवून, ब्रेकफास्ट, लंच आणि डिनर एकाच वेळेला घेत असत हें आतां पार विसरलेले दिसतात. शत्रु नामोहरम झाल्याबरोबर मेस ( mess ) बंदोबस्त आणि त्यासाठीं टेबल-खुर्च्या नि कपाटं आठवूं लागलीं यांना." बन्सीधरानें मल्लिनाथी केली.

" पण या टेबल-खुर्च्यांचा त्या हिंदी गृहस्थाशीं संबंध काय ?"—मी.

" पूर्णपणें ऐकून तर घेशील. या जपान्यांना काडीची अक्कल नाहीं. गाढवाच्या लेकांनीं शहरांतील बहुतेक सामान एकत्र करून मोठमोठालीं कोठारं भरलीं आहेत. कापडाचं, फर्निचरचं, दारूच्या बाटल्यांचं, धान्याचं, युद्धोपयोगी सामानाचं, दारूगोळ्याचं, शोभेच्या सामानाचं— अशीं वेगवेगळीं कोठारं भरून ठेवलींत त्यांनीं ! निःशस्त्र व निराधार नागरिकांना नागवून त्यांनीं हें सामान स्वतःच्या उपयोगासाठीं एकत्र केलंय्. कापडाचीं कोठारं उघडशील तर लुटून आणलेली सारी बाजार-पेठच तुला पहायला मिळेल ! वा ! राजा वा ! काय तें रंगीबेरंगी रेशमी कापड ! एका कोठारांत तर फर्निचर छपरापर्यंत रचलेलं ! कपाटांवर टेबलं नी टेबलांवर कपाटं ! कांहीं विचारूं नकोस...."

बन्सीधर असाच बोलत राहिला असता, पण मूळ मुद्यावर आणण्या-साठीं मीं त्याला मध्येंच थांबवून विचारलें,

" पण तो हिंदी गृहस्थ तुला भेटला कुठें ? का माणसांचंही एखादं कोठार बनवून एकावर एक रचून ठेवलंय् त्यांना जपान्यांनीं ?"

आपल्या विलक्षण बडबड करीत राहण्याच्या वर्मावर असें बोट ठेवतांच स्वारी जरा वरमली.

" हो, तुला सांगायचं तें बाजूलाच राहिलें. त्या कोठारांच्या किल्ल्या आतां येथल्या कलेक्टर कचेरींत ठेवलेल्या आहेत. फर्निचरसाठीं साहेबांची चिठी घेऊन मी तेथें गेलों. तेथेंच हे गृहस्थ स्वतः होऊन माझ्याशीं बोलायला आले. भाषेच्या उच्चारावरून ते बंगाली असावेत हें मी ताबडतोब ताडलें. आणि एकदम बंगाली भाषेंत बोलायला सुरुवात करून त्यांना आश्चर्यचकित करून सोडलं. मग तो मला असा थोडाच सोडायला बसलाय् ! नेलंन् ओढून घरीं, आणि बौदीशीं ओळखदेखील करून दिली."

" काय रे ! हा बौदी कसला प्राणी आहे ?" मी पृच्छा केली.

माझ्या बंगाली भाषेच्या अज्ञानाकडे पाहून तो हंसून म्हणाला, " हात रे वेड्या, बंगाली भाषेंत आम्ही वहिनीला बौदीदी म्हणतों. आणि बौदी हें त्या शब्दाचं छोटं स्वरूप आहे."

आणि खरंच आमच्या पहिल्या दिवसाच्या भेटींतच सौ. सिन्हांच्या गोड व आस्थापूर्ण स्वभावानं मला देखील इतकं भारून टाकलं कीं, मींही स्वयंस्फूर्तीनें त्यांना बौदी—वहिनी—अशी हांक मारायला सुरुवात केली.

* * *

मलायांतील बेंटॉंग या छोट्याशा पण टुमदार शहराबाहेर एका टेंकडीच्या पायथ्याशीं आम्हीं कॅंप ठोकला होता. कॅंप ठोकला होता असं म्हणण्यापेक्षां ज्या श्रीमंत नागरिकांच्या राजेशाही बंगल्यांतून जपानी शिपायांनीं वास्तव्य केलं होतं, त्याच बंगल्यांचा ताबा आतां आम्हीं घेतला होता. आणि जपानी सैनिकांना निःशस्त्र करून त्यांना हिंदी सैनिकांच्या सेवेचे धडे शिकवावयास सुरुवात केली होती. एके काळच्या आमच्या कडव्या शत्रूकडून बूट पॉलिश करून घेण्यापासून तों शौचकूप साफ करून घेण्यापर्यंत सर्व कामें त्यांच्याकरवीं करून घेऊन, युद्धकाळांत कधींच न मिळालेला जालिम शत्रूला राबवून घेण्याचा आसुरी आनंद आम्ही मिळवूं पाहत होतों.

बेंटॉंग शहर आमच्या कॅंपापासून निदान एका मैलाच्या अंतरावर तरी होतें. शहरांतील डांबरी रस्त्यांवरून दुतर्फा लागलेल्या दुकानांची शोभा पाहत हिंडण्याचा आम्हां सैनिकांना विलक्षण छंद लागलेला होता. दररोज संध्याकाळीं सुटीचा ब्यूगल वाजतांच शहरांतून फेर-फटका करून येण्याची विलक्षण घाई सैनिकांत उठे. सैनिकी गणवेषाचे ओबडधोबड परंतु त्यांतल्या त्यांत ठाकठीक केलेले कपडे घालून आणि पायांतील बुटांचा तालबद्ध आवाज काढीत टोळ्याटोळ्यांनीं ते शहराचा मार्ग धरीत. डोंगरांच्या रांगा व उंचच उंच माडांच्या झाडांनीं विनटलेला आजूबाजूचा निसर्ग, विलक्षण सुंदर व उत्साहदायी असल्यानें रस्त्यानें शीळ घालीत, जाणाऱ्या-येणाऱ्या मलायन व चायनीज तरुणींचे सुंदर चेहरे न्याहाळीत, चालण्यांत भारी मौज वाटे. शहरांत कुणी मार्केटां-तून भाजीपाला विकीत बसणाऱ्या चायनीज तरुणींबरोबर एकमेकांना न समजणाऱ्या भाषेंत सौदे करीत हिंडत. तर कुणी चायनीज हॉटेलां-तून थंड कॉफीचा आस्वाद घेत, एखादी प्रेयसी आपणांस गिळूं शकेल

काय याची विचारणा हॉटेलच्या मालकाकडे करीत. सैनिकांच्या या भ्रमरी वृत्तीमुळें सर्वसाधारण जनतेच्या सहानुभूतीला ते पारखे होत. सैनिक हा सभ्य असूं शकतो याची पुसटशी कल्पना देखील त्यांच्या मनाला शिवत नसे. आणि एकाच तऱ्हेचें व शिस्तींतलें रूक्ष जीवन जगत असतांना, त्यांच्या नागरी आयुष्यांतील कौटुंबिक जीवनाशीं समरस होण्याची आमची इच्छा असतांना देखील, तेवढा आत्मीय-भाव त्यांच्यांत निर्माण होत नसल्यानें, आमच्या मनाचा कोंडमारा होई. शिवाय तेथील भाषा आम्हांस येत नसल्यानें पदोपदीं फार अडचणी येत आणि परदेशांतील जीवनाचें यथार्थ ज्ञान मिळविण्यासाठीं आपल्या एखाद्या स्वदेशबांधवाशीं ओळख झाली तर किती छान होईल असें वाटायचें. तो योग लौकर आलेला पाहून मी मनांतल्या मनांत आनंदित होत होतों. कपडे बदलून केसांवरून फणी फिरवीत आणि बेरेट कॅप डोक्यावर नीट चढवीत मी खोलीबाहेर आलों तोंच बन्सीधर मोटारसायकल घेऊन आला. इतर सैनिकांप्रमाणें धोळक्यानें फिरावयास न जातां आम्ही दोघेच मोटारसायकलींवरून चाललों असें पाहून या दोघांनीं कुठेंतरी शिकार गांठलेली दिसतेय् या आविर्भावानें क्वार्टर गार्डवरील सेंट्रीनें आमचेकडे पाहून डोळे मिचकावले.

* * *

टेंकडीवरील शेवटचें वळण घेऊन मोटार सायकल एका टुमदार घराच्या स्वच्छ प्रांगणांत उभी राहिली. मोटारसायकलीची धड्धड दारासमोर थांबल्याची ऐकून एक पिटुकलं डोकं दाराबाहेर निघालं आणि सशाच्या भित्रेपणानें पट्कन् आंत गेलं. नंतर स्वतःच श्री. सिन्हा—आमचे यजमान—बाहेर आले, आणि घरांत नेऊन त्यांनीं सर्वांशीं ओळख करून दिली.

चलाख बिमोल छोट्या नीनाला चिमटे काढून चिडवीत होता. " काय ग ए ऽऽ भित्रे ! तूं बन्सीकाकूला ओळखलं नाहींस ? तुला काय वाटलं निप्पॉन सोल्जर आला म्हणून ? बघा हो काकू, तुम्हांला नीना जपानी सोल्जर म्हणून भ्याली. " ९–१० वर्षांचा बिमोल बन्सीधराशीं लगट करीत म्हणाला,

"काकू" हें संबोधन ऐकून मला कसेंसेंच वाटूं लागल्यानें मीं बन्सीधरला विचारलें, "काय रे! हा काकू काकू काय म्हणतोय् ? तुला तर भल्या मोठ्या मिशा आहेत कीं!"

"अरे बाबा, बंगाली भाषेंत काकाला काकूच म्हणतात."

मी मान डोलवली.

इतक्यांत स्वयंपाक घरांतून सौ. सिन्हा घाम पुशीत बाहेर आल्या आणि दोन्ही हात जोडून त्यांनीं आम्हांस नमस्कार केला.

किंचित् स्थूल परंतु ठेंगणी देहयष्टि, गोल पण आकर्षक चेहरा, गव्हासारखा रंग, डोळ्याला चष्मा आणि चेहऱ्यावर बहुश्रुतपणाचं व विद्वत्तेचं तेज, असं थोडक्यांत सौ. सिन्हांचं वर्णन करतां येईल. आपल्या परमप्रिय मायभूमींतून नुकत्याच आलेल्या आम्हां तरुणांबद्दल त्यांना विशेष आस्था वाटत असल्याचे भाव त्यांच्या चेहऱ्यावर दृग्गोचर होत होते. वयानं त्या पस्तिशी ओलांडून गेल्या असाव्यात. आपल्या मायभूमींतील ताज्या हालचाली जाणून घेण्याची त्यांना तीव्र जिज्ञासा होती. बंगाली मला कळत नव्हतें म्हणून त्या इंग्रजींत बोलत होत्या. थोड्याच अवधींत मला कळून चुकलं कीं, ही बाई पदवीधर आहे. आपल्या जलद व मिष्टास वाणीनें त्यांनीं मला अगदीं थोड्या अवधींत मंत्रमुग्ध करून सोडलं. मी शेजारीं नजर टाकली. बन्सीधर आमच्या संभाषणांत भाग न घेतां मुलांबरोबर दंगा करण्यांत दंग झाला होता.

या बाईच्या प्रेमळ नी आस्थेवाईक स्वभावामुळें आपणही त्यांना वहिनी या नांवानें हांक मारावी असें मला वाटूं लागलें.

बोलतां बोलतां मी बसलेल्या खोलीचें निरीक्षण चालविलें होतें. मोजक्याच वस्तु परंतु टाकटीक रीतीनें मांडणी केली होती त्यांची! गांधींचें मोहक हास्य दाखविणाऱ्या तसबिरीशेजारीं येशू ख्रिस्ताचा शांत व सोज्ज्वल चेहरा दर्शविणारा फोटो लटकावलेला होता. दोन्ही तसबिरींच्यामध्यें एक घड्याळ होतं आणि प्रत्येक अर्ध्या तासाला तें जलतरंग वाद्यांतून निघणाऱ्या मंजुळ ध्वनीप्रमाणें आवाज करून कानाला आल्हाद देत होतं. भरतकाम केलेल्या काचेच्या चौकटी दोनचार ठिकाणीं लटकावलेल्या होत्या. घड्याळाच्या वरच्या बाजूस वनगाईची

दोन शिंगें विद्युत्प्रकाशांत चकाकत होतीं. दाराकडच्या भिंतीवर जपानी पातळ चटईवर एक भलं मोठं गोंडस बाळ हंसत होतं. खिडक्यादारांचे पडदे देखील मालकिणीच्या सौंदर्याभिरुचीचें प्रदर्शन करीत होते.

मुलांच्या दंग्यानें बोलण्यांत व्यत्यय येऊं लागल्यानें बौदींनीं त्यांना दटावलं! मुलं तरी किती धाकांत! गपचीप जाऊन बसलीं—कुणी आंतल्या पलंगावर तर कुणी बाहेरच्या व्हंराड्यांतील खुर्च्यांवर. सगळ्यांत छोटी व लाडकी सविता आईच्या पुढ्यांत जाऊन उभी राहिली; आणि तिसरी बेला वन्सीकाकूंच्या मांडीवर टाण देऊन बसली.

बौदींना एकंदर पांच मुलें झालीं : पहिली १२ वर्षांची मुलगी सरोजिनी सांवळ्या रंगाची, नाकेली, अभ्यासांत आणि घरकामांत हुशार; दुसरा ९—१० वर्षांचा, धीट, अत्यंत बोलका, खट्याळ, तीव्र बुद्धीचा आणि नकट्या नाकाचा मुलगा बिमोल; तिसरी ७—७॥ वर्षांची बेला; चौथी सगळ्या भावंडांत गोऱ्या रंगाची व सुंदर अशी ५ वर्षांची नीना, आणि सगळ्यांत धाकटी म्हणून लाडकी अशी ३ वर्षांची सविता. प्रथमदर्शनीं पांचीही मुलं विशेष डोळ्यांत भरण्यासारखीं नसलीं तरी बौदींनीं त्यांना इतकं योग्य वळण लावलं होतं कीं, कुटुंबाशीं निकटचा संबंध येणाऱ्या व्यक्तीची त्यांना दृष्टच लागावी.

बोलतां बोलतां रात्रीचे नऊ कधींच वाजून गेले तरी आम्हांला कळलं नाहीं. खिशांत भरून आणलेलीं चाकलेटं मुलांना देत आम्हीं बौदींना कँपांत परतण्याची इच्छा दर्शविली.

“ वा ! इतक्यांत कसले जाताय् १० वाजायला अजून पुष्कळ वेळ आहे. तुमचा झोंपायचा ब्यूगल १०।ला होतोना ! चला आंत; सरोजिनीनं जेवण वाढून ठेवलंय् . जेवल्याशिवाय सोडणार नाहीं मी. ” बौदी म्हणाल्या. आम्हीं आंत गेलों. टेबलावर इंग्रजी पद्धतीनं जेवणाची तयारी केली होती. कँपांतून येतांना जेवून आलों होतों तरीही समोरचे पदार्थ पाहून तोंडाला पाणी सुटलें. भूक नसतांनाही निरनिराळ्या चविष्ट पदार्थांवर आम्हीं आडवातिडवा हात मारला आणि बौदींच्या पाकनैपुण्याची मनांतल्या मनांत तारीफ करीत कँपांत परतलों.

* * *

त्या दिवसापासून दररोज संध्याकाळीं बौदींकडे जाण्याचा आमचा नित्यनेमच होऊन बसला. बौदी म्हणत, " गेलीं तीन-साडेतीन वर्षं सदोदित जपानी चेहरेच नजरेस पडत. पीक आलं होतं त्यांचं. आतां तुम्ही आल्यापासून केवढा आनंद झालाय् आम्हांला! मुलं देखील पहा कशीं बिलगलीं आहेत तुम्हांला! आतां माया लावीत आहांत. आलांत तसे एखादे दिवशीं निघून जाल आणि नंतर जड जाईल तें आम्हांला."

बौदींच्या घरांत प्रवेश करतांना एखाद्या शांत, निरामय वातावरणांत दोनचारच चिमुकल्या पक्ष्यांचा श्रुतिमनोहर किलबिलाट चाललेला आहे असा भास होई. राजूकाकू, बन्सीकाकू म्हणून तीं पांखरें आम्हांभोंवतीं गोळा होत. आणि आमच्या रूक्ष जीवनांत विशेष अनुभवास न येणाऱ्या वात्सल्यभावनेचा उगम आमच्या मनांतून होई. श्री. सिन्हा जरी घरीं नसले आणि बौदी स्वयंपाकांत गुंतलेल्या असल्या तरी आम्ही मुलांबरोबर यथेच्छ खेळून त्यांच्याबरोबर स्वतःचीही करमणूक करून घेत असूं.

बौदी आपला जीवनवृत्तांत जितक्या तन्मयतेनें सांगत तितक्याच आस्थेनें आमचाही जाणून घेण्याची इच्छा करीत. आयुष्यांत अनेक सुखदुःखाचे प्रसंग पाहिल्यानें त्यांचं मन अत्यंत भावनाशील झालं होतं. जपान्यांबरोबर लढा देतांना आघाडीवरच्या आमच्या हाल-अपेष्टांचं वर्णन ऐकून त्यांच्या डोळ्यांत आंसूं येत, आणि सद्गदित स्वरानें त्या म्हणत—

" इतक्या संकटांतून तुम्ही निभावून आलांत; कराल काळाच्या दाढेंतून सही सलामत बचावलांत; केवढं मोठं भाग्य तुमचं! जपानसारख्या क्रूर राष्ट्राशीं तुम्ही वर्षानुवर्षं लढा दिलात. खरे शूर आहांत तुम्ही!"

मी म्हणे, " बौदी, आमचा लढा संघटित स्वरूपाचा. खऱ्या शूर तुम्हीच आहांत. जन्मभर फक्त आपल्या जीवनसाथीच्या आधारानें जीवनसंग्रामाशीं झुंज दिलीत. विशेषतः पूर्णपणें निःशस्त्र असतांही जपानी लोकांसारख्या नरराक्षसांबरोबर लढलांत्."

आणि खरेंच लहानपणापासून बौदींच्या शरिरानें अनेक लहान-मोठ्या रोगांशीं झुंज दिली. त्यांतूनही वाट काढीत त्या कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीधर होऊं शकल्या. त्यांच्या वडिलांच्या जुन्या विचारसरणीमुळें त्यांचें लग्न लहानपणींच झालें होतें. श्री. सिन्हावर ऐन तारुण्यांत वडिलांच्या मृत्यूमुळें दारिद्य आलें आणि आपला शिक्षणक्रम त्यांना अर्धवट ठेवावा लागला, व पोटासाठीं कसला तरी व्यवसाय किंवा नोकरी बघणें प्राप्त झालें. बौदी वडिलांच्या एकुलत्या एक कन्या असल्यानें श्री. सिन्हा यांनीं घरजांवई होऊन आपल्या घरीं रहायला यावें असा बौदींच्या वडिलांचा आग्रह पडला. मानी स्वभावाचे सिन्हा या गोष्टीला तयार होईनात. सासऱ्याचं मेललं अन्न खात राहून मिरवणं हें त्यांना पटत नव्हतं. त्यांच्या आतेष्टांनींही खूप प्रयत्न करून पाहिले, परंतु त्यांना यश आलं नाहीं. रागाच्या भरांत बौदींच्या वडिलांनीं "मी मुलीला तुझ्यासारख्या दरिद्र्याच्या घरीं पाठवीत नाहीं" अशी घोषणा केली.

शिक्षणानें सुसंस्कृत झालेल्या व आर्यस्त्रीचा आत्मा धारण करणाऱ्या बौदींनीं वडिलांचा निषेध केला, व आपली पतिसमवेत राहण्याची इच्छा दर्शविली. त्यांच्या या सदिच्छेआड येणाऱ्या कुणालाही त्यांनीं जुमानलें नाहीं आणि तारुण्यांतले पहिलेवहिले दिवस दारिद्र्यांत काढले. श्री. सिन्हांची प्रकृति तरी कुठें अशी धडधाकट होती! व्यवसायाच्या दगदगीनें ते आजारी पडले. त्या वेळीं जिवाभावानें त्यांची अविरत सेवा करून बौदींनीं त्यांचे प्राण वांचविले. आणि या गोष्टीला आजदेखील श्री. सिन्हा दुजोरा देऊन म्हणतात, " She was no less than mother to me." ( तिनं माझी आईच्या मायेनं शुश्रूषा केली. ) ज्या स्वकीयांसमोर बाळपणांत चांगले दिवस काढले त्यांच्यासमोरच तारुण्यांत हलाखीचं जीवन जगण्यापेक्षां परदेशांत जाऊन नशीब अजमावावं असं श्री. सिन्हांना वाटूं लागलें. आणि त्यांच्या या इच्छेला मान तुकवून बौदींनींही परदेशांत जाण्याची तयारी केली.

" अग, तो कसलं नांव कमावणार परदेशांत! आजारांतून उठल्यापासून अधू झालाय् तो. जाऊं दे त्याला एकट्यालाच! " असें म्हणून

बौदींच्या वडिलांनीं तिला परदेशीं जाण्याच्या विचारापासून परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु बौदींनीं पतीचे पाय सोडून दूर राहण्याचें नाकारलें.

१२–१४ वर्षांच्या मलायांतील वास्तव्यांत या पतिपत्नींनीं आप्त-स्वकीयांपासून, देशबांधवांपासून दूर राहून सुखाचा संसार केला. श्री.सिन्हांना बँटॉगच्या सॅनिटेशन खात्यांत कारकुनीची नोकरी लागली. घरांतील सारी बाजू बौदींनीं सांवरून धरली आणि त्याच क्षेत्रांत आपलं कर्तृत्व पूर्णपणें पणाला लावून, चतुर पत्नी, सुगृहिणी व सुमाता अशा त्रिविध भूमिका यशस्वीपणें पार पाडून श्री. सिन्हांचा संसार सुखाचा केला.

पतीसंबंधीं बोलतांना एकदां त्या मिस्कीलपणें म्हणाल्या, " हे एवढे मोठे झाले आहेतना तरी मला यांचं सारं कांहीं बघावं लागतं. गेल्या १३–१४ वर्षांत मी त्यांना एक दिवसही विसंबलें नाहींय्."

" कांहो बौदी, इतक्या वर्षांत तुम्ही एकदांही मायभूमीस गेलां नाहींत काय ? " मी जिज्ञासा केली.

माझ्या या प्रश्नानं त्या गंभीर झाल्या. आपल्या घराकडील आठवण त्यांना तीव्रतेनें आली असावी. त्या बोलूं लागल्या—

" पहिल्या चारपांच वर्षांत माझा वडिलांच्यावरचा रागच मुळीं ओसरला नव्हता. शिवाय सरोजिनीच्या कौतुकांत आम्ही दोघे गुंग झालों होतों. नोकरींत त्यांचा चांगला जम बसूं लागला होता आणि लौकरच इन्स्पेक्टरच्या जागेवर त्यांची नेमणूक होणार होती. पुढें पुढें यांच्या ओळखी वाढल्या, व येथें वसाहत करून राहिलेलीं कांहीं हिंदी कुटुंबं वर्षासहामहिन्यास एकत्र येऊन स्नेहसंमेलनं भरवूं लागलीं. परदेशांत सदैव तद्देशीय भाषा बोलावी लागत असल्यानें मातृभाषा बोलणारांनीं एकत्र येणं म्हणजे आम्हांला पर्वणीसारखं वाटायचं. या स्नेहसंमेलनांमुळें घराकडची विशेष आठवण येईनाशी झाली. पुढें अधिकार व पैसा हातांत आल्यावर घरांत सर्व सुखसोईची तरतूद करतां आली. नोकरचाकर ठेवतां येऊं लागले आणि मौजेखातर आम्ही दूरदूरच्या सहली आमच्या मालकीच्या मोटारींतून काढूं लागलों. हळू-

हळू संसाराचा व्यापही वाढत चालला होता. मध्यंतरीं एकदां माय-देशास जाऊन यावें अशी तीव्र इच्छा मला झाली. त्यांना विशेष प्रेमांतले असे नातेवाईक हिंदुस्थानांत नव्हतेच म्हणून मीच मुलांसह ४–६ महिने राहून यावं असं ठरलं. परंतु मुलं गेल्यावर एकट्याला करमणार नाहीं म्हणून त्यांनींही येण्याची इच्छा दर्शविली. ६ महिन्यांची सुटी मिळवितांना कोण सायास पडले त्यांना! आणि ती मिळाली त्याच वेळीं जागतिक युद्धाचा भडका उडाला. समुद्रावरचे रस्ते बंद झाले. आणि जपान्यांची टोळधाड आल्यानंतर तर विचारायलाच नको!

" जपानी आक्रमणानंतर सर्वसामान्य जनतेच्या दुर्दशेस तर पारावारच राहिला नाहीं. कोणाच्याही घरांतील कितीही किंमती वस्तु स्वतःच्या मालकीची समजून जपानी शिपाई घेऊन जात. अडथळा करणाऱ्याचें मुंडकें धडावेगळें होई...माझ्या घरांतील मोटारीपासून मनगटावरील सोन्याच्या घड्याळापर्यंत साऱ्या वस्तु मेल्यांनीं धुवून नेल्या. नेऊं दे नेलं तर! आम्हांला जिवंत सोडलं हें काय थोडं झालं! माझ्या मुलांबाळांनिशीं मी आपली अब्रू बचावून सुरक्षित राहूं शकलें यांतच मला पूर्ण समाधान आहे. "

शहरांतील अधिकाऱ्यांच्या बायकांत बौदींना फार उच्च स्थान होतें. आपल्या तेजस्वी वक्तृत्वानें व प्रभावी व्यक्तिमत्त्वानें स्त्रियांच्या क्लबांतही त्यांनीं अत्यंत मानाचें स्थळ पटकावलें होतें. शिवाय सार्वजनिक कामांतही त्या हिरिरीनें भाग घेत. एके दिवशीं आम्ही त्यांच्या घरीं जायला नी त्या अशाच एका समारंभासाठीं बाहेर पडण्यास गांठ पडली. जपान्यांच्या नजरेपासून लपवून ठेवलेली ठेवणींतली एकुलती एक साडी त्या आज नेसल्या होत्या. कलेक्टरसाहेबांच्या पत्नी आपली कार घेऊन दारासमोर उभ्या होत्या. मुलांना दंगा न करण्याबद्दल बजावून व एका तासांत मी परत येतें असं सांगून त्या मोटारींत जाऊन बसल्या. जपानी अमलांत सार्वजनिक सभा–सम्मेलनांना पूर्णपणें आळा बसलेला असल्यानें कलेक्टरीणबाईंनीं स्वातंत्र्याच्या आनंदाप्रीत्यर्थ शहरांतील प्रतिष्ठित नागरिकांच्या बायकांची ही सभा बोलावली होती. श्री. सिन्हाही कांहीं कामानिमित्त कलेक्टरसाहेबांच्या बंगल्यावर गेले होते.

आम्हांला आज मुलांबरोबर दंगा करण्यास सारं घर मोकळं होतं. लपंडाव खेळतांना आम्ही बौदींचं सारं घर फिरून पाहिलं. त्यांच्या स्वयंपाकघरांतील टापटीप आम्हांला निरखून पाहण्यास मिळाली. घराच्या पिछाडीस दोन गाईसाठीं एक छप्पर बनविलं होतं आणि मोकळ्या जागेंत बगीचा बनविला होता. ३-३।। वर्षांत या बगीच्याची जोपासना करून भाजीपाला पिकवून त्यांनीं कुटुंबाचा चरितार्थ चालविला होता. आणि गाईंच्या विपुल दुधावर मुलांचें उत्तम प्रकारें संगोपन केलं होतं. जपान्यांनीं पूर्णपणें कफल्लक केल्यानें त्या कुटुंबाला हा स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारावा लागला होता.

खेळ संपल्यावर बिमोलनें एक नाटक करून दाखविलें. आपला चिमुकला जपानी सैनिकवेष धारण करून जपानी भाषेंत हवा तसा आरडाओरडा करून सारं घर डोक्यावर घेतलं. जपान्यांनीं तेथें मुलांना आपली भाषा शिकविण्यासाठीं रीतसर शाळा उघडल्या होत्या, आणि थोरांमोठ्यांनींही आपली भाषा शिकली पाहिजे असा दंडक घातला होता. बिमोलच्या नाटकांत दोनच व्यक्ति होत्या. तो स्वतः आणि दुसरी नीना. दोघानांही जपानी भाषेंत लौकर प्रावीण्य मिळविल्याबद्दल शाळेंतून बक्षिसं मिळालीं होतीं. बाकीचीं मुलं पोट धरधरून हंसत होतीं. नाटक संपल्यावर सरोजिनीनं नाटकाचा खुलासा केला. जपानी शिपायांच्या अरेरावी व क्रूर वृत्तीचा मोठा मार्मिक उपहास त्यानें केला होता. आम्हीही नंतर खूप हंसलों.

नाटकानंतर गाण्याचा प्रोग्राम होता. सर्व जण एकत्र आले आणि एकसुरानें गाऊं लागले. तें गाणं देशप्रेमानं भरलेलं आणि गुलाम राष्ट्रांतील सैनिकांचीं मनें दिव्यस्फूर्तीनें पुलकित करणारें होतें. मुलांचा आवाज वरवर चढत होता.

सूरज बनकर जगपर चमके भारत नाम सुभागा
जयहे ऽऽ जयहे ऽऽ जय जय जय हे ऽऽ

आज सर्वांच्या तोंडीं झालेलं आझाद हिंद सेनेचं हें गीत त्या वेळीं आम्ही प्रथमतःच ऐकत होतों. कुणीं शिकविलं त्यांना हें गीत!

आमच्या साऱ्या वृत्ति मंहिरून गेल्या होत्या. कुणाच्या तरी आगमनानं आमचा समाधिभंग झाला. बौदी सभेहून परतल्या होत्या. बऱ्याच दिवसांनीं जुन्या मैत्रिणींची गांठभेट झाल्यानं त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत होता. आपलीं मुलें आझाद हिंद सेनेचें गीत तन्मयतेनें गात असतांना पाहून त्यांना समाधान झालें, परंतु त्याच वेळीं एका अस्पष्ट दुःखाची छाया त्यांच्या मुखावरून तरळत गेल्याचा मला भास झाला.

हें गीत कुणी बनविलं अशी मी पृच्छा केली. खुर्चीवर बसून बौदींनीं खुलासा केला,

" घोर मानहानीच्या आणि हालअपेष्टांनीं पुरेपूर भरलेल्या जीवनांतील एक एक दिवस ढकलीत असतां अचानक एक आशादीप आम्हांस दिसला. जन्मभर जपानी तावडींतून सुटण्याची आशा नाहीं असे निराशाजनक विचार मनांत येत असतांना आमची भाग्यरेषा उदयास आली. जगांत काय चाललंय् यावद्दल आम्ही पूर्ण अंधारांत होतों. वर्तमानपत्रें मिळत नव्हतीं. ताज्या खबरी मिळण्याचं एकुलतं एक साधन म्हणजे रेडिओ तेंही आमच्याकडून काढून घेतलेलें. अन्न-धान्यें, कपडालत्ता व इतर सुखसोयी यांचा सर्वत्र दुष्काळ पाडून हरतऱ्हेची गळचेपी करण्यात त्या नरपशूंना सैतानी आनंद होत असावा. अशा परिस्थितींत आझाद हिंद सेनेचे सैनिक येथें आले. आपलें धुरीणत्व प्रत्यक्ष सुभाषबाबूंनीं पत्करल्याची माहिती त्यांनीं दिल्यावर आमच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. आणि एके दिवशीं मलायांतून आझाद हिंद सेनेच्या प्रचाराच्या दौऱ्यावर असतांना सुभाषांचे पाय बँटॉगला लागले. येथें जाहीर सभा घेऊन त्यांनीं हिंदी जनतेकडून मदतीची याचना केली. आम्ही काय मदत करणार? पूर्णपणें कफल्लक झालों होतों. त्या वेळीं आमच्या घरीं पायधूळ झाडण्याची विनंति आम्हीं नेताजींना केली.

" त्या रात्रीं स्वातंत्र्यसूर्याच्या तेजानें आमचें हें घरकुल प्रकाशमान झालें. त्यांचें स्वागत करण्यास आमच्याजवळ योग्य तो इतमाम नसला तरी हृदयांतील निःसीम आदरानें व अकृत्रिम प्रेमानें ती वेळ निभावून

नेली. टेबल-खुर्ची देखील घरांत नसल्यानें स्वयंपाकघरांत पाटावर बसून सुभाषनीं त्या दिवशीं माझ्या घरची भाजी-भाकरी खाऊन समाधानाची ढेंकर दिली. मला कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. त्या रात्रीं तासभरच ते घरांत असतील, परंतु प्रत्यक्ष स्वर्गच खालीं उतरल्यागत मला भासत होतें. त्यांच्या कार्याला पूर्णपणें वाहून घेणें आम्हांला शक्य नव्हतं म्हणून इतर कोणती मदत आम्ही करूं शकूं याची रूपरेखा सुभाषनीं आंखून दिली. श्री. सिन्हांनीं मोठ्या आनंदानें तें काम आपल्या शिरावर घेतलें. आणि जपान्यांची थोडी का होईना मेहेरनजर आमच्याकडे वळली. आज ते कोठें असतील हें देवाला माहीत आणि जपानच्या शरणागतीनंतर आझाद हिंद सेनेच्या कपाळींही तुरुंगवास आला आहे असं ऐकतें. ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध संघटित लढा उभारल्या-बद्दल ते राजद्रोही ठरले आहेतना !

"आझाद हिंद सेनेशीं प्रत्यक्ष तसेंच अप्रत्यक्ष रीतीनें संबंध ठेवणारे राजद्रोही ठरले. आज ब्रिटिशांचा अमल परत मलायावर सुरू झाला आहे. युद्धपूर्व कालांतील आपले हुद्दे परत मिळण्याची आशा सरकारी नोकरांना वाटूं लागली आहे, पण श्री. सिन्हांना परत जुन्या नोकरीवर ठेवतील असं सांगतां येत नाहीं, अशी कुजबुज मी आज महिलामंडळांत ऐकली, परंतु दुर्लक्ष केलं मीं त्या कुजबुजीकडे. गेल्या ३–४ वर्षांत खूप स्वावलंबनाचे धडे शिकलोंय् आम्ही; आतां नोकरीची एवढी मातब्बरी वाटत नाहीं."

बौदींच्या स्वभावाचा एक निराळाच पैलू त्या दिवशीं मला दिसला. देशप्रेमानें प्रेरित होऊन आपण सरकारचा रोष पत्करला याबद्दल तिळमात्रही खेद त्यांना होत नव्हता. शेंकडों आपत्तींना तोंड दिल्यानें त्यांची प्रकृति नाजूक बनलेली असली तरी मन मात्र पुरुषांनाही लाज-विण्याइतकें खंबीर होतें. त्यांची मालमत्ता, धनदौलत सर्व कांहीं लुबाडलं गेलं होतं. जीवन जगण्याचं साधन म्हणून ज्या नोकरीची कांस धरली होती तिचीही आतां शाश्वती नव्हती. परंतु त्यांच्या मनांतील समाधान कुणीही हिरावून नेऊं शकलं नाहीं. आपलीं मुलें हीच आपली सर्वांत

मोठी दौलत असें त्या म्हणत. या अनमोल दौलतीचं संरक्षण परमेश्वरानं केलं, आणखीन् कसली अपेक्षा त्याच्यापासून करायची !

श्री. सिन्हा आल्यानंतर आम्ही जेवायला बसलों. कँपांतून आम्ही जेवून आलों आहोंत असं कितीही आर्जवून सांगितलं तरी बौदी आम्हांला जेवायला बसवीतच. सुरुवातीचा संकोच केव्हांच नामशेष होऊन आतां आमच्यांत घरगुती खेळीमेळीचें वातावरण निर्माण झालें होतें. " माझ्या धाकट्या दिरांचा हात ओला केल्याशिवाय मी त्यांना बाहेर जाऊं देणार नाहीं " असें त्या प्रेमानें म्हणत, व जेवण चाललें असतांना स्वत: शेजारीं उभ्या राहून आग्रहानें वाढीत.

आज बौदींना मागं न राहूं देतां बरोबरच टेबलावर बसवायचें म्हणून आम्हीं कट केला. आणि आपल्या पंक्तीचा लाभ आज त्यांनीं द्यावा असा लाडिक हट्ट धरला.

" पण आज माझा उपवास आहे. गेलीं कित्येक वर्षें मी आजचा निराहारी उपवास करतेंय्. " बौदी म्हणाल्या.

" आज कोणता उपवास बुवा ? एकादशी तर नव्हे एखादी ? " —बन्सीधर.

" आज दोन ऑक्टोबर ! गांधीजयंती नव्हे का ! " बौदींनीं खुलासा केला.

आम्ही गारच झालों. दररोजचा वार आणि तारीख लक्षांत ठेवण्याची अळंटळं करणारे आम्ही या महात्म्याच्या जयंतीदिनाची कोठून आठवण ठेवणार ? आणि परदेशांत वर्षांनुवर्षें वास्तव्य करूनही अत्यंत निष्ठेनें बौदी व्रतस्थ राहूं शकतात याचें आश्चर्य वाटून, देशाभिमानाबरोबरच विभूतिपूजेचा गुणही किती प्रकर्षानें त्यांच्यांत वास करीत आहे याची पूर्ण प्रचीति आली.

* * *

बौदींचें घर म्हणजे आमचें सुखनिधान होतें. दिवसाभराच्या श्रमानें ग्लानि आली कीं आम्ही बौदींकडे धांव घेत असूं. त्यांच्या स्वभावांतील आकर्षणच असें होतें. आणि त्यानें आमच्यावर केलेला भ्रातृभावनेचा वर्षाव तर अगदीं गुदमरून टाकणारा होता. मुलांचाही

विलक्षण लळा आम्हांला लागलेला. आमचा मुक्काम लौकरच हालणार आहे ही बातमी जड अंतःकरणानें सांगितल्यावर बौदींचा चेहरा गंभीर झाला. कितीही केलं तरी आम्ही मुशाफिर ! आज्ञा झाली कीं बिऱ्हाड पाठीवर टाकून निघायचं हें आमच्या अंगवळणीं पडलेलं. परंतु स्नेहाचीं पाळें आतां इतकीं खोलवर गेलेलीं होतीं कीं, निर्विकार मनानं आम्ही मुक्काम हालवूं शकूं हें अशक्य कोटींतील आहे असं खात्रीनं वाटूं लागलं. बौदी बराच वेळपर्यंत स्तब्ध बसल्या होत्या.

"बौदी, तुम्ही हिंदुस्थानास कधीं परत जाणार ? तुमचा तेथला पत्ता हवाय् मला. तुम्ही आपल्या गांवीं असतांना भेटायला येणार आहे मी." मी स्तब्धतेचा भंग केला.

"जमल्यास पहिल्याच बोटीनें. फार दिवस झाले मातृभूमीला सोडून. एकदां कंटाळा येईपर्यंत राहून येणार आहे मी. आणि नंतर जाईन ती सरोजिनीच्या लग्नालाच. माझीं धाकटीं भावंडं आतां केवढीं मोठीं झालीं असतील, बाबांचे तर सारे केस कसे पांढरे शुभ्र झाले असतील ! माझ्या बालपणींच्या मैत्रिणी, वृद्ध मावशी या साऱ्यासाऱ्यांना एक वेळ भेटून मनसोक्त गप्पा मारण्याची तीव्र इच्छा मनांत उत्पन्न झालेली आहे. दिवसेंदिवस मीही अशक्त होत चाललेंय्. या सविताच्या वेळीं तर जिवावरील दुखण्यांतून मी उठलें. तेव्हांपासून नेहमीं आजारीच असतें. अगदीं बिछान्यावर पडून जरी नसलें तरी माझं शरीर आंतून किती पोखरलेलं आहे याची मला कल्पना आहे, सविताच्या वेळीं श्री. सिन्हांनीं किती सेवा केली माझी ! त्यांनीं कांहीं एक करायचं शिल्लक ठेवलं नाहीं. माझा पुनर्जन्मच झाला म्हणाना ! चारसहा महिने हवा-पालट केल्यास प्रकृति सुधारेल असं डॉक्टरांचं मत आहे."

अंतर्यामींच्या वेदना लपवून सतत हंसतमुख राहणाऱ्या बौदींच्या स्वरांत कधींच न आलेला जडपणा आज आला होता. नेहमीं शरिरांत दिसणारा उत्साह व आशावाद न जाणो कुठें लुप्त झाला होता !

* * *

आम्ही बेंटॉंग सोडून अजून एक महिना सुद्धां लोटला नव्हता।

बौदींच्या घरीं २–३ आठवडे यथेच्छ हात मारलेल्या चविष्ट भोजनाची गोडी अजून जिभेवर रेंगाळत होती. कारण पूर्ववत् हार्डस्केल राशन-मध्यें मिळणाऱ्या बिस्किटांवर गुजराण करावी लागत होती. नव्या कॅंपांत आल्यावर श्री. सिन्हांचें एक व सरोजिनीचें एक अशीं दोन पत्रें आलीं. आम्ही तत्पूर्वींच आपल्या पत्रांतून त्यांच्या सहृदय वागणुकी-बद्दल कृतज्ञता प्रगट केली होती. बौदींच्या हस्ताक्षराचें पत्र यावें अशी इच्छा आम्हीं सरोजिनीच्या पत्रांतून दर्शविली.

सरोजिनीचें माझ्या पत्राला आलेलें उत्तर मोठी हृदयविदारक बातमी सांगणारं होतं. आपल्या मुलांवर निःसीम प्रेम करणाऱ्या माते-च्या चिरवियोगामुळें दुःखित होऊन बालकानें आर्त स्वरानें फोडलेला हंबरडा होता तो ! सरोजिनी लिहीत होती :—

" तुम्ही येथून जाण्यापूर्वींच आई थोडी दुःखी दिसत होती. आणि तिचा आजार वाढत चालल्यामुळें डॉक्टरांनीं एकदोन इंजेक्शनेंही तिच्या उजव्या दंडांत दिलीं होतीं. तुम्ही गेल्यानंतर ८ दिवसांच्या आंतच आई अंथरुणाला खिळली. डॉक्टरांनीं प्रयत्नांची शिकस्त चाल-विली होती. तुमचें पत्र मीं आईला वाचून दाखविलें. तिला फार आनंद झाला. परंतु इंजेक्शनें घेऊन घेऊन तिचा हात इतका अधू झाला होता कीं, हातांत टांक धरून कांहीं लिहिणें तिला शक्य झालें नसतें. आईच्या आजारांत आम्हां मुलांची कोण दैना उडालेली! बाबा तर सारखी धांवपळ करीत असलेले. खाण्या-पिण्याकडे त्यांचं लक्ष नव्हतेंच. आईचें पथ्यपाणी व इतर स्वयंपाक मीच करीत होतें. आम्ही सर्व भावंडं आई-भोंवतीं गोळा होऊन दयाघनाची करुणा भाकीत होतों कीं, देवा ! आमच्या आईला लौकर बरें कर. परंतु आमची करुण हांक देवापर्यंत पोंचली नाहीं. ती काळरात्र उगवली. यमदूत आपल्याभोंवतीं घोंटाळत असावेत असं आईला वाटलं. तिनें सर्व मुलांना जवळ बोलावून उपदेश केला, आणि प्राण सोडण्यापूर्वीं तुम्हां दोघांचीही आठवण काढली. काकू ! आज आम्ही आईविना पोरकीं झालों आहोंत ! छोट्या सवितेनें तर आईचा धोसरा काढला आहे ! सविता आईच्या शरिराचा एक भाग असल्यासारखीच होती, तशांत तिला इन्फंटाइल पॅरॅलिसिस

नांवाचा रोग झाला. ती लुळीपांगळी झालेली आहे. बाबांना आतां वेड लागायचं तेवढं शिल्लक राहिलंय्......"

वाचतां वाचतां माझ्या हातांतून तें पत्र गळून पडलं. मातृभूमीचें दर्शन घेण्याची बौदींची इच्छा अपुरी राहिली होती. आणि मुलांसमवेत श्री. सिन्हादेखील पोरके झाले होते. आमच्यासारख्या मुशाफिरांवर निरपेक्ष बुद्धीनें अकृत्रिम स्नेहवर्षाव करून केवढं मोठं ऋण करून ठेवलं होतं बौदींनीं ! बेंटॉगच्या वास्तव्यातील सुखद स्मृति एकामागून एक माझ्या डोळ्यांसमोरून जाऊं लागल्या. खडतर दुःखांशीं झगडणाऱ्या कणखर मनाच्या बौदी मनश्चक्षूंसमोर उभ्या राहिल्या. आम्हीं बेंटॉग सोडतांना भावनाविवशतेनें डोळ्यांतून अश्रु ढाळणाऱ्या बौदींची मूर्ति मनश्चक्षूंसमोर उभी राहिलेली पाहून मन व्याकूळ झालं आणि टेबलावर पडलेल्या सरोजिनीच्या पत्रावर डोळ्यांतील अश्रु झरूं लागले !

—सुषमा साहित्य प्रकाशनच्या कृपेनें

अनुक्रम..........
विभाग..........
क्रमांक..........
नों. दि.........

# लगट : : ५

मी व चंदू रस्त्यानें चाललों होतों. संध्याकाळच्या वेळीं आमच्या पुण्याला रस्त्यावरून चालणाऱ्या गडबडीचा आणि खडखडाटाचा मला अगदीं कंटाळा आला होता. म्हणून ठरवलं कीं, आज संगमावर जाऊन बसावं. नवा पूल ओलांडून आम्ही उजवीकडे वळलों. स्टेशनच्या बाजूनें टांगे आपल्या ठराविक दुडक्या गतीनें येत होते. न्यायालयांतले श्रांत कारकून उपरण्यानें वारा घेत चालले होते.

" छे आमची आजची केस फारच ' क्रमशी ' बुवा ! "

एक पगडीवाले मध्यम वयस्क दुसऱ्या पगडीवाल्यांचें अभिनंदन करित होते.

" मग, नांवाचा गर्गे वकील आहे मी. ही केस हरलों तर पुन्हा उभा राहणार नाहीं. तुमच्या ' कव्यीं ' सारखं नाहीं आमचं. "

" तर काय ! अहो, भोपटकरांसारख्या वकिलाच्या पंखाखालीं आहे म्हणून नोटिसा, अर्ज, खरडून तरी पैसा मिळतो आहे. " मधांचें भाट म्हणाले.

" होना. बरं मग मोटारमधनं येताय्ना ? आमच्याच अशिलाची आहे. " स्तुतीनें खुललेले गर्गे म्हणाले.

" नको हो. " खोटे आढेवेढे घेत भाट म्हणाले.

" अहो, चला म्हणतोंना. " —गर्गे

" बरं, तुमचा येवढा आग्रहच तर चला. "

भुर्कन् मोटार निघून गेली. मोटार अगदीं सुरेख, नवी कोरी फ्रेझर मॉडेलची. मी तर पाहतच राहिलों.

अहो मिस्टर राजे, जरा समोर पाहत जा. माणसांना अशा धडका माराव्या का?"

"कोण, मिस् साने! माफ करा हं माझं लक्षच नाहीं."

"तुमचं कशाला आतां आमच्याकडं लक्ष असतंय्! पण हे कोण? अहो ओळख तरी करून द्याल कीं नाहीं? फारच लाजाळू बाई तुम्ही." बोलतांना चुकून उजव्या खांद्यावर घेतलेला पदर तिनें पुन्हा खालीं टाकला.

"हे श्रीयुत परांजपे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेंत अध्यापक आहेत."

"अय्या! मला पण एकदां प्रयोगशाळा पहावयाचीच आहे. मी होतें आर्ट्स साइडला. इतक्या दिवसांत तिकडे डुंकून पाहिलं नाहीं. पण बाहेर फारच कौतुक करतात." हजारदां माना वेळवीत कृत्रिम विभ्रम करीत ती बोलत होती.

"हो हो, याना." केवळ सभ्यपणा म्हणून परांजपे म्हणाला.

"शाब्बास, छान, कोरडं निमंत्रण! अहो, अमुक दिवशीं असं म्हणाल कीं नाहीं? पण तुम्हांला आतिथ्याचे धडे शिकवतांना मीच विसरलें. चलाना चहा घेऊं, रस्त्यांत किती वेळ बोलत थांबायचं!"

"नाहीं, आम्ही जातोंच—पुन्हा केव्हां तरी भेटूं." आम्ही म्हणालों.

"नको हो, चला." तिनें आम्हांला परतवलेंच.

"तीन स्पेशल चहा आणि केक्स्." तिनें फर्मावलें.

स्पेशल रूममध्यें बसून आम्ही समाचार घेत होतों.

"मग काय म्हणतंय् तुमचं रेशनिंग ऑफिस!" मीं केकचा तुकडा मोडून विचारलें.

"ठीक आहे. पण तो मेला हेडक्लार्क! आहे थेरडा, पण सारखं कांहींतरी निमित्त काढून मेला लगट करतो. त्याची ही तऱ्हा, आणि कुणाला सांगावं तर सगळे तरणे कारकून. तुमच्यासारखे लाजाळू!"

"शाब्बास! म्हणजे एका दगडांत दोन पक्षी का?" —मी.

" जाऊं द्या. तुमचा चहा निवायला लागला. बरं, तुम्हीं 'जयमल्हार' पाह्यला का नाहीं ? आपल्याला बुवा फार आवडला ! "

" पाह्यलाना. बरा आहे."

" बरा आहे ? अहो, पुन्हा नीट पहा. पाहिजे तर मी दाखवीन. मग तर झालं. आणि मग मत द्या."

" पैशाचं काय हो ? पण गांवाला जातोंय् मी. " —मी.

" बरं, मग हे ?" परांजप्यांकडे ती पाहत म्हणाली.

बोलतां बोलतां आम्ही सर्व उठलोंच. झट्कन् काउन्टरवर जाऊन नंदानें बिल चुकतें केलें. आम्ही उपाहारगृहांतून बाहेर पडून थांबलों.

" हेही आतां नाताळच्या सुटीसाठीं घरीं जाणार आहेत. " —मी.

" बरोबर आहे, उत्सुकतेनें कोणीतरी वाट पाहत असेल ! "

" होना. आईबापांचे ते फार लाडके आहेत "

" बस्स का ? अहो तसं नाहीं. कसं तुमचं डोकं ! " —नंदा.

" अहो तुमचंच तसं डोकं. त्याचं अजून तसं झालं नाहीं आहे." —मी.

" अस्सं का. पण गांवाहून परत कधीं येणार ? "

" जानेवारीच्या दोन तारखेला. बरं, आतां अच्छा. "

परांजपेनें कटविण्यासाठीं संभाषण तोडलें. तिला बहुधा आणखी कांहीं विचारायचें होतं.

" बरं, येतें. मिस्टर परांजपे ओळख असूं द्या. "

× × ×

" कोण रे बाबा ही गांवभवानी आणि हें लोढणं आमच्या गळ्यांत कां रे बाबा अडकवलंस ओळख करून देऊन ! काय तिचा तो निब्बर चेहरा ! पोशाख मात्र जशी सोळा वर्षांची नाजूक पोर ! आणि नखरा नटीच्या वरताण ! " परांजपेनें भडिमार सुरू केला.

" वत्सा, शांत हो. तुझं म्हणणं खरंही आहे आणि नाईटही आहे. " —मी.

" कां रे बाबा, तुला येवढा पुळका ? "

" पुळक्याचा प्रश्न नाहीं. तिनें स्वतःच आपल्या हातानें आयुष्याचं कसं खोबरं करून घेतलं आहे म्हणून जरा वाईट वाटतं. "

" म्हणजे काय बुवा ! जरा स्पष्ट बोलना." —परांजपे.

आम्ही बोलत चालत संगमाकडेच निघालों.

" अरे, ही सुनंदा साने. ही माझ्याबरोबर शाळेंत होती आणि पुढें महाविद्यालयांतही. आतांच्या वागण्यावरनं तुला फार बोलकी वाटत असेल. पण तेव्हां—नांव सोडा. अगोदरच ती फार सुरेख दिसायची आणि त्यांतून हुशार, मग काय विचारतां ? कौतुकाखालीं दडपून जायची ही श्रीमंत बापाची लेंक. पहिल्यापहिल्यांदां ठीक होतं. पण पुढें फारच फुगून गेली. वाटेल त्याच्यावर वाटेल ते आरोप करायची. एकदां भिडे सर वर्गांत आल्याबरोबर हिनें तक्रार केली—

" सर, माझं पुस्तक दहा मिनिटांच्या सुट्टींत चोरीला गेलंय्."

मग काय ! भिडे सर अगदीं अस्तन्या सरसावून पुढें सरसावले. अहो, स्त्रीदाक्षिण्य ! आधींच हुशार, त्यांतून पडली मुलीची जात आणि शिवाय सौंदर्यवती !

" सेक्रेटरी, छडी घेऊन ये. हें पहा मुकाट्यानं कुणीं घेतलं तें कबूल करा. नाहीं तर फोडून काढीन एकेकाला."

सेक्रेटरी छडी घेऊन आला.

" हें पहा मिस् साने, पुस्तकावर कांहीं खूण आहे का ? आपण सगळ्यांचीं दप्तरें तपासूं." —भिडे.

" सर, आतां शाळेंत येतांना बाबांनीं घेऊन दिलं. मीं अजून नांवही घातलेलं नाहीं. " —सुनंदाचा लाडिक रडका स्वर.

सर्व जण निर्भयतेनें दप्तरें दाखवूं लागले. हो, कर नाहीं त्याला डर कशाला ? बघतां बघतां सर सदावर्तेजवळ आले. त्यानेंही आजच पुस्तक घेतलं होतं. मी देखील बरोबर होतों.

" पाहूं पुस्तक. " सदावर्तेनें पुस्तक दाखवलें.

" मिस् साने, हें तुमचं पुस्तक का ? " —भिडे.

" सर, मी पण आतांच घेतलं आहे. " —सदावर्ते.

" चूप, तुला विचारलं नाहीं. " —सर.

" सर, माझंच आहे हें पुस्तक." सुनंदानें एकदां तिरस्कारानें सदावर्तेकडे पाहिलें व ती जागेवर जाऊन बसली.

" सर, तें पुस्तक माझं आहे. पाहिजे तर राजेला विचारा." सदावर्तेचे डोळे डबडबले.

" हो सर, आम्ही..." मीं मध्यस्थीचा प्रयत्न केला.

" पुरे, पुरे. तुझी साक्ष नको आणखी. दोघंही हात पुढें करा."

सदावर्ते रागानें लाल झाला होता. त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. मनसोक्त छड्या मारल्यावर भिडे खुर्चीवर बसले व सुनंदाकडे त्यांनीं पाहिलें. तिच्या लाडिक हंसण्यांत भिड्यांना कृतकृत्यता वाटली.

× × ×

तास संपल्यावर शिक्षक निघून गेले. दहा मिनिटांची सुट्टी झाली. 'ब' तुकडींतली मालती रानडे आली.

" अग नंदा, हें घे तुझं पुस्तक."

" अग, पण तुझ्याजवळ कसं आलं ?"

" इश्य् ! तूंच नाहीं का दिलंस पहिल्या तासापुरतं. दुसऱ्या तासाला तुला आणून द्यावं म्हटलं तर सरांनीं सोडलंच नाहीं."

" बरं, जाऊं दे ग." सुनंदा म्हणाली, " जा तूं आतां. मला गणिताचा अजून गृहपाठ करायचा आहे."

मी सर्व ऐकतच होतों. पण—

× × +

सुनंदा मॅट्रिक झाली. मिळालेल्या शिष्यवृत्तीबद्दल तिच्या मालती रानडेनें तिचें अभिनंदन केलें.

" नंदा, आतां एकच राह्यलं, आणि तें म्हणजे—"

" पुरे, पुरे. तुझी कल्पनाशक्ति इतपतच असणार!"

कां, त्यांत वावगं काय आहे ?"

" वावगं ?— चूल फुंकीत जन्म घालवायला कांहीं मी जन्माला आलेली नाहीं. तसं करायचं असतं तर केव्हांच केलं असतं. हजारों मेले विद्यार्थीच काय, पण मास्तरडे लुडबुडत होते."

रावबहादूर तथाकथित पुरोगामी. मग हीं मुक्ताफळं कांहीं अनपेक्षित नव्हेत.

× × ×

आम्ही संगमावर येऊन पोहोंचलों. ओट्यावर बसून पुन्हा मीं धागा धरला.

" एकदां कॉलेजमध्यें गंमत झाली. "

" ती काय बुवा ? आणखीं किती पोरांचं नुकसान केलंन् ? " परांजपेनें विचारलें.

" ऐक तर तिच्या कृतघ्नपणाची कमाल. अहंगंडाच्या थाटांत ही वाटेल तशी वागत असे. अशीच एकदां बागेंत बसली होती. संध्याकाळ होऊन गेली.

पण ही स्वारी कसल्या तंद्रींत होती कुणास ठाऊक. तिला कांहीं समजलं नाहीं. आमच्या विद्यालयाचा गणू माळी आधींच तरणा तगडा गडी आणि त्यांतून ह्या वेळीं अशी ही सौंदर्यवती एकटी बसलेली. गणू " गुलजार नार न्यारी ", " आंबेवनांत सजणा दूर ", इत्यादि ढंगदार गीतें घोळून म्हणूं लागला. चार गुलाबाचीं सुरेख फुलं त्यानं तोडलीं.

" बाई, फूलं घ्या; सुरेख आहेत. "

कुर्रेबाजपणें तिनें घेतलीं. पण गणूला वाटलं पांखरूं खुललं. तो पुढें पुढें सरकूं लागला.

मग मात्र ती घाबरली व ओरडली. मोहन कर्वे नी सदू दाते गप्पा मारीत सहज चालले होते. सर्वत्र शांतता असल्यानें सहज आवाज ऐकूं आला. चट्कन् येऊन त्यांनीं गणूचा समाचार घेतला. आयुष्यांत प्रथमच पुरुषवर्गाविषयीं चांगलें मत झाल्याची नजर होती तिची त्या वेळीं, पण गर्विष्ठ तोंडांतून शब्द फुटेल तर शपथ !

थोड्या वेळानें कर्वे म्हणाला, "चला मी तुम्हांला घरापर्यंत पोंचवतों."

" नको, मी जाईन."

" नको कसं, मी पोंचवतोंच." —कर्वे.

" हें पहा कर्वे, तुम्हांला हा लघळपणा शोभत नाहीं. " —नंदा.

" तुमच्या मदतीला आलों तो लघळपणा वाटतं ! "

" कशाला आलांत ? मी कांहीं तुम्हांला नव्हती हांक मारली."

" बोंबलंत होतां कीं मघां ! " दाते चिडून म्हणाला.

" असेन. अशानं कांहीं माझ्यावर इंप्रेशन पडायचं नाहीं."

" ठीक आहे." दाते, कर्वे निघून गेले.

× × ×

एकदां अशाच दोघी मैत्रिणी भेटल्या. गप्पा सुरू झाल्या.

" नंदा, तुला एक सांगू का ? " —मालती रानडे.

" सांगना. " —नंदा.

" हें पहा, तूं चुकते आहेस बरं का वागायला. तुला सगळेच पुरुष पाजी दिसतात. तूं जणुं पद्मिनी आणि बाकी सगळे तुझें सौंदर्य लुटायला आले आहेत. पण हें ठीक नाहीं." —मालती.

" ठीक काय नाहीं ? हे विद्यार्थी तसेच प्राध्यापक. तुला बघायची आहे का गंमत या पुरुषांची ? बरं आहे. आतां प्राध्यापक देशपांड्यांनीं सूचना लावलीय्‌ना कीं, ' दहा तारखेच्या आंत वह्या न देणारास दहा रुपये दंड होईल.' मी दंड न भरतां वही देऊन दाखवतें."

" करशील बाई तूं ! " —मालती.

× × ×

आज दिनांक १२ होता. कर्वे व मी प्रा. देशपांडे यांच्या खोलीकडे गेलों. कर्वेंची वही द्यायची राहली होती. आम्ही आंत आलों. वही पुढें केली.

" तुम्ही इतक्या लवकर जागे झालांत कर्वे !"

" सर, आई फार आजारी आहे. सारखं बसून राहावं लागायचं."

" बरं मग ? तेव्हां ल्याहचं. नाहींतर सकाळीं. " —देशपांडे.

" सकाळीं पार्टटाइम नोकरी करतों. " —कर्वे.

" तें मला नाहीं ठाऊक. अशा वैयक्तिक अडचणी पाहून कसं भागणार ? नियम म्हणजे नियम. You please get out. Do not trouble me. "

आम्ही बाहेर आलों. येवढ्यांत सुनंदा आली. आज तिनें मुद्दाम काळजीपूर्वक पोशाख केला असावा. अबोली रंगाचें पातळ, त्यावर रंगसंगति साधणारा ब्लाऊझ, आकर्षकतेनें केंस वळवून मागें सोडलेले दोन शेंपटे, आणि त्यांवर ताजी अबोलीची वेणी.

आम्ही मुद्दामच थबकलों. नंदा आंत शिरली.

आम्ही खिडकींतून हळूच पाहूं लागलों.

"काय हो मिस् साने ?" —प्राध्यापक महाशय.

"सर, वही."

"अहो, ती दहा तारखेच्या आंत द्यायची होती."

"पण सर—" एक मोहक मुरका मारून तिनें आपली नजर रोंखली.

"मग — ? काय करायचं ?"

नंदानं ओळखलं, सावज जिंकलं.

लाडिकपणें हंसून ती म्हणाली, "ठेवूंना मग ?"

"बरं, ठेवा."

"थँक्स् हं सर."

आणि मग लढाई जिंकल्याच्या मदानं ती आमच्या अंगावरनं गेली.

× × ×

पुढें नंदा बी. ए. पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाली. ती आणखी राजा साठे कॉलेजचे त्या वर्षीचे फेलो होते. अर्थातच दोघांचा पुष्कळ संबंध येई. बावळट साठेनें एके दिवशीं तिला प्रेमपत्र लिहिलं. मग हिनं उत्तर धाडलं—

"श्री. साठे यांस—

आपल्या पत्राचा अर्थच मला समजत नाहीं. आपण कधीं स्वतःच्या परिस्थितीचा विचार केला आहे का ? स्वतःचं रूप कधीं आरशांत चिकित्सकपणें न्याहाळलं आहे का ? लाज नाहीं वाटत त्याह्मला म्हणे 'माझ्याजवळ पैशानं गरिबी असली तरी हृदयाची श्रीमंती आहे. दोघं मिळून नोकरी करून हीं पहिलीं बिकट वर्षे पार पाडूं. मी एकदां

पीएच.डी. झाल्यावर राणीसारखी ठेवीन!' आपल्याला बायकोला पोसायची ऐपत नाहीं तर लग्नाची भाषा तरी कशाला काढतां? आपल्या-बरोबर दुसऱ्या एखाद्या दुबळ्या स्त्रीला खड्डयांत नेऊं नका असा मित्रत्वाचा सल्ला देत आहें. या बाबतींत पुन्हा पत्रव्यवहार करूं नये.

—सुनन्दा साने "

× × ×

इकडे रावबहादुरांची थोडीफार लग्नाची खटपट चाललीच होती. पण नंदा पुष्कळ स्थळं आधींच डावलून देई. "हा काय काळाच आहे, हा प्रोफेसरच आहे. जन्मभर दोनशें एकें दोनशें करणार. हा सुखवस्तु आहे, पण बशा आहे."

शेवटीं रावबहादुरीणकाकू चिडून म्हणत,

"अग मग तुला हवा तरी कसा?"

"दिसायला स्मार्ट, चांगला रसिक व मोठा पगारदार आणि शिक-लेला पाहिजे."

"अग पण एकदम कुणाला मोठा पगार चढतो?" काकू म्हणाल्या, "आम्हांला नाहीं का सुरवातीला शंभरच पगार होता."

"तुमचं नको सांगूस. आणि नाहीं मिळाला तर मी लग्नच करणार नाहीं. तूं आपली माझा नाद सोडना." नंदा फणकाऱ्यानें खोलींत निघून गेली.

आणि परवां एक आश्चर्यकारक घटना घडली.

हिचें मला पत्र आलंय्.

"तुला! तें कसें बुवा? आश्चर्यच आहे!" —परांजपे.

"ह्याचा उलगडा तिनें पत्रांत केला आहे. आणि मघांशीं ती घुटमळत होती तें बहुधा त्याबद्दल असावं."

पत्र काढून मीं तें परांजपेला दिलें.

परांजपेनें तें वाचलें.

"श्री राजे यांस—

सप्रेम नमस्कार.

माझें पत्र पाहून आपणांस आश्चर्य वाटेल व चीडही येईल. त्यांत

गैर कांहीं नाहीं. आपण कदाचित् पत्र न वाचतांही फाडून टाकाल. इतकें असून मग मी हें पत्र कां लिहितें आहें? तर माझी बदललेली मनःस्थिति एका तरी पुरुषाच्या कानावर जावी. तुम्हांलाही मी दुखावलें आहे. तरी पण केवळ मनाचं समाधान म्हणून मी हें लिहीत आहें. याउप्पर पत्र वाचणं न वाचणं आपली मर्जी.

आपण माझं आयुष्य लहानपणापासून पाहिलंच आहे. मी अहं-भावी, कृतघ्न, गर्विष्ठ, माजोरी आहें—सर्व खरें आहे. माझ्या आयुष्यांत प्रसंग असे घडले कीं, अहंमन्यतेच्या शिखरावर मी चढूं लागलें. वेळींच मला कुणीं सावध केलं नाहीं. पण दुसऱ्यांना कां दोष द्या? माझ्या इतर वेळच्या उर्मट वर्तनामुळें मी त्यांचं ऐकेन असा त्यांना तरी का विश्वास वाटावा?

परंतु या वर्षांतील निरनिराळ्या घडामोडींमुळें मी सावध नि शाहाणी होऊं पाहत आहें. आतांपर्यंत असेच प्रसंग कदाचित् घडूनही गेले असतील. पण ताठरपणाच्या जोषांत मी त्यांतून कांहीं शिकलें नाहीं.

बरोबर वर्ष झालं; रावबहादूर वारले. माझा घरचा मोठा आधार गेला. माझ्या तुसड्या वागणुकीनें आई भीत भीतच माझ्याशीं बोलते. तिच्या वागण्यात मोकळेपणा नाहीं. आई आहे मानी! ती म्हणते, 'कांहीं भानगड नको आणि पोरीनं फट्कन् बोलावं अशी वेळच नको.'

एकदां मी बसमधनं घरीं येत होतें. शेजारीं शेजारीं दोन दोन खुर्च्यां असलेली बस होती. जवळजवळ सर्व बस अगदीं गच्च भरली होती. एका स्टॉपवर एक तरुण चढला. माझ्या शेजारची जागा तेवढी रिकामी होती. कंडक्टरनें तिकडे बोट दाखवलें. त्यानें हातानेंच नको म्हटलें.

'अहो, बसाना; जागा मोकळी आहे.' कंडक्टर म्हणाला.

'माफ करा ना. त्यापेक्षा खालीं उतरतों कीं! हो, उगाच भलता प्रसंग नको यायला.'

'म्हणजे?' कंडक्टरनें विचारलें.

तो उभा होता त्या बाजूला थोड्या वेळानें मोठ्यांदा हंशा पिकला.

'बरोबर आहे, शिक्षणाचा परिणाम' एक पेन्शनर म्हणाले.

बहुतेक माझाच विषय चालला होता. मला अगदीं राग आला. पण करतें काय ? आजूबाजूच्या बायकांतही कुजबुज चालू झाली.

'ही ती फटाकडी बरं का !'

'लग्न नाहीं का झालं अजून ?'

'कोण हिला पत्करणार ? वागणं हें असं. असेल कुणीतरी म्हसोबा. अहो इतकं वय वाढलं, अशीच कसची राहृत्येय् !'

त्या आरोपांची मला अगदीं शिसारी आली. पुढच्याच 'स्टॉप'वर मी खालीं उतरलें.

'बरं झालं पीडा गेली—मह्य ढालगज आणि शिष्ट—अहो, एकदां काय झालं—

पण तें ऐकायला मी थांबतें कशाला ? मी झपाझप चालूं लागलें. समोरुन मालती रानडे आपल्या पतीबरोबर येत होती. दोघांकडे पाहून खरं म्हणजे मला मत्सरच वाटला. ती थांबली. औपचारिक गप्पा झाल्यावर घरीं यायचं निमंत्रण दोघांनीं अगत्यानं केलं.

"मग सध्यां कसल्या कार्यांत आहेस ? अग मला वाटलं तूं आमच्यासारखं चूल नि मूल नाहीं करणार म्हणून म्हणालीस, तर कांहीं तरी बंड, सामाजिक नाहींतर राजकीय कार्य करणार असशील ? पण कुठं नांव ऐकलं नाहीं ! का प्रासिद्धिपराङ्मुख कार्यकर्ती ! पण तो तुझा स्वभाव नाहीं." मालतीनें विचारलें.

"हो, तसंच का म्हणेनास." मी तुटकपणें म्हटलें.

कसाबसा निरोप घेऊन मी चालूं लागलें.

पण डोकं कसं भणाणून गेलं! खरंच मी अविवाहित राहिलें ती कां? केवळ ताठरपणें लोकांना दुखवलें म्हणून! त्यामागें ना ध्येय, ना विचार-बद्ध योजना ! त्यामुळें आतां तें मनाला खुपतं—फार त्रास होतो. स्पष्टच सांगतें, पुरुषांना स्त्रियांशीं मिसळून बोलावंस वाटतं तसं स्त्रियांनाही वाटतं. पण दोघांचा अहंभाव आड येतो. सगळ्याच स्त्रियांना असं वाटतं. मग मी तर, माझ्या स्वभावामुळेंच का होईना, पण अशा संधि दवडून बसलेली—म्हणजे किती तरी दिवसांची उपाशी.

पण आतां लोकच मला दूर ठेवतात. प्रत्येक ठिकाणीं वैषयिक भावना नाहीं. पण पुरुषमैत्रीची आंच मात्र वाटते. त्यांतून म्हणतात पुरुष स्त्रियांपेक्षां दिलदार, मोकळे आणि कमी टोंचून बोलणारे. म्हणून मी मैत्रीसाठीं धडपडत असतें. कांहींना तो लोचटपणा, लघळपणा, वाटतो. पण त्याला इलाज नाहीं. मला पत्नी म्हणून जरी कुणीं पत्करलं नाहीं तरी मित्र म्हणून तरी ? तुम्ही सांगाल का, पुरुषांचे दृष्टीनें माझ्या वागण्यांत काय सुधारणा केल्या पाहिजेत ?

माझ्या मनाचा भार हलका करण्यासाठीं हें मी लिहिलेलं भारूड शांत चित्तानं वाचून मला कांहीं सुचविण्याची कृपा कराल तर मी आपली अतिशय ऋणी राहीन.

पत्र येथपर्यंत न वाचतां फाडलंत तरी त्यांत तुमची चूक काय आहे ?

—सुनंदा साने ”

“ मग लेका, काय उत्तर लिहिलंस ? ” परांजपेनें विचारलें.

“ लिहिणार आहें. म्हणून तर तुला बोलावणार आहें आज रात्रीं. आपण दोघं मिळून लिहूं. ” —मी.

“ तर मग उठायला पाहिजे. जेवण करून येतोंच बघ. ”

“ बराय् चला. ”

आम्ही उठलों.

दिवसभर जगाला तापविणारे सूर्यकिरण पाण्यांत बुडून शीतल होत होते.

# नागनाथ : : ६

नागनाथानं घरांत पाऊल टाकलं अन् त्याची उदासीनता अधिकच वाढली. कोंपऱ्यांत केराचा ढीग पडलेला होता. खोलींतले मळके कपडे अस्ताव्यस्त पडले होते. बरेच वर्षांत डागडुजी न केल्यामुळें गिलावा पडलेल्या भिंती अधिकच भकास वाटत होत्या. प्रत्येक कोंपऱ्यांतून जाळींजळमटं चिकार पसरलीं होतीं. खिडकीजवळ एक टेबल होतं. त्याच्यावर पुस्तकांचा अन् वर्तमान पत्रांचा ढीग होता. अन् तिथेंच सकाळीं ओढलेल्या सिगरेट्सची राख सांडली होती. नागनाथनं गालां-वरून हात फिरवला अन् आरशांत पाह्यलं. त्याच्यावर धूळ चिकार सांचली होती. नाहींतरी आपला ओबडधोबड चेहरा आरशांत पाह्यला तो कुठें फार उत्सुक होता ? त्यानं आरशावरून हात फिरवला नाहीं. तो स्वयंपाक घरांत गेला. त्याची म्हातारी आई खोकत खोकत चूल फुंकीत होती. पण लाकडं ओलीं असल्यामुळें धूर सारखा वाढतच होता. त्या म्हातारीची डोळे चोळतां चोळतां पुरेवाट झाली होती. नाग-नाथाच्या कपाळावर आंठ्यांचं जाळं पसरलं. त्यानं कोट काढला अन् पाटावर भिरकावून दिला. मग त्यानं आईच्या हातांतून फुंकणी काढून घेत तिला म्हटलं,

" तूं नीज. मी करतों स्वयंपाक. "

" तूं कसला स्वयंपाक करणार डोंबल्याचा ? तीं मेलीं ओलीं लांकडं पेटतां पेटत नाहींत. " नागनाथ कांहींच बोलला नाहीं. त्यानं आपलं फुंकण्याचं काम चालू ठेवलं.

" तुला लग्न करण्याची बुद्धि होत नाहीं. लग्न कर, लग्न कर, असं सांगून माझा जीव नुसता टेंकीस आला. कसलं ते देशभक्तीचं वेड डोक्यांत घेऊन बसलाय्. या वेडापायीं तुझ्या सगळ्या आयुष्याचा खेळ-खंडोबा झालाय् बघ. तुला स्वतःला त्रास अन्....." येवढ्यांत म्हातारीला खोकल्याची मोठी उबळ आली. नागनाथानं तिच्या पाठीवरून हात फिरवला. म्हातारीनं आपलं पुराण पुढें चालू केलं, " दुसऱ्यालाहि त्रास. असली कसली ती देशभक्ति ? जळ्ळं मेलं तिचं थोबाड ! "

नागनाथ कांहींच बोलला नाहीं. त्याला हें बोलणं ऐकण्याची संवय झाली होती. त्यानं परात उपडी केली अन् लाल ज्वारीच्या पिठाचा डबा पुढें ओढला.

आपली मळकट गादी लाथेनंच पसरून नागनाथ तिच्यावर आडवा झाला, तेव्हां घड्याळांत अकराचे ठोके पडले. संबंध दिवसाच्या कामानं तो अतिशय थकून गेला होता. सकाळीं सहा वाजतांच तो बोटीच्या धक्क्यावर गेला होता. आणि मग आठ वाजेपर्यंत त्याला उगीचच माशा मारीत बसावं लागलं होतं. कराचीहून येणारी निर्वासितांची बोट अजून आली नव्हती. ते दोन तास मग त्यानं आपल्या सहकाऱ्यां-बरोबर गप्पा मारण्यांत आणि ' चारमिनार ' ओढण्यांत घालवले होते आणि अखेर बोट धक्क्याला लागल्यावर त्यांतील निर्वासितांचा लोंढा उतरवून घेण्यांतच त्याचा पुष्कळ वेळ गेला होता. त्या उतारूंची फाटक्या कपड्यांनीं झांकलेलीं उघडीनागडीं शरिरं पाहून त्याला कांहींसुद्धां वाटलं नाहीं. असलं दृश्य पाहण्याचा त्याचा रोजचा परिपाठ झाला होता. रोज रोज त्याच गोष्टी पाहून त्याचं मन कणखर बनलं होतं. त्यानं त्या सग-ळ्यांना उतरवून ' निर्वासित समिती 'च्या मुख्य कचेरीवर नेलं होतं. तिथं त्यांचं नांव, गांव, जात, धंदा, वगैरे सगळं कांहीं टिपून घेतलें होतं. त्यांचीं रेशनकार्डें आणविलीं होतीं. त्या दिवशींच्या जेवणाची ताबडतोब व्यवस्था केली होती आणि येवढं करण्यांत रात्रीसपाटून केव्हां वाजले हें त्याला समजलंसुद्धां नव्हतं. त्याला आतां आणि भूक लागली होती. आज संबंध दिवसांत त्यानं दोन कप चहा घेतलं

दोन मिसळीशिवाय दुसरं कांहींसुद्धां घेतलं नव्हतं. मग त्यानं कोटटोपी काखेंत घेतली आणि घरचा रस्ता धरला. त्रासामुळें त्याच्या चेहऱ्यावर उदासीनता आली होती. त्यानं घरांत पाऊल टाकलं अन् त्याची उदासीनता अधिकच वाढली.

दुसऱ्या दिवशीं बरोबर नऊ वाजतां पुष्कळशा कपड्यांसह आपल्याला विमानतळावर हजर राह्यचंय् ही मनाला आठवण देऊन नागनाथनं अंगावरून पांघरूण घेतलं आणि मग त्याच्या आईनं त्याच्या डोक्यावरून हात फिरवून त्याचं पांघरूण सारखं केलं हें त्याला कळलं-सुद्धां नाहीं.

विमानाची चाकं जमिनीला लागून विमानाची गति थांबली. नागनाथनं आंत दृष्टि टाकली अन् लगेच डोळे मिटले. आंतमध्यें सगळ्या स्त्रियाच होत्या; अन् त्यांच्यापैकीं एकीच्याही अंगावर वोटभर वस्त्र नव्हतं. कित्येक दिवसांत तेल न मिळाल्यामुळें त्यांचे राठ झालेले केंस कसेबसे बांधले होते; प्रत्येकीच्या हातांत एखादद्दुसरीच बांगडी होती. त्यांच्यापैकीं कांहींनीं लहान अर्भकांना मांडीवर घेतलं होतं, अन् त्यांच्या चिमुकल्या तोंडाच्या आड आपले स्तन झांकण्याचा प्रयत्न केला होता. आतांपर्यंत पुष्कळ निर्वासित स्त्री-पुरुष नागनाथानं पाह्यले होते. पण हें दृश्य कांहीं विलक्षणच होतं. नागनाथानं आणि त्याच्या सहकाऱ्यांनीं डोळे मिटून घेतले, माना खालीं घातल्या. आणि आपल्या जवळचीं पातळें भराभर आंत फेंकण्यास सुरवात केली. तें दृश्य पाहून नागनाथाचा जीव गुदमरून गेला. कींव, अनुकंपा, सहानुभूति, संताप, प्रेम, निराशा अशा अनेक भावनांनीं त्याच्या अंतःकरणांत कल्लोळ मांडला. त्याच्या वृत्ति बधिर झाल्या. कानशिलं लाल झालीं. कपाळावर आलेला घाम पुसण्यासाठीं त्यानं तोंड वर केलं तेव्हां विमानांतून एकेक स्त्री खालीं उतरावयास सुरवात झाली होती.

सातआठ स्त्रिया खालीं उतरल्यानंतर चारपांच जणींचा घोळका एकदम विमानाच्या दाराशीं आला. त्या एका स्त्रीला अलगद धरून शिडीची एक एक पायरी उतरत होत्या. अरेच्या! म्हणजे ही स्त्री आजारी होती काय? मघांशीं नागनाथाला ती दिसलीच नव्हती. अत्यंत

सावकाशपणें ती एक एक पाऊल टाकीत होती. नागनाथानं तिच्याकडे निरखून पाह्यलं. ती स्त्री गोरीपान होती. पण बरेच दिवसांच्या आजारपणामुळें तिच्या चेहऱ्यावर फिकटपणा आला असावा. तिचा अंबाडा मोठा होता; म्हणजे तिचे केंस लांब असलेच पाहिजेत. पण बरेच दिवसांत तेल न मिळाल्यामुळें त्यांना चरवटपणा आला असावा. तिचे डोळे नि गाल अत्यंत खोल गेल्यामुळें तिचं नाक जरा वाजवीपेक्षा जास्तच मोठं दिसत होतं.

नागनाथ आणखी किती वेळ पाहत राह्यला असता कुणास ठाऊक! कुणीतरी त्याला म्हटलं, " चलायचं. अं? " " हो,चलायचं." नागनाथानं बावरून म्हटलं. नंतर मुख्य कचेरीवर गेल्यावर आलेल्या स्त्रियांची माहिती घेतां घेतां त्याला कळलं कीं, ती स्त्री सिंधमधल्या कुठल्याशा खेड्यांतून आली होती. ती मुळची महाराष्ट्रीय; पण तिचं सासर होतं ते सिंधकडचं. धंद्याच्या आणि शेतीच्या निमित्तानं तिच्या नवऱ्याच्या कित्येक पिढ्या तिकडेच गेल्या होत्या. त्यांच्या खेड्यावर मुसलमान गुंडांनीं जमावानं हल्ला केला होता. त्या हल्ल्यांत कित्येक घरं उध्वस्त झालीं होतीं आणि माणसं किती मारलीं गेलीं याचा हिशेबच नव्हता. हल्ला झाला त्या वेळेस ही स्त्री गरोदर होती. नुकताच तिला तिसरा महिना लागला होता. ह्या हल्ल्यांतच तिच्या नवऱ्याला बेदम मारण्यांत आलं होतं. तिच्या नवऱ्याचे चाललेले हाल तिला पाहवत नव्हते. तिला झींट येऊन ती धाड्कन् जमिनीवर पडली होती, आणि मग तिची शुद्ध गेली होती. तिनं डोळे उघडले तेव्हां आपलं स्वत्वही गेलं आहे असं तिला कळलं. तिचा नवरा तिला दिसला नाहीं. बहुतेक तो मेला असावा. तिच्या देखतच तो मरायला टेंकला होता. तिनं हंबरडा फोडला तेव्हां बाहेरच्या पडवींत चारपांच जणांचं खिदळणं तिच्या कानांवर आलं. तिनं पुन्हा हंबरडा फोडला होता, अन् मग पुन्हा तिची शुद्ध गेली होती. ती शुद्धीवर आली तेव्हां तिला कळलं कीं, आपण कराचींत निर्वासितांच्या छावणींत आहोंत अन् लवकरच आपल्याला मुंबईला पाठविण्यांत येणार आहे.

तिची ही हकीकत ऐकल्यावर कुणीं तरी म्हटलं, " या बाईची स्थिति

फार नाजुक आहे. त्यांना छावणींत ठेवून उपयोगी नाहीं. हॉस्पिटलमध्यें किंवा कुणाच्या तरी घरीं यांची व्यवस्था झाली तर बरं होईल."

"छे, छे! हॉस्पिटलमध्यें शक्य नाहीं. मुंबईतलीं सर्व हॉस्पिटलस् आधींच इतकीं भरलीं आहेत कीं, तिथं पाय ठेवायला सुद्धां जागा नाहीं. कुणाच्या तरी घरींच त्यांची व्यवस्था झाली तर बरं." कुणीं तरी म्हटलं. एकदोन क्षण शांततेचे गेल्यावर नागनाथानं हलकेंच म्हटलं

"या बाईची कांहीं हरकत नसेल तर माझ्या घरीं करीन मी यांची व्यवस्था."

त्या बाईनं नागनाथाकडे पाह्यलं. तिचे डोळे भरून आले होते. जणुं तिला म्हणायचं होतं,

"माझी कसली हरकत असणार ? उलट तुम्ही माझी इतक्या आस्थेनं काळजी घेतां हेंच माझं केवढं भाग्य !"

आतां नागनाथाच्या खोलीला पुष्कळसा व्यवस्थितपणा आला होता. मळक्या कपड्यांची जागा स्वच्छ कपड्यांनीं घेतली होती. जाळींजळमटांना चाट मिळाली होती. कोंपऱ्यांत केर दिसत नव्हता. अन् टेबल जरा आवरलेलं दिसत होतं. आजारी माणसाचं मन प्रसन्न राह्यला नको काय ?

ही स्त्री निर्वासित असून ती फार आजारी आहे येवढंच काय तें नागनाथानं आपल्या आईला सांगितलं. म्हातारी आपल्याकडून होईल तितकं आजाऱ्याचं औषधपाणी करूं लागली. सकाळीं उठल्यावर नागनाथ तिला स्वतः चहा करून देई. ती तोंड धुवायला गेल्यावर तिची गादी झटकून ठेवी. तिचा वेळ जावा म्हणून तिच्या उशाशीं कांहीं तरी हलकंसं वाचायला ठेवी, आणि घरांतून बाहेर पडतांना तिच्या खाटेपासून जरा बाजूला उभं राहून आपली दृष्टि वर न करण्याची खबरदारी घेत तो म्हणे,

"काय, आज बरं वाटतंय् का ?"

ती किंचित हंसून म्हणे,

'हो, पुष्कळच'

ह्या वेळीं सुद्धां नागनाथाची मान खालीं असे. तिला त्याचं हंसूं येई.

जातांना तो आपल्या आईला म्हणे, " यांच्याकडे लक्ष ठेव हं." संध्या-काळीं घरीं आल्यावर जरा अंतरावर उभे राहून तो विचारी,

" तब्येत ठीक आहे ? आज तुम्हीं काय खाल्लंत ? डॉक्टर आले होते काय ? " येवढं सगळं तो एका सपाट्यांत म्हणे. पण मग त्याचा जीव जरा घाबरल्यासारखा होई. तो तडक स्वयंपाकघरांत जाई अन् आईला विचारी, " कशी काय आहे त्यांची तब्येत ? " 'ठीक आहे.' आईसाठीं एखादे वेळीं तो मधूनच घरीं येई अन् अर्धापाऊण तास बसून परत जाई.

शांता इतक्या लवकर सुधारेल अशी नागनाथाला मुळींच कल्पना नव्हती. पण अवघ्या दोन महिन्यांत ती कल्पनेबाहेर सुधारली होती. तिच्या चेहऱ्यावरला पांढरेपणा जाऊन त्याच्यावर लाल झांक आली नव्हती काय ? तिचे गाल वर आले होते अन् त्यामुळें नाकाचा रेखीवपणा उमटून दिसत होता. तिच्या लांबसडक केसांना किती मोहक-पणा आला होता ! ती इतकी सुंदर दिसत असेल अशी नागनाथाला कल्पना नव्हती. आतां डॉक्टरनीं तिला कुठेंही जायला परवानगी दिली होती. त्या संधीचा फायदा घेऊन तिनं नागनाथाला म्हटलं,

" आतां मी जाईन म्हणतें."

" कुठें ? "

" कुठेंतरी. कुठेंही गेलं तरी आतां नवीनच घर करावं लागणार."

" मग आहे तेंच काय वाईट आहे ? हातचं सोडून पळत्याच्या मागं लागण्याची ही काय रीत बुवा ? आम्हां गरीबांच्या घरीं राह्यचा कंटाळा आला होय ? "

तिनं त्याच्याकडे क्षणभर पाह्यलं अन् मग खालीं पाहत आपल्या उजव्या पायाच्या अंगठ्यानं जमिनीची माती उकरीत ती हलकेंच म्हणाली,

" तुम्हीं असं बोललेलं मला पुन्हा आवडायचं नाहीं. ऐन संक-टाच्या वेळीं तुम्हीं मला हात दिलात, मृत्यूच्या जबड्यांतून बाहेर ओढून काढलंत. मी कलंकित झालें असतांनासुद्धां माझा तिरस्कार न करतां माझ्याशीं मोठ्या प्रेमानें वागलांत, माझ्या रक्षणाची जबाबदारी

सर्वस्वी तुम्हीं आपल्या शिरावर घेतलीत, तुम्हांला गरीब कोण म्हणेल ? तुमचं अंतःकरण विशाल आहे. तुम्ही मोठे आहांत--खरंच फार मोठे आहांत."

'इतकं बोलतां अन् पुन्हा जाण्याची गोष्ट काढतां ? छे, छे ! तें मला आवडणार नाहीं. निदान तुमची नीट सोय लागेपर्यंत तरी तुम्हीं येथें रहा. रहाणारना ?'

'राहीन. पण एका अटीवर.'

'कोणती ?'

'तुमच्या बरोबर काम करण्याची तुम्हीं मला संधि दिली पाहिजे. माझ्यासारख्या हजारों असहाय्य अबलांना मदत करतां आली तर मला किती धन्यता वाटेल म्हणून सांगूं ? अन् शिवाय......'

"कबूल. एकदम कबूल. आतां तुम्ही बोलूंच नका. ठरलं. उद्यां सकाळीं सात वाजतां हुशार रहा." असं म्हणून तो मोठयानं हंसला. त्यानं डोक्यावरची टोपी तिरपी केली, पायांत चपला सरकवल्या अन् शीळ घालण्यासाठीं तोंडाचा चंबू केला. त्याच्या आनंदाचं तिला कौतुक वाटलं. त्या साध्याभोळ्या जिवाकडे पाहून ती हंसली. त्यानं विचारलं,

'काय झालं ?'

तिनं म्हटलं, 'कुठें काय ?'

आपल्या कामांत दोघंही किती रममाण झालीं होतीं ! दिवस कसा जातो हे त्यांना कळतसुद्धां नव्हतं. रोज येणाऱ्या शेंकडों बायकांची सुख-दुःखाची कहाणी ऐकून त्यांचं सांत्वन करण्यांत, त्यांना अन्न व कपडे पुरविण्यांत, त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यांत तिला वेळ पुरेनासा झाला आणि येवढं करून शिवाय नागनाथाच्या घरचं वातावरण तिनं बदलून टाकलं होतं. ती फक्त दुपारींच कामावर जाई. सकाळीं ती घरांतलं बघे. किती थोड्या वेळांत तिनं घराचं स्वरूप बदलून टाकलं होतं ! तिच्या सुग्रणपणामुळें आणि नीटनेटकेपणामुळें घरांत किती मांगल्य पसरलं होतं ! आतां नागनाथ रोज दुपारीं घरीं येई अन् मग सुग्रास अन्नाचं ताट पुढें येताच तो तिच्याकडे पाहून हंसे. ती विचारी, 'काय झालं ?' तो म्हणे, 'कुठें काय !' रात्रीं तीं दोघें थकून घरीं

येत तरीसुद्धां ती चट्कन् स्वयंपाकघरांत येऊन त्याचं अर्ध्या ताटांत पान वाढी. आतां त्याला आपली गादी लाथेनं पसरावी लागत नव्हती. त्या स्वच्छ चादरीवर आपलं अंग पसरून देतांना तो आपल्या आईला म्हणे,

'आई, उद्यां सकाळीं मला लवकर उठव हं.' पण हें बोलणं आईला नसून आपल्याला आहे हें तिच्या शेजारीं निजलेल्या शांताला उमगे. नागनाथ बाहेर मोठ्यानं हंसे आणि मग शांतालाही आपलं हंसूं दाबणं कठीण जाई.

ती दोघं हलके हलके किती जवळ येत होतीं! त्या दोघांना तें समजत होतं कीं नव्हतं कुणास ठाऊक? पण म्हातारीच्या नजरेंतून ही गोष्ट सुटणं शक्य होतं काय? आपला मुलगा आतां मार्गाला लागेल असं वाटून तिला आनंद होणं अगदीं साहजिक होतं. तिनं शांताला म्हटलं,

'पोरी, आतां लग्न उरकून टाका. म्हणजे दिसायलाही वाईट दिसायचं नाहीं अन् मीं काळजींतून मुक्त होईन. त्या पोराच्या सगळ्या खोडी तुला कळल्या आहेत. तुम्ही अगदीं सुखानं संसार कराल–माझा तुम्हांला आशीर्वाद आहे.'

शांता एकदम चरकली, पण ती कांहींच बोलली नाहीं. त्या दोघांच्यासमोर म्हातारीनं पुन्हा जेव्हां प्रश्न काढला तेव्हां दोघांनींही एकमेकांकडे पाहलं अन् माना खालीं घातल्या. बाहेरच्या खोलींत आल्यावर काय बोलावं हे नागनाथाला सुचेना. त्यानं शांताकडे न पाहतांच मोठ्यानं म्हटलं,

'आमची आई म्हणजे अगदीं वेडी आहे. तिला कांहीं कळत नाहीं. तुम्ही तिच्याकडे लक्ष देऊं नका.' पण मग त्याला काय वाटलं कुणास ठाऊक? तो टेबलाजवळ सरकला अन् एक मांडी टेबलावर ठेवीत हलकेंच म्हणाला,

"आईचं म्हणणं आपण खरं करून दाखवलं तर?" शांता कांहींच बोलली नाहीं. टेबलावरच्या पुस्तकांवर तिची नजर खिळली

होती. त्याला वाटलं आपण भलतंच कांहीतरी बोलून गेलों. चांचरत त्यानं म्हटलं,

'रागावलांत काय?' तरीही शांता बोलेना. तो घाबरून म्हणाला,

'माफ करा हं! मी भलतंच बोलून गेलों. त्यानं कोटटोपी चढवली आणि आरशांत पाह्यलं. स्वतःच्या काळ्या आणि देवीच्या वणांनीं विद्रूप झालेल्या चेहऱ्याची त्याला लाज वाटली त्यानं गालावरून हात फिरवला. त्याची दाढी किंचित् वाढली होती. त्याच्या मनांत आलं, 'आपल्या नशिबीं सुख नाहींच काय?' त्याचे डोळे भरून आले. शांतानं त्याच्याकडे पाह्यलं. तिला त्याची कींव आली. तिनं विचारलं, 'काय झालं?' चेहऱ्यावर उसनं हंसूं आणण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला,

'माफ करा. म......माझी ती लायकी नाहीं.' शांताला आपल्या हृदयावर तापलेल्या लाल सळईचे पट्टे ओढल्यागत वाटलं. ती म्हणाली,

'नका, असं बोलून मला आणखीन् लाजवूं नका. माझ्यावर केलेल्या उपकारांचा पाढा वाचून दाखविण्याची माझी इच्छा नाहीं. आणि तुम्हीं केलेल्या उपकारांची थोड्याफार अंशानें का होईना, पण फेड म्हणून तुमची मागणी मान्य करण्यांत मला धन्यताच वाटेल. पण...'

'पण काय?'

'लोक काय म्हणतील?

आतां नागनाथाला पुष्कळच धीर आला होता. आपल्या कोटाच्या बटणांशीं चाळा करीत त्यानं म्हटलं,

'लोकांच्या म्हणण्याची तुम्हांला पर्वा नसली तर मला मुळींच नाहीं. हें एखाद्या नाटकांतल्या नायकासारखं मी बोलत नाहीं. पण खरंच मला पर्वा नाहीं. या पस्तीस वर्षांत माझ्या आईशिवाय मला कुणाचा गोड शब्द ऐकायला मिळाला नाहीं. माझ्या कुरूपतेची लाज वाटून मी कधीं लग्नाच्या भानगडींत पडलों नाहीं. पण......पण दमून भागून घरीं आल्यावर या पडक्या घराच्या भकास भिंती जेव्हां माझं स्वागत करतात, तेव्हां माझ्या हृदयांत कालवाकालव होते. तुम्ही घरीं आलांत

आणि या घराचं वातावरण बदलून टाकलंत. मला आतां घरीं यायला किती उत्साह वाटतो म्हणून सांगूं! खरंच, रहाना! मी...मी कुरूप...'

शांतानं झट्‌कन् वर पाह्यलं अन् पाणावलेल्या डोळ्यांनीं म्हटलं,

'असं बोलूं नका.'

त्यानं अधीरतेनं विचारलं,

'म...म...रहाल इथं?'

'राहीन.'

'कायमच्या?'

'हो.'

'मला सोडून जाणार नाहीं.?'

'नाहीं.'

'कध्धीं नाहीं?'

'नाहीं.'

नागनाथानं तिच्याकडे पाह्यलं. तिचा हात हातांत घ्यावा असं त्याला फार वाटलं. पण त्या प्रेमळ भित्र्या जिवाला तें धाडस झालं नाहीं. तो फक्त म्हणाला,

'मग उद्यां लग्नाची नोटीस देऊं तर?'

तिनं हंसत मान हालवली.

पण दुसऱ्या दिवशीं कामाच्या गर्दीमुळें त्याला नोटीस देण्यास वेळच मिळाला नाहीं. सगळं काम आटोपून तो व शांता ऑफिसमधून परतण्याच्या बेतांत होतीं, तोंच तिला कुणीं तरी म्हटलं,

'खालीं तुम्हांला कुणीतरी पाहत आहे.'

'कोण आहे?'

'मला माहीत नाहीं.'

शांता खालीं धांवत गेली. नागनाथही तिच्या मागोमाग गेला, आणि समोरच्या गृहस्थाला पाह्यल्याबरोबर आपण घेरी येऊन पडणार असं तिला वाटलं.

'छान, साऱ्या मुंबईभर शोधलं मीं तुला. कुठें होतीस तूं!' त्या गृहस्थानं किंचित् त्रासून विचारलं.

'यांच्या घरीं!' नागनाथाकडे पाहून शांतानं म्हटलं आणि मग आंवढा गिळीत शांता नागनाथाला म्हणाली.

'हे माझे पति.' नंतर आपल्या नवऱ्याला उद्देशून ती म्हणाली,

'हे नागनाथपंत जोशी. यांनीच मला जीवदान दिलं. हे नसते तर......'

त्या गृहस्थानं नागनाथाकडे चमत्कारिक नजरेनं पाहलं अन् कांहीं तरी म्हणायचं म्हणून तो म्हणाला,

'असं काय? छान. मी आपले आभार मानतों.'

एकदोन क्षण कुणीच कुणाशीं बोललं नाहीं. पण मग तो गृहस्थ शांताला म्हणाला,

'चला आतां. उद्यां सकाळीं आपल्याला कराचीला निघायचं आहे. तिथेंच आपण स्थायिक होणार आहोंत.'

सारं जग आपल्याभोंवतीं फिरत आहे असं शांताला वाटलं. तिचे डोळे भरून आले. अगतिकतेनं कांठोकांठ भरलेल्या डोळ्यांनींच तिनं नागनाथाचा निरोप घेतला.

विलक्षण मानसिक त्रासामुळें नागनाथाच्या चेहऱ्यावर उदासीनता आली होती त्यानं घरांत पाउल टाकलं अन् त्याची उदासीनता अधिकच वाढली. जगांत आपण अगदीं एकटे–पोरके–आहोंत असं त्याला वाटलं. स्वयंपाकघरांत धूर कोंडला होता. नागनाथाच्या डोळ्यांपुढें अंधेरी आली. आपली गादी लाथेनंच पसरून नागनाथ तिच्यावर आडवा झाला आणि त्यानं डोक्यावरून पांघरूण घेतलं.

# मा थेन थेन : : ७

मला एक मोटार विकत घ्यायची होती. माझ्या बायकोचा माझ्यामागें सारखा लकडा लागला होता. मोटारी बाजारांत फारशा येतच नाहींत. ज्या थोड्या येतात त्या भरमसाट किंमती देणारे सधन परस्पर खरीदतात, अशीं अनेक कारणें सांगून मी माझ्या बायकोला आजवर थोपवून धरलें होतें. पण तिचा धीर पार सुटला होता. ती म्हणे, "नवीन मिळत नाहींत, तर चांगलीशी पाहून सेकंडहँड तरी घ्या. तुम्ही रोज कामावर जाणार इतक्या दूर. ट्रेननं जायचं तर फारच लौकर निघावं लागतं. यायचं उशिरां. संध्याकाळीं त्यानंतर कुणाला भेटायलासुद्धां जातां येत नाहीं. कसला हा दिनक्रम! कामाला जाण्यायेण्यांत दिवसाचा एकचतुर्थांश वेळ घालवायचा, कामांत एकचतुर्थांश, उरल्या अर्ध्यांत झोंप वगळून बाकी किती वेळ उरतो? असं नाहीं उपयोगी. चोवीस तासांचे कांहीं पंचवीस करितां येत नाहींत. तेव्हां आहे त्यांतच वेळ काढला पाहिजे. नाहींतर एकमेकांचा सहवास मिळायचा तरी केव्हां? युद्धकालांत युद्ध चालू म्हणून मला दूर रहावं लागलं. ते संपलं नी आतां या कधीं नव्हे त्या बिऱ्हाड करून राहण्याच्या आलेल्या संधीचा फायदा न घेतला पुरेपूर तर न जाणो पुन्हा बदली होईल. तुम्हांला परदेशीं पाठवितील. कांहींना कांहीं कारणानें मला तुमच्यापासून दूर राहावें लागेल. तेव्हां तुम्ही मोटार घ्या म्हणजे जरा आपल्याला जास्त वेळ मिळेल. शिवाय जरा हिंडतांफिरतांही येईल.

म्हणूनच मी मोटारीच्या शोधांत होतों. वर्तमानपत्रांतील मोटारींच्या जाहिरातींचा स्तंभ दृष्टीखालून घालीत होतों. त्यांत सर्वांत जास्त सुखकर नी सोयीस्कर, पण पेट्रोल अगदीं कमी पिणारी, चालायला चपळ, पण किंमतीला कमींत कमी अशी अगदीं 'आंखुड शिंगी, बुहुदुधी कामधेनु' मोटार मिळते का पाहत होतों. हें मोठें अवघड काम होतें खरें. कारण माझी व्यवहारशून्यता—ही जाणीव विवाहोत्तर झाली, म्हणजे बायकोनें मला हा माझा गुण दाखवून दिला—आणि चांगली मोटार विकणाराचें व्यवहारचातुर्य या दोन्हीचा मेळ बसला तर सौदा पटायचा नी मोटार खरेदी व्हायची ना ?

त्या जाहिरातींपैकीं एका जाहिरातीनें माझें लक्ष वेधलें. जाहिरातींत वर्णन केलेल्या मोटारीनें नव्हे तर तिच्या खालच्या पत्त्यानें. पत्ता होता माझ्या एका जुन्या बेपत्ता झालेल्या मित्राचा. किती दिवस झाले तो मला भेटला नव्हता. युद्ध संपून गेल्यावर त्यानें एअर फोर्समधली नोकरी सोडली. त्यानंतर त्याचें काय झालें हें मला आजवर कळलें नव्हतें. मी नी तो बरोबरच एअर फोर्समध्यें दाखल झालों होतों. दोघेही एकाच वेळीं ट्रेनिंग घेऊन बाहेर पडलों नी ब्रह्मदेशांत दोघेही एकाच एअर फोर्सच्या स्क्वॉड्रनमध्यें युद्धावर होतों. त्या सर्व एकत्र सहवासांत आमची दृढ मैत्री जमली होती. युद्धाच्या अनिश्चित, संकट-ग्रस्त परिस्थितींत, मृत्यूची तलवार डोक्यावर सारखी लटकत असतांना व्यक्तीच्या स्वभावाची खरी परीक्षा होते. औपचारिक संभाषणामागें व औपचारिक गांठीभेटींत चालणाऱ्या शिष्टाचाराच्या पडद्याआड जसे मूळ स्वभाव दडून राहतात तसें युद्धाच्या आघाडीवर होत नाहीं. यामुळें युद्धांतील हालअपेष्टा एकत्र सहन करितांना होणाऱ्या मैत्रीची तऱ्हा जिवंत झऱ्याच्या पाण्याप्रमाणें असते. तें आटत नाहीं.

पत्त्याच्या खालीं टेलिफोन नंबर दिला होता. त्यावर मी टेलिफोन केला. आवाज ऐकूं आला तो इतका निराळा कीं त्यानें आपण 'ब्रिजभूषण' असल्याचें सांगितलें नसतें तर मला खरें वाटलें नसतें.

मी म्हटलें, "अरे, ब्रिजभूषण ! तुझा पत्ता काय ? होतास तरी कुठें इतके दिवस अज्ञातवासांत ?" मी आणखी सुद्धां प्रश्न विचारले असते.

पुष्कळ दिवसांच्या भेटीच्या आनंदानें त्याच्याशीं किती बोलूं नी किती नको असें मला झालें होतें.

पण व्रिजभूषणचीं उत्तरें अगदीं निरुत्साही नी एकदोन शब्दांचीं येत होतीं.

" माझ्या घरीं येशील कां भूषण आज संध्याकाळीं ? "

" नाहीं. "

" मला चट्‌कन् येतां यायचें नाहीं. तुझ्याजवळ मोटार आहे; तुलाच माझ्याकडे येणें सोपें पडेल. "

" मला बरें नाहीं."

" असं होय ? बरं. मग मीच येईन तुझ्याकडे आज संध्याकाळीं."

असें म्हणून त्याच्याकडे जायचें मीं ठरविलें.

मोटार विकत घ्यायची ती ओळखीच्या चांगल्या मित्राकडून हें त्यांतल्या त्यांत बरें असा विचार विभावरीच्या मनांत आला होता. मी आज ऑफिसांतून मुद्दाम फार लौकर घरीं आलों नी विभावरीला म्हटलें, " विभावरी ! चल मोटार घ्यायला. तुला मी म्हटलें होतें ना मागें कीं ब्रह्मदेशांत एअर फोर्समध्यें माझ्याबरोबर व्रिजभूषण म्हणून एक माझा परम मित्र होता. त्याचाच आज पत्ता लागला. त्याचीच मोटार विकायची आहे. बरं झालं त्याचीही फार दिवसांनीं गांठभेट होईल नी मोटारही विकत मिळेल. मोटार विकायची आहे त्याला तेव्हां त्यानें अगोदर जर कुणाला शब्द दिला नसला तर मलाच देईल तो मोटार. चल लौकर चहा दे करून नी कपडे बदलून हो तयार कीं निघूं. शक्य-तर त्याच मोटारीनं आज परत घरीं येऊं."

इतक्यांत आठवण होऊन पुन्हा म्हणालों, " विभावरी, माझ्या टेब-लाच्या खणांतून तेवढं नॅशनल बँकेचं माझं चेकबुक घे बरं का बरोबर. विसरूं नको. "

बालिगंजांतल्या एका घराचा पत्ता दिला होता तो विचारून शोधा-यला थोडा वेळ लागला, पण घराच्या आवारांत गेल्यावर एका तळ-मंजल्याच्या खोलींत व्रिजभूषण राहतो म्हणून कळलें. त्या खोलीच्या बाहेरच

दरवाजासमोर एक फार चांगली दिसणारी ऑस्टिन मोटार उभी होती. पण तिच्यावर धूळ मात्र जरा बसलेली दिसली. मोटार कांहीं दिवस उभीच असावी न वापरतां.

" हीच ती मोटार." मी म्हणालों.

" बरी दिसती आहे, नाहीं. " असं म्हणत विभावरीनें तिचं दार उघडलं. आंत नजर टाकली. चामड्यानं मढविलेल्या आंतल्या गाद्या, खिडक्या, छपराखालील लोंकरीच्या कापडाचें अस्तर—सारें नीट व उत्तम स्थितींत होतें. तिनें हॉर्न वाजविलें. त्याचाही आवाज खणखणीत आला. बॅटरी उत्तम स्थितींत होती.

" चांगली आहे नाहीं मोटार, " असें मला उद्देशून विभावरीनें पुन्हा विचारलें. मी बाहेरच्या रंगावरून नजर टाकली. टायर्स पाहिल्या. हवा टायर्समध्यें कमी नव्हती. एंजिनवरचें बॉनेट उघडून पाहिलें. काळजीपूर्वक वापरलेलें इंजिन दिसत होतें तें उघडच. मी समाधानानें बॉनेट परत लावीत उद्‌गारलों,

" अशी छान वापरायला पाहिजे मोटार ! "

" खरंच बाई, फारच सुंदर आहे. हीच घ्यायची अं. " विभावरीनें विचार पक्का करून, मनानें तींत बसून आपण कसे सुखानें हिंडूं याची कल्पना रंगविण्यास सुरुवात केली.

खोलीच्या दारावर टक्टक् केलें पण लौकर उत्तर आलें नाहीं. शेवटीं दार लोटून पाहिलें. तें उघडेंच होतें. करकर आवाज करीत तें उघडलें आणि अतिशय अस्ताव्यस्त सामान पसरलेली, न झाडलेली, न झटकलेली खोली दृष्टोत्पत्तीस पडली. तो तिथला अव्यस्थितपणा पाहून मला कसेंसेंच वाटलें. विभावरी माझ्या खांद्यावरून डोकावून पाहत होती. एका कोंपऱ्यांत एक खाट पडलेली होती. त्यावर भिंतीकडे तोंड करून पाय पोटाशीं घेऊन कुणी निजलेलें होतें. खोलींत उगीच आलों असा विचार मनांत येऊन मी बाहेर पुन्हा जावें म्हणून पाय टाकणार तों त्या खाटेवरची व्यक्ति तोंड न फिरवतां तशीच पडल्या पडल्या एकदम म्हणाली, " आलास का राजेंद्र ! बस त्या डेक चेअरवर. जपून बस, पडशील ! "

माझ्यामागें विभावरी तर दचकलीच. त्या खोलीचा नूर नी आतां झालेलें विचित्र स्वागत पाहून मलाच चमत्कारिक वाटत होतें. तर तिला तसें वाटल्यास काय नवल !

" कोण ब्रिजभूषण! असा रे कां निजलास ? फार आजारी आहेस कीं काय ? "

" ठीक आहे माझें. कांहीं नाहीं होत मला. बस तूं खालीं."

" कांहीं होत नाहीं तर उठून बस. ही बघ तुझी वहिनी आली आहे माझ्याबरोबर. तिला भेटला नाहींस कधीं पूर्वी तूं."

विभावरी माझ्याबरोबर आहे हें ऐकून तो कुशीवर वळून उठला नी आमच्याकडे त्यानें पाहिलें. त्याचा चेहरा पाहून मला धक्काच बसला. इतका तो ओढलेला, खंगलेला होता. केस विस्कळित नी पिंजारलेले, दाढी आठवड्याची वाढलेली. ओठ सुकलेले, डोळे तारवटलेले नी विस्फारित होते, व त्यांच्याभोंवतालीं काळीं ओढलेलीं वर्तुळें दिसत होतीं. त्यानें हंसल्यासारखें केलें. त्या हास्यानं त्याच्या चेहऱ्यावर मार्दव येण्याऐवजीं उलट जास्तच अवकळा आली.

विभावरीनें माझा हात घट्ट धरून ठेविला. कसला हा मित्र यांचा ! नक्की वेड लागलेलें दिसतें आहे त्याला. असा विचार विभावरीच्या मनांत आला असावा.

" नमस्ते. वहिनी, मी कांहीं तुम्हांला बसा म्हणत नाहीं. बसा म्हण-सारखी ही खोली नाहीं, कीं बसा म्हणण्यासारख्या स्थितींत मी नाहीं. राजेन्द्र मला म्हणाला नाहीं कीं, तो तुम्हांला बरोबर आणणार आहे. नाहींतर तेव्हांच मी सांगितलें असतें त्याला ' नको ' म्हणून. "

थोडा वेळ थांबून तो पुढें बोलूं लागला—" माझी वर्तणूक विचित्र दिसत असेल, हें तुम्ही न बोलतांच माझें मला कळतें, पण त्याच्या कारणांची मीमांसा करीत बसण्यांत अर्थ नाहीं. पुन्हा जास्त बऱ्या मनः-स्थितींत असतांना केव्हां तरी मी तुमची भेट घ्यावी हें बरें. तूर्त मुद्याला वळूं. मला मोटार विकायची आहे आणि राजेंद्र, तुला घ्यावयाची आहे, म्हणून तूं जाहिरात वाचून आलास. "

" छे, छे " मी मध्येंच उद्गारलों, " केवळ मोटार घेण्यासाठींच

कांहीं मी आलों नाहीं. तुझी भेट घ्यावी हाही माझा तेवढाच उद्देश होता."

माझें हें विधान नुसत्या हातानें फेटाळून लावल्यासारखें करीत तो तसाच पुढें म्हणतो, " मोटार तुम्ही पाहिलीच आहेत आल्याबरोबर तपासून. काय वाटतें तुम्हांला तिची किंमत ? "

मी विचारलें—" तुझी अपेक्षा काय आहे ? "

" माझी अपेक्षा ? माझी अपेक्षा येवढीच कीं, मोटारच्या किंमतींतून गेल्या चार महिन्यांचें घरमालकाचें भाडें व जेवणखाणाचें बिल वगैरेचे पांचशे रुपये चुकते करावे आणि विमानानें मला रंगूनला आणि पुढें मूलमेनला जाण्याइतकें भाडें मिळावें म्हणजे झालें. मला वाटतें अठराशे रुपयांत हें सर्व होईल."

" अठराशें रुपये ? " मी आश्चर्यानें उद्गारलों.

" का फार झाले ? " तो अजीजीच्या स्वरानं म्हणाला.

" छे, छे ! फार कमी झाले ! असली चांगली गाडी या दिवसांत अठराशें रुपयांला विकायला तुला वेड का लागलें आहे ? तुझ्या राहण्याच्या तऱ्हेवरून तुला पैशाची अगदीं ददात नाहीं, असेंच कांहीं माझें मत झालेलें नाहीं. तुला......"

" मला पैशाची ददात असो वा नसो तुला काय त्याचें ? अठराशें रुपये किंमत तुला पटत असली तर पैसे दे आणि मोटार घेऊन जा. "

या सर्व प्रकारानें मी जरा बुचकळ्यांत पडलों. मोटार तर उत्तम होती व अठराशें रुपयांला म्हणजे तर फारच उत्तम सौदा होता. पण ब्रिजभूषणच्या वागण्याची एकंदर तऱ्हा पाहतां ही मोटार त्याच्यापासून घ्यावी का नाहीं असा मला प्रश्न पडत होता. पण माझ्यामागून विभावरी म्हणाली, "टाकाना घेऊन. द्या त्यांना पैसे. अठराशेंचा चेक द्या त्यांना लिहून. " हा जर तुमचा मित्र अशा विचित्रपणानें आपल्याशीं वागत आहे तर आपलें तरी काय नडलें आहे! तो बोलतो आहे त्याचप्रमाणें स्वच्छ व्यवहार त्याच्याशीं बोला, असें म्हणण्याचा विभावरीचा आशय दिसला.

मीही जास्त न बोलता चेकबुक काढलें आणि ब्रिजभूषणच्या

नांवानें अठराशें रुपयांचा चेक लिहिला आणि त्याच्या हातांत दिला. तो घेत माझें फौंउंटनपेन त्यानें मागून घेतलें आणि टेबलावरच्या एका चिठोऱ्यावर ती मोटार मला विकल्याचें दोन ओळींचें पत्र लिहून त्यानें माझ्या हातांत दिलें. टेबलावरच पडलेल्या मोटारीच्या किल्ल्या माझ्यापुढें ढकलीत तो म्हणाला—" या घे किल्ल्या आणि जा मोटार घेऊन. ती आतां तुमची झाली आहे." मग आपल्याशींच उसनें हंसून तो स्वगत बोलल्याप्रमाणें पुन्हा म्हणतो—" हो, फिरून ती माझी नाहीं! ती दुसऱ्याची आहे !" आणि तो आपल्या खाटेवर लवंडला. तिथें क्षणभर जास्त थांबणें शक्य नव्हतें. मी आणि विभावरी तेथून लागलीच निघालों. मोटारींत बसून मी मोटार सुरू केली आणि बंगल्याच्या आवाराच्या बाहेर पडलों. इतक्यांत विभावरी म्हणाली—" थांबा, थांबा, ते पहा तुम्हांला हांक मारीत आहेत." मी गियर न्यूट्रलमध्यें टाकीत मागें पाहिलें तों ब्रिजभूषण हातांत उघडलेला चाकू घेऊन वेड्यासारखा आमच्या दिशेनें धांवत येत होता. तें पाहून आमच्या मनाला धसकाच बसला. हा तर नक्कीच वेडा झाला असावा असें वाटलें. आणि मी गर्दीनें पायापाशीं पडलेलें मोटारचें स्टार्टिंग हँडल हातांत घेऊन मोटारीच्या बाहेर येऊन उभा राहिलों. कदाचित् हा माथेफिरू सुरी आमच्यावर चालवूं लागला तर आत्मसंरक्षणार्थ त्याचा प्रतिकार करायला हातांत कांहींतरीं असलेलें बरें.

पण ब्रिजभूषण माझ्याजवळ न थांबतां मोटारीच्या पुढें गेला आणि बॉनेटवर चाकूनें तो जोरजोरानें खरडूं लागला. मी पुढें होऊन पाहूं लागलों तो मोटारीच्या बॉनेटवर चांगल्या रंगानें इंग्रजीमध्यें वळणदार अक्षरांत लिहिलेलीं " मा थेन थेन " हीं अक्षरें तो खरवडून काढीत होता !

गोडीगुलाबीनें मी त्याला म्हटलें—" ब्रिजभूषण, ही काय चालवली आहेस मोटारची खराबी तूं ? ही मोटार तूं मला आतां विकलीस हें विसरलास का ? "

" नाहीं-नाहीं." तो निक्षून म्हणाला—"तुला मोटार विकली असली तरी 'मा थेन थेन' या नांवासकट नाहीं." आणि असें म्हणतां

म्हणतां त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले आणि तो स्फुंदूं लागला. रस्त्यावर हा प्रकार ठीक नाहीं असें पाहून मी त्याला मोटारींत बसवला.

" चल, ब्रिजभूषण ! चल तुझ्या खोलीवर पाहूं. मला सांग काय तुझ्या मनांत डाचत आहे तें सारें. तुला नांव खरडून टाकायचें असलें तर मीही तुला मदत करीन. तुझ्याजवळ आणखी सुद्धां चाकू वगैरे कांहीं असेलना ! " असें म्हणत मी मोटार वळवून त्याच्या खोलीवर त्याला परत घेऊन गेलों.

त्रिभावरीला मी नुसती डोळ्यानें खूण केली. आणि तिनंसुद्धां ओळखलें कीं, या प्रसंगीं मोठ्या खुबीनं वागलं पाहिजे. आपलं अस्तित्व जाणवूं नये अशा तऱ्हेनें ती मागें मागें राहून वागूं लागली. ब्रिजभूषण आपल्या मनांतील सारी मळमळ माझ्यापुढें ओकून टाकण्याला उद्युक्त व्हायचा तर जितकी शांतता नी एकांत त्याला द्यावा तितकें बरें होतें.

एका खोल आरामखुर्चीवर मी त्याला बसविला, आणि मी त्याच्या बांजूला ती डेक चेअर ओढून बसलों. त्रिभावरी त्याच्यामागें त्याला न दिसेलशी बसली होती. मी त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला गोंजारींत स्नेहार्द्रतेनें विचारलें, " काय ब्रिजभूषण, कसलं दडपण पडलं आहे तुझ्या मनावर येवढं ? सांग मला, सारं सांग पाहूं."

त्याचे हुंदके आवरले होते. तो शून्यदृष्टीनं पुढें पाहत होता. मी पुन्हा आग्रह करूं लागलों, " सांग, मोकळ्या मनानें माझ्याजवळ सगळं बोल तुझं हृद्गत. तुला आठवत नाहीं का आपण किती जिवाभावानं वागत होतों ब्रह्मदेशांत आघाडीवर असतांना ! किती मोकळेपणानं आपण एकमेकांशी बोलत होतों ! किती स्नेह होता आपला ! त्या एक दिवशीं आपण जपानी जागांवर टेहळणी करायला गेलों नी तुझें विमान परत आलं नाहीं असं मी परत आल्यावर मला कळलं तेव्हां ब्रिजभूषण, कसं माझ्या जिवाचं पाणी पाणी झालं !......"

" होय त्याच वेळीं," ब्रिजभूषण एकदम बोलूं लागला, " होय त्याच वेळीं, राजेंद्र ! माझ्या जिवाचा खेळखंडोबा केला दैवानं ! "

ब्रिजभूषण आपलं ओथंबलेलं दुःख आपली कहाणी सांगून हलकें करूं लागला. पावसाळ्या दिवसांत ढग हृदय भरून जड अंतःकरणानं येतो. त्याच्या दुःखाची परमावधि होऊन, त्याच्या दुःखाची मोट केव्हां ओसंडेल असें झालेलें असतें. त्याला वाटेंत एखादा पर्वत स्नेहार्द्रपणानें भेटून विचारपूस करूं लागल्याबरोबर कसा तो ढग वितळतो! तसंच ब्रिजभूषण आतां मुक्तकंठानं आपल्या दुःखाची कहाणी मला सांगत होता.

त्या दिवशीं सकाळीं टेहेळणी करण्याच्या नी जमलें तर शत्रूच्या हालचाल करणाऱ्या वा रसद पोंचविणाऱ्या मोटारींवर भडिमार करण्याच्या इराद्यानें आपलीं चार विमानें निघालीं. मूलमेन शहराच्या दक्षिणेस पन्नास मैलांवर जपान्यांच्या आक्रमण करीत येणाऱ्या सैन्याच्या तुकड्यांपैकीं कांहीं मोटारी दिसल्या. त्यांवर हल्ला करायचें ठरवून V. H. F. ( Very High Frequency ) रेडिओ टेलिफोनवर आपण एकमेकांशीं बोललों.

त्यानंतर मी जरा जास्तच खालीं सुरकांडी मारून, जमिनीसरपट झाडांच्या शेंड्यांना जवळजवळ चाटून जात जात त्या कांहीं मोटारींवर माझ्या बंदुकांची फैर धरली. अशा मी दोनतीन सुरकांड्या मारिल्या. मात्र चौथ्या वेळीं खालून जात असतांना जपानी लष्करापैकीं एकानें माझ्या विमानावर बेफाम होऊन मशीनगन अशी धरली कीं, त्या थोड्याच माऱ्यांत मला वर्मीं लागलें. सुरकांडींतून विमान बाहेर काढून, मी उंचीवर चढवूं लागलों तर तें चढेना जोरानें. विमानाच्या हालचालींत जडपणा येऊं लागला होता. तुम्ही मला रेडिओ टेलिफोनवर हांका मारीत होतात त्या मला ऐकूं येत होत्या. पण माझा ध्वनिक्षेपक निकामी झाल्यामुळें बहुतेक माझीं उत्तरें तुम्हांला ऐकूं येत नव्हतीं.

थोड्याच वेळांत मला कळून चुकलें कीं, माझें विमान परत आपल्या विमानतळावर कांहीं पोंचणार नाहीं. तेव्हां विमान धडपणें चालवितां येईल तोंवर तें चालवावें आणि उत्तरेकडे आपल्या छावणीकडे जितकें जास्त जवळ येतां येईल तितकें यावें. पण मूलमेन शहराच्या जवळ पोंचेपर्यंत विमानाची उंची इतकी कमी आली कीं, मूलमेन-

जवळच्या टेंकड्यांवरूनसुद्धां ते पलीकडे जाईलसें वाटेना. विमान आतां जास्त उंचीवर तर चढत नव्हतें; येवढेंच नव्हे, तर उंची सारखी न पकडतां उलट जास्त खालींच येऊं लागलें. त्याखेरीज मलाही चक्कर येणार असें वाटूं लागलें होतें. सरते शेवटीं मी पॅरॅशूटनें उडी मारली. आणि तीही फार योग्य वेळीं. कारण मी पॅरॅशूटनें पडतां पडतां पाहिलें तों माझें रिकामें विमान समोरच्या एका टेकडीच्या उभ्या कड्यावर सरळ जाऊन कोसळलें, तुटलें, पेटलें आणि त्याचे अनेक तुकडे जळत जळत डोंगराच्या उतरणीवरून गडगडत खालीं गेले.

माझ्या स्वत:वरचें पुढचें संकट क्षणकाल माझ्या दृष्टीआड झालें तें विमान जळून फुटलेलें पाहून.

पण मग मनांत आलें कीं, आतां जमिनीवर पाय टेंकल्यावर कुणाच्या हातांत आपण सांपडणार? आपल्याच बाजूच्या, का ब्रह्मी लोकांच्या? ब्रह्मी लोक जर आपल्या बाजूचे असले तर ठीक. पण आक्रमण करीत येणाऱ्या जपानी लोकांच्याशीं मैत्री जोडण्यास उत्सुक झालेल्या अशा ब्रह्मी लोकांच्या जर हातीं लागलों तर? ते तर जपानी लोकांची मर्जी संपादन करण्याकरितां ही चालून आलेली संधि दवडायचे नाहींत व आपल्याला जपानी लोकांच्या हवालीं करतील. आणि मग आपले काय हाल हाल करतील जपानी लोक तें ईश्वर जाणे! आजवर ऐकिलेली युद्ध-कैद्यांना वागविण्याची त्यांची पद्धत कांहीं मोठी चित्ताकर्षक नव्हती! एका क्षणीं वाटलें आत्महत्या करावी अजून मोकळे आहों तोंवर. पण मग मनांत आलें कीं, शत्रूच्या हातीं लागूं असें गृहीत धरून अगो-दरच भीतीनें आत्मघात कां करावा? थांबून पाहावें. कदाचित् वांचून इथवर आलों तसें न जाणो अजीबात सहीसलामत वांचून आपल्या लोकांत जिवंत परत जाऊं. काय त्याचा नेम! या आशादायक विचारांनीं जरा उत्साह आला.

त्या थोड्या क्षणांत हे सारे विचार विद्युद्वेगानें माझ्या मनांत येऊन गेले.

मी जमिनीवर पडलों आणि पॅरॅशूट पडेपर्यंत दहावीस फूट तिच्याबरोबर ओढत गेलों. पॅरॅशूटच्या बंधनांतून मोकळा होऊन मी

चालण्याचा प्रयत्न करूं लागलों तेव्हां माझ्या ध्यानांत आलें कीं, माझ्या उजव्या मांडीला गोळी लागून रक्तस्राव होत होता. इतका वेळ नी म्हणूनच मला भोंवळ आल्यासारखें वाटत होतें नी आतां उजव्या पायाचा उपयोग करितां येत नव्हता ; शेवटीं विचार केला कीं, पडलेल्या पॅरॅशूटच्या आसंमतांतून तरी दूर जावें. पॅरॅशूट पडतांना पाहून कुणी इथवर आले तर जवळ नसल्यानें पकडले जाण्याचा संभव तितका कमी होईल. दोन्ही हातांवर नी डाव्या पायावर रांगत, उजवा पाय फरफटत ओढीत, मी कष्टानें पुढें जाऊं लागलों. घशाला कोरड पडूं लागली. जीव कासावीस होऊं लागला. डोळ्यांपुढें अंधेरी येऊं लागली नी शेवटीं मी कसातरी एका दाट कुंपणापर्यंत पोंचलों असेन नसेन तों मी बेशुद्ध झालों असेन !

मी डोळे उघडले तों माझें डोकें इतकें ठणकत होतें कीं बोलतां सोय नाहीं. उजेडानें डोळ्यांना त्रास वाटत होता. मांडीतून शिणका येत होत्या. अंगांतून ज्वाळा याव्या असा ताप भरलेला वाटत होता. जरा कुशी-वरून वळावें म्हणून मी हालूं लागलों तर हालतां येईना. मग माझ्या लक्षांत आलें कीं, मी जरी बिछान्यावर निजवलेला होतों तरी माझे हात-पाय दोरीनें करकचून मला बिछान्यावर घट्ट बांधून टाकलेलें होतें. जवळ पेटलेल्या स्टोव्हचा आवाज ऐकूं येत होता. एकदम मला चक्क झालें ; जपान्यांच्या तर हातीं नाहीं सांपडलों ? त्या कल्पनेनें मी चमकून मोठ्यांदां इंग्रजींत विचारलें, 'मी कुठें आहे, मी कुठें आहे."

त्यावर एक चुणचुणीत मुलगी माझ्या उशाशीं येऊन अस्खलित इंग्रजीमध्यें, म्हणाली, " सुरक्षित आहेस तूं अगदीं, भिऊं नको मुळींच "

" मग मला असें पलंगाला जखडून कां बांधलें आहे ? "

" हें पाहा तुझ्या मांडींत गेलेली आहे गोळी. फार काहीं खोल नाहीं. ती काढायला जवळ डॉक्टर नाहीं, इस्पितळ नाहीं. तुला द्यायला क्लोरोफॉर्म नाहीं. हें आहे माझें स्वतःचें घर. मी वैद्यकीय कॉलेजांत शिकत होतें, युद्धामुळें कॉलेज बंद होईपर्यंत. मीच काढणार आहे ती गोळी. पण मदतीला कुणी नाहीं. नी तूं हालशील, पाय झाडशील,

म्हणून तुला घट्ट बांधून टाकलें आहे मीं. आतां विश्वास ठेवून माझ्या-वर, थोडी कळ सोस कीं झालें. "

" अग, पण तूं गोळी तशीच काढणार म्हणजे किती भयंकर दुखेल ! मला सहन व्हायचें नाहीं. माझी सहनशक्ति इतक्या वेळच्या हालअपेष्टांनीं अगदीं संपली आहे अगोदरच ! "

" हें बघ, आतां बोलून दमणूक करून घेऊं नकोस. हा धर रुमाल. मी तुझ्या दातांखालीं घडी करून घालतें. वेदना फार झाल्या कीं त्यावर कडकडून चाव. आणि त्याहीपेक्षां जास्त झाल्या तर मनांत आण कीं, जपान्यांच्या हातीं लागतास तर त्यांनीं क्रूरपणानें तुझा छळ करीत मारलें असतें तुला. त्या मानानें ही दोन मिनिटांची वेदना सोसणें किती कमी दुःखाचें ! होयना ? " असें म्हणून तिनें माझ्या-कडे अतिशय सहानुभूतीनें पाहून स्मित केलें. आणि स्टोव्हवर ठेवलेल्या उकळलेल्या पाण्यांतून कांहीं साधीं उपकरणें काढून अतिशय धिटाईनें माझ्या मांडींतली गोळी काढण्याच्या अवघड कामाला ती मन एकवटूं लागली. माझ्या मांडींतली गोळी काढून ती जखम जंतुनाशक औषधानें धुऊन, बांधून संपवायला वेळ किती लागला असेल कुणास ठाऊक. कदाचित् पांच असतील वा पंधरा मिनिटें असतील, पण मला ब्रह्मांड आठवलें ! काय त्या वेदना ! पण तिनें सांगितलेल्या " आपण जपा-न्यांच्या हातीं लागलों असतों तर—! " या कल्पनेनें कसा तरी धीर धरला नी माझी जखम बांधून झाली.

तिनें ती मोठी गोळी माझ्या दृष्टीपुढें धरली बोटानं नी मला ती हंसत म्हणते, "बघितलंस मी जपान्यांपेक्षां किती कमी हाल केले तुझे ! ही बघ गोळी निघालेली. आतां तुझा ताप उतरेल. तुला बरं वाटेल. नी चार दिवसांत तुझी जखम भरून तूं हिंडता फिरता होशील कीं झालें. तुला परत तुमच्या लोकांत जातां येईल. होयना ? शाबास ! आतां दमला आहेस, नीज पाहूं आतां. चांगली खूप गाढ झोंप घे घेतां येईल तितकी, अं ! "

आणि देवाचे मनापासून आभार मानीत, देवाला धन्यवाद देत व

त्या धिटुकल्या मला पुनर्जन्म देणाऱ्या उपकारी तरुणीचें कौतुक करीत मी निर्वेधपणें गाढ झोंपीं गेलों.

मी किती तास निजलों असेन कोण जाणे, पण इतका गाढ निजलों कीं, जागृति येतांना एखाद्या खोल अंधकारमय दरींतून वर यावें असें वाटत होतें. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, या संवेदना जिथें नव्हत्या, मनाला स्वत्वाची जाणीवही नव्हती, जिथें काल स्तब्ध थांबलेला होता, अशा अनंत शून्यत्वांतून वर नेहमींच्या इंद्रियगोचर सृष्टींत मीं आलों. झोंप कसली ती. अशी झोंप पूर्वीं कधींही मीं अनुभविली नव्हती. जणुं कांहीं जन्म घेऊन नव्या सृष्टींत यावें असें मला वाटत होतें. फरक इतकाच कीं, जन्मलेल्या मुलाला आजूबाजूच्या सृष्टीचें सम्यक ज्ञान व्हायला कांहीं वर्षें लागतात, तर उलट मी या पुनर्जन्मानंतर पूर्वस्मृतीच्या साहाय्यानें कांहीं क्षणांतच माझ्या जुन्या आयुष्याची सांखळी जोडून देऊं शकलों.

माझं मन ताजंतवानं झालं होतं, मनांत शांतता नी समाधान अकारणपणं तुडुंब भरल्यासारखं वाटत होतं. पण मी डोळे उघडले नव्हते. तसाच पडलों होतों. हिंदी, ब्रिटिश नी अमेरिकन फौजा, जपानी फौजा, युद्धाच्या साऱ्या गोष्टी जणुं कांहीं अंथरुणांत पडून कौरवपांडवांचें युद्ध वाचावें, अशा दुसऱ्या युगांत घडल्यासारख्या वाटत होत्या. माझा त्यांत जणुं अंशभागही नाहीं. जरा उत्तरेकडे हिंदी फौज होती. जरा दक्षिणेकडे आक्रमण करीत येणारी जपानी फौज होती. त्या संघर्षणाच्या मधोमध, धड ना या बाजूस, धड ना त्या बाजूस, अशी ही पक्षातीत आणि कुणाच्याच हुकमतीखालीं नसलेली भूमि होती. दोन वावटळींतील हें शांत मध्यंतर होतें.

मला वाटत होतें कीं, मृत्यु नी जीवन यांच्या दरवाजांत उंबरठ्यावर मी उभा होतों. कोणीकडे पाऊल टाकावें तें माझ्या इच्छेवर सोंपवल्यासारखें मला वाटत होतें. फिरून जगांत यावं का? या उंबरठ्यावर मला जात नव्हती, धर्म नव्हता, देश नव्हता. फार काय मला स्त्री-पुरुष हाही भेद नव्हता. मला फक्त अलीकडे काय आहे, नी उंबरठ्यापलीकडे काय आहे, याची स्वच्छ जाणीव होती. उंबरठ्या-

अलीकडे यायचें म्हणजे स्वतःच्या रूपावर एकेक आवरणें चढवायचीं नी म्हणायचें, मी ब्रिजभूषण! हिंदी वैमानिक खात्यांतील तरुण अधिकारी. फ्लाइट लेफ्टनंट. जपान्यांचा शत्रु. परवांच्या वैमानिक हल्ल्यांत कदाचित् नामनिर्देश होऊन Distinguished Flying Cross मिळण्याचा संभव असलेला वैमानिक. आणि उंबरठ्याच्या-पलीकडे पाऊल टाकलें तर? आतांच मी जींतून क्षणकाल वर आलों आहें ती असीम शांतता. तींमध्यें एकरूप झालों तर ना काल, ना अंतर, ना आपपरभावाचीं अवगुंठनें. पृथ्वीला बांधला न राहतां, चंद्र वा शुक्र, शनि वा मंगळ अशा मोठया ब्रह्मांडांत स्वेच्छेनें हिंडूं शकेन! अलीकडच्या जीवनापेक्षां त्या उंबरठ्यापलीकडचें निराळें जीवन मला जास्त भुरळ घालूं लागलें. उंबरठ्यापलीकडे गेलों होतों, तिकडेच परत जावें असा मला मोह झाला. फक्त आतां मनांत निश्चय करून उंबर-ठ्यापलीकडे जायची इच्छा करायची कीं मी तिथें गेलोंच! अशी स्वेच्छेवर सारी गोष्ट अवलंबून होती.

पण ती समाधि भंग पावली! आणि मीं डोळे उघडले. समाधीचा भंग करणाऱ्यावर पूर्वीचे ऋषिमुनि इतके कां रागावत तें मला आतां कळलें. त्या बृहत्तम जीवनांतून या फक्त पंचेंद्रियगोचर अशा अणुजीव-नांत ओढलें जाणें म्हणजे किती निराशा, केवढी फसवणूक!

आणि मी कसा परत आलों? कां आलों? इतिहासाची पुनरावृत्ति होते म्हणतातना? ज्यामुळें इंद्रपदासाठीं घोर तप करणारे ऋषि, महर्षि नी राजर्षि आपल्या तपामधून च्युत झाले तीच ती क्षुद्र आणि महान् गोष्ट! क्षुद्र अशाकरितां कीं, यःकश्चित् मृत्तिकेच्या कणाकणांनीं ती बनविलेली होती, नी महान् अशाकरितां कीं मानधनांच्या तपापासून त्यांना ढळविण्याइतकी ती प्रभावी होती. कोणती ती वस्तु विचारतां!-ऐका तर. अधर! त्या धरेवरच्या एका साध्यासुध्या स्त्रीचे दोन लुसलुशीत ओठ!!

मीं डोळे उघडले, नी या जगांत परत आलों. माझ्यावर वांकून माझ्याकडे पाहत होती ती. तिनें माझ्या ओठांना आपल्या ओठांनीं [illegible] मी डोळे उघडल्यावर ती चमकून भानावर आल्या-

प्रमाणें मागें सरली. मी शब्दही बोललों नाहीं. मला नुकतीच जागृति आली असावी व मला कांहीं कळलेंच नसावें अशा विचारानें ती पुन्हा धिटाईनें पुढें सरली नी माझ्या कपाळावरून केंस मागें सारीत विचारूं लागली,

" कसें वाटतें आहे तुला, ब्रिज भू ऽ सॅन ? "

" तुला माझें नांव कसें ठाऊक ? "

" तुझ्या मनगटांतल्या सोन्याच्या पट्टीवर मुद्दाम कोरवून घातलेलें आहेस कीं तूं. लढाईंत पडलास तर तुझा पत्ता लागावा म्हणून ! "

" होय. त्याचा उच्चार मॉंग यू ऽ सॅनसारखा नाहीं करायचा. पण मी म्हणतों तसें म्हण, ब्रिजभूषण—भूषण ! भू–सॅन नाहीं. "

पण त्या ब्रह्मी तरुणीच्या ओठांतून पेटफोड्या 'ष'नी लोण्यांतल्या 'ण' चा उच्चार येईना. तिनें माझें नांव नुसतें 'भूसॅन' ठेवलें. आणि आपले बरोबर नांव उच्चारण्याचे प्रयत्न व्यर्थ गेलेलें पाहून ती नुसती हंसली. आणि त्या हास्यांत माझा पृथ्वीवर परत ओढून आणल्या-बद्दलचा संताप विरून गेला. " कशी हीं आमची भाषा ! " मी मनांत म्हटलें, " कीं जिच्यांतलं नांव उच्चारायला या युवतीच्या नाजुक ओठांना इतकी मुरड घालावी लागते. तिच्या ओठांचे हालच करायचें तर त्याला दुसरें जास्त सुसंस्कृत मधुर मार्ग नाहींत कां बरं ! "

आपटलेला चेंडू उशी घेऊन परत उडतो तद्वत् मी ओढून बळेंच परत आलेला, अट्टाहासानें या ऐलथडीच्या जीवनांत क्षणांत पूर्णपणानें गुरफटून गेलों. मी प्रेमांत पडलों होतों या ब्रह्मी मुलीच्या. जिनं माझ्या पायांतली गोळी धिटाईनं काढून पायाची जखम बांधली, तिनं माझ्या हृदयाला प्रीतीचा नेम मारून तें जखमी केलं.

" तुझं नांव काय ? " मी विचारलें.

" मा थेन थेन ! "

" मा थेन थेन ? "

" होय, मा थेन थेन. "

त्या पुढचे तीन दिवस हां हां म्हणतां गेले. माझी बांधलेली जखम



[stamp]

माझ्या तरुण सळसळत्या रक्तानं चट्‌दिशीं भरली. मी पहिल्या दिवशीं नंतर उठून बसलों, तर तिसऱ्या दिवशीं लंगडत चालूं लागलों.

हवा इतकी सुंदर होती तीन दिवस! आजूबाजूच्या टेकड्यांवरची हिरवीगार वनश्री उठून दिसत होती. मूलमेन नदीचा प्रवाह त्यांतून मुरडून वाहत होता. मा थेन थेन च्या घरचे तीन दिवस कसे संपले मला कळलें नाहीं. तिच्या सान्निध्यांत मी लढाईची कटु सत्यसृष्टि विसरलों. आम्ही कांहीं विशेष बोललों नाहीं. तिच्या जीवनावर काळजीची छाया पडली होती एवढें मात्र मला दिसून आलें. पण जपानी सैनिक चढाई करून येत आहेत हें कळल्यावर मी मी म्हणणाऱ्या पुरुषांच्या पोटांत गोळा उठलेला मी पाहिला आहे, मग तिची काय कथा, असा मी मनांत त्याचा अर्थ लावीत होतों.

संध्याकाळ झाली होती. मूलमेनच्या टेंकडीवरचा चैतन्य पॅगोडा (बुद्ध देवालय) लकाकत होता. त्याच्या सोनेरी उंच निमुळत्या कळसांवर पडलेल्या मावळत्या सूर्यकिरणांची प्रभा और होती. त्याच्या खालचीं हिरवीचार झाडी, वर निळेंभोर आकाश आणि त्यामध्यें या देदीप्यमान सुवर्णकळसाची निकषावर ओढल्यासारखी सोनेरी रेघ! तें सृष्टिसौंदर्य अतृप्त नेत्रानं पीत म्हणालों मनाशीं! "रूडयार्ड किपलिंगनं कवितेंत याच चैतन्य पॅगोडाचं वर्णन केलं तें उगीच नाहीं. किती सार्थ आहे!"

माझ्यामागें मा थेन थेन येऊन म्हणाली, "काय पाहतो आहेस एवढा गर्क होऊन? सूर्यास्ताची शोभा?"

मी तिच्याकडे वळून म्हणालों, "छे! चंद्रोदयाचं सौंदर्य!"

"आतां कुठला चंद्रोदय?"

"तूं सामोरी आलीस कीं माझा चंद्रोदय होतो!"

"असलीं भाषणं बोलूं नकोस."

"कुणी असलीं भाषणं जाणूनबुजून बोलत नाहीं. माझ्या तोंडांतून तीं उमटतात स्फूर्तीनं."

"त्यांहून जास्त महत्त्वाच्या गोष्टी आहेत बोलायला."

पण तिचीं वाक्यं मी ऐकत नव्हतों. मी तिच्या आकृतीकडे अनि-

मिष नेत्रांनीं पाहत होतों. तिनं पायांत पांढऱ्या चेपल्या घातल्या होत्या. पट्टयापट्टयाची पांढऱ्या फुलाचें डिझाईन काढलेली निळी लौंगी तिनं अंगाबरशीं चापचोपून परिधान केली होती. त्यांतून तिचा कटिभाग रेखून दिसत होता. वर तिनें पांढऱ्या शुभ्र मलमलचा इस्त्री केलेला लांब हाताचा पोलका घातला होता. मलमलींतून आंतली पांढरी चोळी भारावलेली दिसत होती. तिच्या केतकीवर्ण चेहऱ्यावर चंदनाच्या उटीचा लेप ब्रह्मी बायका देतात तसा तिनं दिला होता. वर विंचरलेले लांब सडक भुरक्या रंगाचे केस कृष्णवर्ण सापाच्या वेटोळ्याप्रमाणें अगदीं डोक्यावर बांधले होते. त्यांच्यावर पांढरी फणी केसांत आडवी खोंचली होती. डाव्या बाजूला कानावर लोंबतील अशा पांढऱ्या नी पिवळ्या फुलांचा हिरव्या पानांसकट एक मोठा घोंस तिनें केसांत खोंचला होता. हातांत ब्रह्मी बायकांच्या हातांत हमखास असणारी, छोटी रंगीत छत्री होती मिटविलेली. माझ्या दृष्टीची जाणीव होऊन तिनं बोलतांना मध्येंच वाक्य अर्धवट सोडून मला म्हटलं, "तूं ऐकत नाहींस मी काय सांगतें आहें तें!"

"नाहीं, मा थेन थेन! माझ्या डोळ्यांनीं सांगितलेलें तुझें वर्णन ऐकण्यांत माझे कान गुंतले आहेत."

हताशपणानें तिनं पुन्हा म्हटलें, "हें पहा, तूं आज रात्रीं गेलंच पाहिजेस इथून!"

त्या शब्दांनीं मी वास्तवतेंत आलों. मी आश्चर्यानें विचारलें," आज गेलं पाहिजे! कां?"

"तेंच मी इतका वेळ सांगत होतें तुला नी तूं ऐकत नव्हतास! मी आत्तांच चैतन्य पॅगोड्याहून परत आलें दर्शनाहून. तिथला फौंगी (बुद्ध भिक्षु) माझ्या चांगल्या ओळखीचा आहे. तो मला सांगत होता कीं, उद्यां रात्रीं जपानी सैन्याच्या त्रिनीचे लोक मूलमेनमध्यें शिरतील. त्याला नेहमीं आंतल्या बातम्या कळतात असा माझा आजवरचा अनुभव आहे. त्याच्या या बातमीवर विश्वास ठेवायला अगदीं हरकत नाहीं."

"त्यानंच का सांगितलं तुला मला सांगायला कीं, मी आज रात्रीं

जावं म्हणून ? " त्या फौंगीच्या मनांत कांहीं कपट-असल्याची मला शंका येऊन मी विचारलं.

" नाहीं, भूसॅन ! तूं इथें उतरलास. मी तुला माझ्या घरीं ठेविला आहे हें अजून कुणाला माहीत नाहीं. त्या फौंगीनं मला सूचना दिली ती माझ्या स्वतःवरच्या वात्सल्यानं प्रेरित होऊन. त्यानं मला मी लहान चार वर्षांची होतें तेव्हांपासून मोठी झालेली पाहिलें आहे. चार वर्षांची असतांना आईबरोबर जाऊन मी चैतन्य पॅगोडामध्यें वामशयनी बुद्धा-पुढें फुलें नी मेणबत्त्या ठेवून खुरमांड्या घालून प्रार्थना केलेली आहे त्याच्या आठवणींत. मी आज रात्रीं मूलमेन सोडून निघून जावं म्हणून त्यानं मला ही सूचना दिली आहे. त्यांत कपट नाहीं. "

थोडं थांबून ती पुढं म्हणाली, " मूलमेन नदीच्या टोंकाशीं आज रात्रीं एक मालाची बोट येणार आहे. ती वर मूलमेनला न येतां नदी-मुखाच्या ' ॲम्हर्स्ट पॉइंट ' पासूनच परत हिंदुस्थानला जाणार आहे. त्यावरनं मी या धोक्याच्या प्रांतांतून निघून दूर हिंदुस्थानला स्थलांतर करावं असं फौंगीनं मला सांगितलं आहे. त्यानं त्याच्या ओळखीनं एका माणसाला बोटीवरनं आज रात्रीं नेण्याची व्यवस्था केली आहे."

" त्या फौंगीला खरंच धन्यवाद दिले पाहिजेत." मी म्हणालों, " तूं या रणभूमींतून निघून हिंदुस्थानांत जाणं फार शहाणपणाचं आहे."

" पण मी नाहीं जाणार इथून भूसॅन. "

" मग तूं हें मला कां सांगते आहेस ? "

" कारण त्या बोटीवरनं मी तुला हिंदुस्थानकडे तुझ्या माणसांत सुरक्षिततेंत परत पाठविणार आहें."

" तूं मला परत पाठविणार आहेस आणि स्वतः मागं इथं धोक्या-मध्यें राहणार आहेस, उद्यां जपानी इथं पोंचतील हें ठाऊक असून ! "

मा थेन थेननं होकारार्थी मान हालवली.

माझ्या मनांत आनंदाचा उमाळा आला. केवढी ही प्रीति माझ्यावर या मुलीची ! केवढा माझ्यासाठीं स्वार्थत्याग करायची तयारी आहे हिची !

पण तिची आणखी परीक्षा पाहण्याच्या इराद्यानें मी म्हटलें, " थेन,

थेन ! तूं एकटी इथं राहणार ? जपानी सैनिकांच्या क्रौर्याच्या गोष्टी तूं ऐकल्या नाहींस का ? तूं म्हातारी असतीस तर एक वेळ असो, पण तुझ्यासारख्या भरज्वानींतल्या मुलीला त्यांच्या हातून काय काय पाशवी अत्याचार भोगावे लागतील याची कल्पना आहे का ?"

ती धीरानें उत्तरली, " मी यारे घरीं जन्मले, इथंच मी मरेन. प्रत्येक येणाऱ्या टोळधाडीला घाबरून मीं पळूं लागलें तर हिंदुस्थानांत जाऊन तरी काय उपयोग? पुढेमागें तेथूनही पळावें लागणार नाहीं याची काय शाश्वती ? आणि भरज्वानीचें म्हणतोस ! हिंदुस्थानामध्यें तरी माझ्या यौवनाकडे पाहणारे पाहणार नाहींत असें का आहे? अभिलाषनी विषया- सक्ति या कांहीं जपान्यांतच आहेत नी दुसऱ्या देशच्या लोकांत नाहींत असें का कांहीं आहे ? घरोघर मातीच्या चुली नी घरोघर मृत्तिकेचींच माणसं आहेत ? याउपर इतकाच कठिण प्रसंग आला माझ्यावर, तर स्वतःच्या हातानं मी माझा प्राण घेईन ! पण माझी मनोदेवता सांगते कीं, तसं कांहीं व्हायचं नाहीं. ही जपानी वावटळ आली तरीं माझ्या डोक्यावरनं जाईल. येईल नी जाईल नी मी अशीच इथं चैतन्य पॅगोडावरचीं सूर्यास्ताचीं किरणें पाहत राहीन ! "

मी चकित झालों अगदीं. " कशावरून तूं हें म्हणतेस ? "

" श्रद्धा. भू ऽऽ सँग ! निस्सीम श्रद्धा ! श्रद्धेमुळं माझ्या अंतः- करणाला केवढा धीर नी विश्वास आहे. "

" मा थेन थेन ! मी सुरक्षित ठिकाणीं जायचं एकट्यानं पळून नी तुला एकटीला इथें सोडून ! शक्यच नाहीं. जिथं तूं तिथं मी. जायचं तर मी तुलाही नेणार बरोबर." असं म्हणून मी मा थेन थेनला माझ्या करपाशांत एकदम घट्ट ओढून धरून प्रेमावेगानें गाढ आलिंगन दिलें. तिचा चेहरा चुंबनांनीं गुदमरून टाकला.

पण तिनं अनपेक्षितपणें न्चवताळून जाऊन मोठ्या प्रयासानें मला दूर ढकललें. तिनें भिंतीचा आधार घेत त्वेषानें मला म्हटलें, " मूर्खा ! जपानी सैनिकांच्या अत्याचारांबद्दल तूंच का मला मिनिटांपूर्वीं भय घालीत होतास ? त्यांच्यांत नी तुझ्यांत काय फरक आहे ? "

मी अगदीं सर्द झालों. हतबुद्ध झालों. " मी जपानी सैनिकासारखा

कसा ? एखाद्या स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिला जवळ करणें हा अत्याचार खरा. पण आपलें दोघांचें परस्परांवर प्रेम असतांना मीं तुला चुंबिलें तर अपराध कसा ?"

"परस्परांचें प्रेम ! तुझें माझें प्रेम !! कधीं सांगितलें मी तुला माझें तुझ्यावर प्रेम आहे म्हणून ?"

"सांगायला कां लागतें प्रेम नेहेमीं तोंडानं ? माझी केलेली शुश्रूषा, मला सुरक्षिततेंत पाठविण्यासाठीं स्वतः मागें राहाण्याचा तूं योजिलेला स्वार्थत्याग—काय दर्शवितात या गोष्टी ?"

"या गोष्टींनीं माझी परोपकारी बुद्धि दिसूं शकेल, माझी भूतदया दिसूं शकेल !"

"ओहो ! असं काय ? ठीक आहे ! त्या दोन्ही गोष्टी आपण परोपकारी बुद्धि अथवा भूतदया किंबहुना त्याहूनही कानाला बऱ्या लागणाऱ्या अशा 'मुक्या प्राण्यांवर दया' या सदरांत घालूं. पण तुझी जर माझ्यावर प्रीति नाहीं तर तीन दिवसांपूर्वीं मी मूर्च्छेत का गाढ झोंपेंत असतांना माझ्या निश्चेष्ट पडलेल्या बेशुद्ध जखमी शरिराला आलिंगून तूं माझ्या ओठांचं चुंबन घेतलंस त्याला काय म्हणायचं ! मा थेन थेन! तुझी मुक्या प्राण्यावर दया, का परोपकार, का तुझी प्रीति, का बेलगाम सुटलेली तुझी विषयवासना ? काय म्हणायचं त्याला ? का मूर्च्छितांचं रक्त पिणारी हडळ म्हणायचं तुला ! बोल ! बोल !" मी पुढं सरून मा थेन थेनच्या दोन्ही खांद्याला धरून त्वेषानं तिला 'बोल, बोल,' म्हणत असं गदगदां हालविलें कीं, तिचा केशभार मोकळा सुटून खांद्यावरून पाठीवर पडला. तिच्या केसांतली फणी नी फुलांचा घोंस पायदळीं पडला. मी हात सोडल्यावर ती क्षणभर मट्कन् खालीं बसली. ती उद्गारली, "अरे देवा ! काय रे ही गुंतागुंत !" पण ती तशीच कष्टानं उठली नी पलीकडच्या खोलींत गेली. तिथून ती परत आली हातांत एक मोठी फ्रेम घेऊन. ती फ्रेम माझ्यापुढें थरथरत्या हातानं धरून गहिंवरलेल्या कंठानं ती म्हणाली, "पाहा, पाहा. ही कुणाची तसबीर आहे का ठाऊक ?"

आणि केवढा आश्चर्यकारक योगायोग सांगूं ! त्या चित्रांतली

व्यक्ति इतकी आश्चर्य वाटण्याइतकी माझ्यासारखी होती कीं कुणीहि माणसानें तो माझाच फोटो आहे म्हणून म्हटलें असतें.

"हा फोटो आहे माझ्या नवऱ्याचा ! त्याचं नांव 'मॉंग बा मॉंग' युद्धाच्या सुरवातीसच तो जपान्यांविरुद्ध लढायला मला घरीं सोडून गेला. जातांना त्यानं मला सांगितलं, "मा थेन थेन ! मी युद्धावर जातों. पण तूं काळजी करूं नकोस. ईश्वरावर श्रद्धा ठेव नी माझी वाट पाहा. मी परत येईन. माझं बरंवाईट झालं तरी मी तुझ्याकडं येईन दुसऱ्या रूपानं. पण आल्याशिवाय राहणार नाहीं."

मा थेन थेनच्या डोळ्यांतून अश्रुधारा ओसंडत होत्या. "आणि मी तेव्हांपासून माझ्या प्रिय पतीची वाट पाहत बसलें आहें. सारखी जाऊन चैतन्य पॅगोडयांत बुद्धापुढें बसतें नी प्रार्थना करीत म्हणतें, देवा, माझ्या मॉंग बा मॉंगवर तुझ्या कृपेचं छत्र धर. त्याला सुरक्षित परत आण. गरिबांना भिक्षा देतें. दुखणेकऱ्याला दवा देतें. ज्याला लागेल ती मदत धांवून जाऊन आवर्जून करितें. माझ्या मनांत असतें कीं, देवा, हीं सारीं सत्कर्मे तुझ्या पायीं रुजू करून घे नी माझ्या पतीला तो असेल तिथं मदत कर. दुःखिताला मी इथं सुख दिलं तर माझ्या नवऱ्याला तें देव पोंचवील. मी दुखणाइताला दिलेलं औषध न जाणो देव माझ्या नवऱ्याला तो आजारी असला तर पोंचवील. मी जर गरजवंताच्या उपयोगीं पडलें, तर तिकडे माझ्या नवऱ्याला मदत करायची स्फूर्ति तिथें असेल त्या एखाद्या माणसाला देव देईल ! जणुं कांहीं देवा-घरच्या सत्कर्मांच्या बॅंकेंत मी इकडे ठेव ठेवीत आहें. अशा उद्देशानें कीं, माझ्या प्रिय पतीला तिकडे त्या पुण्यसंचयावर हुंडी पटवितां यावी !"

ती रडत म्हणाली पुढें, "तुला पडतांना पाहिला मीं. तेव्हांपासून सारी मदत करीत आलें आहे ती सारी याच भावनेनं. मी तुझ्या जखमा बांधीत आहें. तुला घरीं पाठवीत आहे तुझ्या माणसांत. हें वाण देत आहें. माझ्याही पतीच्या जखमा असंच कुणी बांधील. त्यालाही कुणी माझ्याकडं असंच परत पाठवील ! यांत माझी परोपकारी बुद्धि नाहीं, भूतदया नाहीं, माझा स्वार्थ आहे. इतकाच कीं, माझा प्रिय पती परत माझ्याकडं यावा !

याच विचारानं गुंगून मी तुझ्या पलंगावर तुझी शुश्रूषा करीत बसलें होतें. जागत बसलें होतें. जागत बसलें होतें तुझ्या उशाशीं. त्याच वेळीं कल्पनासृष्टींत माझ्या पतीच्या स्मृति रंगवीत मी गुंगलें होतें. तूं इतका हुबेहुब माझ्या पतीसारखा दिसतोस कीं, त्या प्रशांत वेळीं, रात्रभर जागून काढलेल्या तारवटलेल्या दृष्टीला नी माझ्या स्मृतिचित्रांत रंगलेल्या पतिरत मनाला क्षणैक भूल पडली नी मी तुला आलिंगून तुझ्या ओठांवर ओंठ टेंकलें. पण आलिंगन देतांना माझ्या हातांत तुझं मूर्च्छित शरीर असलं तरी माझ्या मनांत माझ्या पतीचं शरीर होतं. चुंबन घेतांना वांकलें तेव्हां माझ्या दृष्टीपुढें भूसॅन तूं नव्हतास, माझ्या मॉग बा मॉगचा चेहरा होता. पण तुझ्या ओठांचा स्पर्श होतांच मी भानावर आलें नी चमकून मागें सरलें. त्याच वेळीं तूं उठलास. मला वाटलें माझी कृति तुझ्या ध्यानांत आली नसावी. पण तुझ्या ती गोष्ट लक्षांत आली नी तुझा असा सारा गैरसमज झाला कीं, माझें तुझ्यावर प्रेम आहे! छे, छे, माझं मन माझ्या पतीवर इतकं खिळलं आहे कीं, माझ्या हृदयांत कुणाला वाव नाहीं. पण माझ्या हातून नकळत तुझा गैरसमज झाला, नी नकळत मी तुला दुःख दिलं असलं तर मला क्षमा कर भूसॅन!"

माझ्या तोंडून शब्द निघाला नाहीं. माझं दुःख शब्दातीत होतं. काय हा दैवदुर्विपाक! दुःखाच्या कडू जहर मात्रेचे किती हे वळसे! मी काय केलं होतं म्हणून हें माझ्या वांट्याला आलं होतं?

देशाच्या संकटकाळीं म्हणून शिर तळहातावर घेऊन युद्धांत पडलों. कर्तव्यतत्परतेनें विमानांतून नेटाचा हल्ला केला. तर दैवानं मी जायबंदी होऊन तिकडे पडलों. त्यांतून वाचलों कशाकरतां तर एका अत्यंत नयनरम्य, गुणवान्, देवतातुल्य साध्वीच्या हातून जीवदान मिळून प्रेमोद्‌भव होण्याला. आणि प्रेमाच्या उचंबळलेल्या लाटेवर मी उंच आकाशाइतका तरंगत गेल्यावर माझ्या खालची लाट अजीबात ओसरून मी उंच खडकाळ किनाऱ्यावर कोरडा ठणठणीत राहलों. हा दुर्दैवा! प्रथमच प्रेमांत पडल्यावर मला जाणीव व्हावी कीं, त्या प्रीतीच्या द्वंद्वांत न सामावणारा असा आगंतुक, नकोसा, मी तृतीय व्यक्ति ठरलों!

त्या दिवशीं रात्रीं चांदणं होतं. ॲम्हर्स्ट पॉइंटपर्यंत मला मा थेन थेननं स्वतः पोंचविलें. नदीतीरापासून दूर अर्धा मैल एक मोठी मालाची बोट नांगरलेली होती. छोट्या घाटाच्या पायऱ्यापाशीं एक छोटी होडी उभी होती वाट पाहत.

" कुणाकडून आलांत तुम्ही ?" बोटीचें सुकाणूं धरणाऱ्या खलाशानें विचारलें.

" चैतन्य पॅगोडाच्या फौंगीकडून ! "

" ठीक आहे. चला तर कोण येणार ते. बोट अर्ध्या तासांत निघेल. उशीर नाहीं होतां कामा."

माझा पाय होडींत ठेवण्यास पायरीवरून उचलेना. मी म्हटलें, " मा थेन थेन, क्षणभर इकडे बाजूला ये, मला तुझ्याशीं बोलायचें आहे."

" आपल्याला चार लोकांत बोलतां येऊं नये असें कांहीं आपलें नातें नाहीं. " ती म्हणाली निक्षून.

" मा थेन, तुला बॉ मॉंगची शपथ आहे जरा इकडे ये ! "

शपथ घातल्यावर ती लगबग आली.

" मा थेन थेन, तुझं माझ्यावर प्रेम नसलं, तरी माझं तुझ्यावर आहे."

" विवाहित स्त्रीला असं बोलण्याचा अधिकार तुला नाहीं."

" मग मला मृत्यूच्या दारांतून कां मागें ओढलेंस ? नाहीं तर हा खेळखंडोबा झाला नसता."

" परिस्थितीचा दोष आहे त्यांत."

" त्याच परिस्थितीनं मला तुझ्याशीं असें बोलायचा अधिकार दिला ! "

" असंच का आपण बोलत राहणार ? "

" छे ! तूं उत्तरं दिलीस प्रश्नांचीं कीं मी होडींत पाय ठेवीन."

" काय प्रश्न आहे तुझा ? "

" तुला माझ्याबद्दल काय वाटतं तुझ्या मनांत ? "

" अनुकंपा."

" अतृप्त प्रेमाला अनुकंपेचें वावडें आहे ! " मी म्हणालों.

" कदाचित् वात्सल्य."

" छे, भलतेंच ! वात्सल्याचा उगम प्रेयसीच्या मनांत झाला, तर प्रेमिकाला तो ज्वालामुखीमध्यें उगम पावलेल्या नदीप्रमाणें दाहक वाटतो "

" कांहींच नाहीं वाटत मला तुझ्याबद्दल ! "

" असे कठोर शब्द बोलूं नको. तुझ्या बॉ मॉंगला कुणी कठोर बोलेल. "

" माझ्या पतीला कां असें बोलतोस ? "

" मी काय करूं ! तो नी मी उत्तरदक्षिण ध्रुवांसारखे झालों आहों— त्याचा वसंत ऋतु तो माझा शिशिर ! तो सूर्यप्रकाशांत तेव्हां मी अंधारांत ! त्याचें सुख तें माझें दुःख ! ! "

" त्याला मी काय करूं ? "

" पृथ्वी करते तेंच कर. कांहीं त्याला सुख देतेस, तसे थोडे अंश-भाग मला दे. "

" तें कसें ? "

" मला आशेला थोडी जागा दे. जीव कंठायला मला थोडा तरी आधार दे ! "

" तो कसा ? "

" मृत्यूनंतर तूं माझी होशील म्हण ! त्या आशेवर मी जगेन. "

" तें शक्य नाहीं. "

" मग या जन्मीं माझी हो, नी माझ्याबरोबर चल. "

" अगदीं अशक्य ! "

" मग अगदीं थोडें मागतों. आत्तां थोडा वेळ माझी हो."

" कृतघ्ना ! तुला बोलवतें तरी कसें असें ? "

" मी जर भूत, भविष्य नी वर्तमान असा अनंतकाल दुःखीच राह-णार असलों तर माझ्या तोंडून तुला आशीर्वाद कसा मिळेल ? "

" त्यांत काय अवघड ? माझ्यावरची प्रीत सोड. "

"प्रीत सोड म्हटल्यानें सुटत नाहीं, बस म्हटल्यावर बसत नाहीं. इतकें तें सोपें वाटतें तुला तर बॉ मॉंगच्यावरची प्रीति तूं सोड. तो तरी माझ्याचसारखा युद्धावर गेला आहेना? काय त्याचा नेम! तो परत येणारही नाहीं!"

"असें का दुष्टाव्यानें अभद्र बोलतोस? मी केलेले उपकार स्मर!"

"मनांत हेतु धरून केलेल्या मदतीला उपकार नाहीं म्हणत! त्याला व्यवहार म्हणतात. त्याला देवघेव शब्द आहे. उपकाराचे हिशोब ठेवीत नाहींत. गुप्तदानांत पुण्य असतं तसं निर्हेतुक उपकारांतच असतं!"

"मग मी तुझ्यावर केलें तें काय?"

"उपकार केले म्हणूं नको. म्हणून किंमत जाते! आणि मला थोडा माणसासारखा वागव. तुझ्या मनाच्या समाधानासाठीं तूं भिक्षा टाकीत जातेस रस्त्यानें. तिच्यासाठीं भींतीवर अडकवलेली धर्मार्थ पेटी असें मला वागवूं नको. फार का मी मागत आहें, मा थेन थेन?"

"भूऽऽसॅन! भूऽऽसॅन! काय रे करूं मी! ही घे माझ्या बोटांतली आंगठी. त्यांत दोन खडे आहेत. एक तूं आहेस नी एक मी आहें असें मान! होईल का तुझें समाधान?"

"नाहीं मा थेन. मी चैतन्य पॅगोडांतल्या बुद्धाची प्रार्थना करूं का म्हणजे ही निरगांठ सुटेल?"

"भूसॅन, पुरें हें बोलणें. तुला जायचें आहेना, वेळ होत आहे."

"छे, आहे अशा स्थितींत मला जाववत नाहीं. मी इथेंच राहीन. येईनात का जपानी चालून!"

"तूं गेला नाहींस तर तुझे लोक नाहीं वाट पहायचे?"

"मला नाहींच आहे कुणी नात्यागोत्याचें वाट पाहला. मायापाश असा एकच."

"तो कोणता?"

"तुझ्या प्रेमाचा. पण मेलें मूल जन्मास यावें तद्वत माझं तुझ्यावरचं प्रेम जन्मतःच मेलेलं."

"पण तूं परत गेलंच पाहिजेस."

"कां? तुला माझ्याबद्दल कांहींच नाहीं वाटतना? मग मी इथें

राहून मेलों किंवा हिंदुस्थानांत गेलों तरी काय फरक ? मला जगण्यासारखें कांहीं उरलेंच नाहीं आहे. तुझ्या घरीं तूं मला बेशुद्ध स्थितींत नेलेंस आणि तुझ्या घरीं आलेली जिविताची शुद्ध फिरून हिरावून मला इथें आणून सोडलेंस. आतां मी जातों. मात्र बोटीनें नाहीं, पण परत चैतन्य पॅगोडामध्यें. तिथें मी भिक्षु होईन. " मी परत चालूं लागलों. तों धांवत धांवत ' मा थेन ' माझ्या पुढें आली नी माझ्या वाटेंत उभी राहून हात पसरून मला अडवून म्हणाली,

"नाहीं रे. नको तिकडे जाऊं. तुझ्या जिवाला धोका आहे तिकडे. तूं परत जायला कसा तयार होशील ? "

" मला जगण्याची इच्छा होण्यासारखा आशेचा एखादा तंतु दे. "

" भूसॅन ! बरं ऐक. तूं आतां तुझ्या देशीं जा.जर कदाचित् युद्ध संपून ब्रह्मदेश त्यांतून वांचला, तर परत मूलमेनला ये. आणि...... "

" आणि काय ? " मी अधीरतेनें विचारलें.

" आणि काय, तें सध्यां अपुरेंच ठेवलेलें बरें नाहीं का ? तोपर्यंत काय काय घडेल कुणीं पाहिलें आहे ! मी नसेन किंवा तूं नसशील किंवा...... "

" किंवा बॉ मॉंग नसेल ! " मी म्हटलें उपरोधानें.

" किंवा कुणीच नसेल. पण तूं असलास तर ये मूलमेनला. भविष्याची झांकली मूठ तेव्हां आपण उघडून पाहूं ! " असें म्हणत मा थेन थेन माझ्याजवळ आली, आणि आपल्या बोटांतली दोन खड्यांची आंगठी माझ्या बोटांत तिनं घातली ! "

हकीगत सांगतां सांगतां ब्रिजभूषण गप्प झाला. थोडा वेळ वाट पाहून मी विचारलें, " पुढें काय झालें ? "

" पुढें काय ? जगाची कांहीं वर्षें गेलीं. माझ्या बाबतींत काळ लोटलाच नाहीं. मी नुसता भ्रमिष्टासारखा आहें. आतां युद्ध संपून गेलें आणि माझ्या विचाराला चालना मिळाली गेल्या आठवड्यांत ! "

" गेल्या आठवड्यांत ? ती कशी ? "

" मा थेन थेननं दिलेल्या आंगठीतल्या दोन खड्यांपैकीं एक कुठें पडला. माझ्या मनांत त्यामुळें आलें कीं, मूलमेनला आतां

आपण परत जावें आणि आपल्या प्रेमाची झांकलेली मूठ उघडून पहावी म्हणून मला अठराशें रुपये हवे होते. "

मी उठलों नी त्याच्या पाठीवर थाप मारून म्हटलें, " ब्रिजभूषण, येवढ्याचकरितां तुला पैशाची नड होती तर त्याला मोटार विकण्याचें काय कारण? मला कळतें तर मी तुला स्वखुषीनें ती रक्कम दिली असती रे! मी चेक दिलेला आहे तो तूं ठेव. मात्र मोटारची किंमत म्हणून नाहीं." असें म्हणत त्यानें लिहून दिलेलें मोटारीचें विक्रीपत्र मी फाडून टाकलें.

विभावरी नी मी मोटार घ्यायला बाहेर पडलों संध्याकाळीं खरें, पण मोटार न खरेदी करतां पैसे मात्र खर्चून परत आलों! काय एकेक वेळेचा गुण असतो!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठाच्या सुमाराला आमचें दार कुणीं जोरजोरानें ठोठावलें. मी जाऊन उघडलें तों एक पोलिस अधिकारी आंत आला! त्यानें विचारलें,

" तुम्हीच का राजेंद्र पांडे ? "

" होय. " मी म्हटलें. ' काय काम आहे ? "

" काल संध्याकाळीं आपण बालिगंजांत राहणाऱ्या " ब्रिजभूषणलाल" यांना भेटायला गेला होतां काय ? "

" होय " मी म्हटलें.

" त्यांचं प्रेत आज त्यांच्या घरीं आढळलं. त्यांनीं एक पत्र लिहून ठेवलं होतं आपल्या नावानं. तें हें घ्या. आणि तुम्हांला काय माहिती आहे त्याचा लेखी जबाब लिहून द्या. "

मी तसाच बसून ब्रिजभूषणनं सांगितलेली हकीगत लिहून त्या पोलिस अधिकाऱ्याला दिली. आणि त्याला माझ्या नांवचें ब्रिजभूषणचें पत्रही दाखविलें.

कांहीं दिवसांनीं मला कॉरोनरच्या कोर्टांत समन्स आलें. पोस्ट-मॉर्टेमच्या रिपोर्टांत डॉक्टरांनीं म्हटलें होतें,

" हिरकण्या खाऊन मृत्यु. "

कॉरोनरनें मला विचारल्यावर, मी सर्व हकीगत पुन्हा सांगितली

सविस्तर त्यांना आणि म्हटलें, "प्रेमाच्या भरांत त्यानें आत्महत्या केली असावी !"

"हूं" कॉरोनर म्हणाला, आणि "वेडाच्या भरांत आत्महत्या केली" असा निकाल देऊन त्यानें केस संपविली !

बालिगंजांत जाऊन मी ब्रिजभूषणचीं सारीं बिलं चुकतीं केलीं नी ती ऑस्टिन मोटार घेऊन आलों.

खरंच, मी तुम्हांला ब्रिजभूषणचें पत्र दाखवायचें राहिलेंच कीं ! हें पाहा तें पत्र :—

"राजेंद्र, तूं परत गेल्यावर मी खूप वेळ विचार करीत बसलों होतों. मूलमेनला जायला पैसे हवे होते ते तूं दिलेस. पण मोटारचें विक्रीपत्र फाडलेंस. तें कशाला ? मोटार तूं विकत घेतली नाहींस तरी ती मी ठेवून काय करूं ? मूलमेनला कीं आणखी कुठें गेलों तरी मोटारचा आतां मला उपयोग नाहीं. तेव्हां ती मी तुला दिली आहे. माझ्या खोलींतलें सामान आवर. मी गेल्यावर हवें तें तुला घे. नको असेल तें देऊन टाक.

तुझा चेक कांहीं मी वटवणार नाहीं असं ठरविलं आहे. म्हणून तो फाडला आहे. माझ्याकरितां एकच गोष्ट करशील का ? माझीं काय बिलें आहेत ? थोडीं चारपांचशें रुपयांपर्यंत. तेवढीं चुकती कर. पावत्या घे.

मला पैसे नको आहेत, कारण मी मूलमेनला जायचा बेत रद्द केला.

काय होईल मी मूलमेनला गेल्यावर ? बा मॉंग नी मा थेन थेन कदाचित् सुखानं राहत असतील ! तिथं मी तिसरा कशाला ?

कदाचित बॉ मॉंग असेल. असो बिचारा ! पण मा थेन थेन तिथं नसली मूलमेनमध्यें, तर मूलमेनमध्यें नी कलकत्त्यांत, येवढेंच काय कुठेंच, मग मला काय फरक बरं ?

पण मा थेन थेन असली, बा मॉंग नसला नी मी परत गेलों तर ? पण त्याच गोष्टीची जाऊन शहानिशा करण्याइतकें माझ्या मनांत धैर्य उरलेलं नाहीं. माझ्या मनाची चलबिचल होते. मा थेन थेननं दिलेल्या आंगठींतला एक खडा म्हणजे ती नी एक खडा म्हणजे मी, असें

मानायला तिनं मला सांगितलं होत. मग परवां कळला तो खडा म्हणजे कोण ? मा थेन थेन गळली, का मी त्या जोडींतून फुटलों !

माझं मन फुरंगटून गेलं आहे. मी जगायला आतां नालायक झालों आहें.

संध्याकाळीं पक्ष्यांचे थवे आकाशांतून रेखीव रांगांनीं उडत जातांना मी पाहून त्यांची संख्या मोजीत असें, नी संख्या विषम भरली तर मनांत म्हणे कीं, हा बिनजोडाचा, विषम संख्येचा, पक्षी काय करीत असेल ? बाकी सर्व जोड्या आपआपल्या घरट्यांत गेल्यावर हा कुड-कुडत माझ्याचसारखा एकटा का बसत असेल बिचारा !

माझ्या पिढीच्या नशिबीं एकंदरींत कांहीं सुख नाहीं. पूर्वीच्या पिढींतल्या माणसांचीं सुखदुःखें ऐशींनव्वद वर्षांवर पातळ थरानें पसर-लेलीं असत. माझ्या पिढींत आम्ही पहिल्या वर्षींच मोठे होतों. दुसऱ्या वर्षीं वितो. तिसऱ्या वर्षीं युद्धावर जातों नि चौथ्या वर्षीं मरतों ! जन्माचीं सारीं सुखदुःखं इतक्या थोड्या अवधींत कोंबलेलीं असतात आमचीं कीं त्यानं माणुसकीच उरत नाहीं माणसांत. हें मनुष्याचें का जीवन मी जगत आहे ! छे, ही कुत्र्याची मौत ! नको हें निःसत्त्व जगणं !

" Musical Chair " खेळतात त्यांत रंगण धरणाऱ्या माणसांपेक्षां एक खुर्ची कमी असते. दर वेळीं एक खुर्ची कमी करीत, नी एक एक माणूस हरत जात, शेवटीं दोन माणसें नी एक खुर्ची उरते. एक हरा-यचाच. मला वाटतें मीच तो हरणारा म्हणून माझ्या नशिबीं लिहिलें आहे.

मी आयुष्यांत पाहिलें तर मला जोडीदार मिळाला नाहीं. भाग न जाणारी भागाकारांतली मी विषम बाकी ठरलों इथं.

तो उरलेला हिऱ्याचा खडा गिळणार आहें मी मा थेन थेनच्या आंगठीवरचा आतां !

पण या जगांतून जातांनाही माझ्या मनांत अंदेशा आल्याशिवाय राहत नाहीं, कीं " ऐलथडीला मी एकटाच राहिलों. पैलथडीला तरी मला 'एकला' नाहींना रहावें लागणार ! " —ब्रिजभूषण

# संस्कार : : ८

टेबलावर पडलेले दासबोध, भगवद्गीता, एकनाथांचें भागवत आणि भर्तृहरीचें वैराग्य शतक यांसारखे मोठमोठे ग्रंथ, भिंतीवर मध्यभागीं टांगलेली स्वामी विवेकानंदांची प्रतिमा आणि त्या प्रतिमेसमोर रोज सकाळीं आणि संध्याकाळीं नियमानें जळणारी उदबत्ती, या सर्व गोष्टी पाहिल्यावर पाहुण्याला वाटलं असतं, 'इथें कोणीतरी कर्मठ शास्त्री किंवा पंडित राहत असावा.' परंतु दाराच्या मध्यभागीं लावलेली, 'धनंजय देवदत्त, एम्.ए.,पीएच.डी.' ही पाटी वाचल्यावर पाहुणारा बुचकळ्यांतही पडला असता. आधुनिक उच्च शिक्षणानें नटलेल्या धनंजय देवदत्ताचा आणि घरांमधील वस्तूंचा पाहुणाराला लवकर मेळ बसवितां आला नसता.

त्या घरांतील शांत वातावरण पाहून तर येथें कोणीतरी थंड प्रकृतीचा माणूस राहत असावा असें वाटणेंही कांहीं अशक्य नव्हतें. तसें पाहिलें तर धनंजय, त्याची पत्नी आणि पांच वर्षांचा लहानगा सुधीर अशीं तीन माणसें त्या घरात राहत होतीं. धनंजय आणि त्याची पत्नी यांचं तारुण्य लक्षांत घेतां त्या घरांतलं वातावरण मधुर आणि अखंड संभाषणांनीं गजबजून जावयास हवें होतें. त्यांत आणखी पांच वर्षांच्या चिमुरड्या सुधीरची भर पडल्यावर तर त्या घरांत गोंगाट, रडणें, हंसणें, रुसणें, यांशिवाय दुसरें कांहीं ऐकूंच यावयास नको होतें. सर्वसाधारण माणसाची अशा कुटुंबाबद्दल हीच अपेक्षा असती.

कवि काय सांगतात, साहित्यिक काय लिहितात–हेंच! संसारास पुरून उरण्याइतका पैसा, पतिपत्नींचें विकसित तारुण्य, विद्वत्ता, आधुनिकता आणि त्यांत पहिल्या अपत्याची भर! संसारांत निश्चितपणें गजबजाट आणि गोंधळ असावयास हवा होता. पांच वर्षांच्या मुलाचे "बाबा, मला अमुक आणून द्या, बाबा, मी तमुक करूं का? बाबा, आई असं म्हणते नि आई तसं करते" असे बोबडे बोल त्या घरांत ऐकूं यावयास हवे होते. त्याचप्रमाणें तरुण आणि विद्वान् पतीच्या–तरुण आणि प्रेमळ पत्नीच्या "इश्य्. चला कांहीं तरीच. मला नाहीं हं असं कांहीं केलेलं खपणार!" एक ना दोन अशा मधुर आणि मोहक शब्दांनीं तें घर निनादून जावयास हवें होतें. एकमेकांस अनुरूप असणाऱ्या त्या पतिपत्नींत प्रेमाचीं भांडणें आणि भांडणांनंतर पुन्हा एकत्र येऊन एकमेकांची क्षमा मागणें, या गोष्टींची तर अत्यंत आवश्यकता होती. इतकेंच काय, परंतु रात्रींबेरात्रीं पति पत्नीला झोंपेंतून जागें करीत असल्याची सादही तेथें ऐकूं यावयास हवी होती.

परंतु यांपैकीं तेथें कांहींच घडत नव्हतें. फक्त लष्करांत पहावयास मिळावी तशी शिस्त तेथें दिसत होती. सकाळीं सहा साडेसहा वाजतां कपबशांचा आवाज ऐकूं येई. दहा वाजतां भांडीं वाजतांना ऐकूं येत. संध्याकाळीं पांच वाजतां पुन्हां कपबशांचा खडखडाट होई आणि रात्रीं नवाला पुन्हां ताटभांडीं आवाज करूं लागत. सबंध घरांत सबंध दिवसभरांत एखादें दुसरें वाक्य ऐकूं येई. स्मशानांत मधूनच घुबडाचा घूत्कार ऐकूं यावा तसें तें उच्चारलेलं वाक्य वाटे.

साऱ्या संसारांत तीन जीव! सुनेला सासुरवास करणारी सासू नव्हती कीं भावजयीची थट्टा करणारा दीर नव्हता. एकमेकींविषयीं कुजकी कुजबूज करणाऱ्या जावाही तिथें नव्हत्या. सुनेला सासुरवास होत असेल अशी शंका घेण्यास कांहींच जागा नव्हती.

पति शहरांतल्या एका कॉलेजांत प्रोफेसर होता. चांगला चारशें रुपयांपर्यंत त्याला पगार होता. पैशाच्या कमतरतेमुळें घरांत औदासिन्याची ही छाया पसरली असेल असेंही असणें शक्य नव्हतें.

तारुण्य, पैसा, सुंदर पतिपत्नी, विद्वत्ता, इतक्या गोष्टी असल्यावर सुखी होण्यास आणखी काय लागतें ? परंतु त्या घरात विखुरलेला थंडपणा पाहिला म्हणजे भूतकाळांत दासांनीं लिहून ठेवलेल्या उक्तीची आठवण झाल्यावांचून रहात नव्हती. "जगीं सर्वसूखी असा कोण आहे—" फार दूरदृष्टीनें रामदासांनीं हें विधान लिहिलेलें असावें. दौलत, पैसा, कीर्ति, या गोष्टी माणसाला सुखी बनवूं शकतात अशी सर्वसाधारण कल्पना आहे. आणि ह्या कल्पनेंत सत्याचा अंश बराच असला तरी माणसानें 'सर्वसूखी' असणें ही एक अशक्य कोटींतलीच गोष्ट ठरते.

धनंजयाच्या त्या थंड घराकडे पाहिलें म्हणजे तरी असें वाटल्यावांचून खचित राहत नसे. जीवन फुलविण्यास आणि फलविण्यास आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी उपलब्ध असतांना धनंजयाच्या संसाराला प्रेतकळा आल्यासारखें भासत होतें. आणि त्यांतून एकच निष्कर्ष निघूं शकत होता : 'कांहीं तरी चुकत असलें पाहिजे येथें ! कुठल्यातरी सुखाची कमतरता असली पाहिजे या संसारांत ! कुठल्यातरी दुःखानें या कुटुंबांत शल्याचें रूप धारण केलें असावें—'

"हें घ्या हें सर्व वाचून काढा. तोंडीं सांगण्याचं माझ्यांत धैर्य नाहीं." एक जाड पाकीट त्यानें विश्वनाथाच्या हातीं ठेवलें आणि तो निघून गेला....

असें नसतें तर हें औदासीन्य कां ? हा थंडपणा कां ? हा अबोलपणा कां ? पति, पत्नी आणि पुत्र यांच्या या चिमुकल्या घरकुलांत हा अबोलपणा कां ?—

खास कुठलें तरी शल्य त्या कुटुंबाला बोंचत असावें ! नाहींतर काय ? निदान विश्वनाथाला तरी तसें वाटलें.

प्रोफेसर धनंजयाच्या शेजारच्या जागेंत रहावयास येऊन त्याला महिना झाला होता, आणि आल्यापासून त्यानें धनंजयाच्या कुटुंबांतलें हें औदासीन्य पाहिलें होतें. आणि तीसचाळीस दिवसांच्या अवधींत त्याला त्या घरांतील अशा त्या औदासिन्याचें कारण मात्र समजलें नव्हतें.

बारकाईनें आणि कोणाच्या लक्षांत येणार नाहीं अशा बेतानें तो धनंजयाच्या घरांतील घटनांकडे लक्ष टाकी. धनंजयाच्या आणि त्याच्या बिऱ्हाडांना मिळून एकच नळ होता. सकाळीं तोंडांत ब्रश कोंबून विश्वनाथ नळापाशीं येऊन उभा राही. तेथून धनंजयाच्या घराचें स्वयंपाकघर दिसत असे. त्या नळापाशीं उभें राहून तो मधूनमधून घरांत काय चाललें आहे इकडे लक्ष देई. तीसचाळीस दिवसांच्या अवधींत त्याला धनंजयाच्या घरांत सकाळीं अगदीं ठरीव आणि यंत्रासारखा देखावा पहावयास सांपडला होता.

तोंड धुणें झालें कीं धनंजय सैंपाकघरांत मांडलेल्या पाटावर बसे. तोंडानें एक शब्दही न उच्चारतां तो पत्नीच्या हातून चहाचा पेला घेई. आणि तें मौन तसेंच टिकवून चहाचा कप रिता करून टाकी. एकदोनदां बाकी त्यानें पत्नीला विचारलें होतें :

" आणखीन् आहे का थोडासा चहा ? असेल शिल्लक तर घेईन म्हणतों !" या त्याच्या प्रश्नावर त्याच्या पत्नीनें कधीं न दिसलेलें हास्य तोंडावर आणून म्हटलें होतें, " हो इश्य् , नसायला काय झालं ! "

बस्. पण इतकंच ! येवढया संभाषणानंतर पुन्हा तेंच मौन ! इतकें झाल्यावर लहानगा सुधीर डोळे चोळीत तेथें येई, आणि एकदम धनंजयाच्या अंगाशीं झोंबाझोंबी सुरू करी. पण धनंजय त्याचें कौतुक करतांना विश्वनाथाला कधीं दिसला नव्हता. मात्र तो त्याच्यावर रागवल्याचेंही त्यानें पाहिलें नव्हतें.

मग धनंजयाची पत्नी सुधीरला घेऊन मोरीवर जाई. त्याचें तोंड धुऊन येई. तोंड धुणें झाल्यावर सुधीर पुन्हा धनंजयाच्या मांडीवर येऊन बसे. धनंजयाची पत्नी दुधानें भरलेला पेला धनंजयापुढें सरकवी. धनंजय मग सुधीरच्या डोक्यावरून हात फिरवीत त्याला दूध पाजी. इतकें झालें कीं मग तो बैठकींत निघून जाई. पुन्हां दहा वाजेपर्यंत सैंपाकघरांत फिरकतांना तो विश्वनाथाला कधींच दिसला नाहीं.

आणि मग बैठकींत धनंजय कुठल्यातरी जाडजूड ग्रंथांत मस्तक खुपसून बसलेला विश्वनाथाला दिसे. सैंपाकघरांत त्याची पत्नी सैंपाक

करण्यांत दंग असे. सुधीर पडवींत आपल्याशींच कांहींतरी खेळ खेळत असलेला दिसे.

जेवण झाल्यावर धनंजय कॉलेजमध्यें निघून जाई. विश्वनाथालाही कामावर जावें लागे. त्यामुळें धनंजय कॉलेजमध्यें गेल्यानंतर त्याची पत्नी घरीं काय करते याची कांहीं कल्पना त्याला येऊं शकली नव्हती. आतांपर्यंतचा विश्वनाथाचा अनुभव त्याला हेंच सांगत होता कीं हीं दोघें पतिपत्नी असलीं तरी कुठेंतरी कांहीं तरी चुकलें आहे. गैर-समजांचें वादळ निर्माण होऊन त्या दोघांचे संबंध कुठें तरी गाडले गेले आहेत. परंतु दोघेही संयमी असल्यामुळें संसारांत खटके उड-ण्याचे प्रसंग येत नाहींत येवढेंच! मात्र एका घरांत रहात असून सुद्धां तीं दोघेंही एकमेकांपासून कितीतरी योजनें लांब आहेत.

विश्वनाथाच्या या विचारसरणीला पोषक अशी घटना एकदां घडून आली.

त्या दिवशीं डोकें दुखत असल्यामुळें विश्वनाथ ऑफिसमधून दोनलाच घरीं परत आला. तो घरीं आला तेव्हां धनंजयाच्या घराचें पुढील दार बंद होतें. आल्यावरोबर विश्वनाथानें बिछान्यावर आपलें अंग झोंकून दिलें आणि झोंप घेण्याचा तो प्रयत्न करूं लागला. अर्धवट गुंगींत असतांनाच त्याला सुधीरच्या रडण्याचा आवाज ऐकूं आला. सुधीर कळवळून ओरडत होता. विश्वनाथानें भिंतीला कान लावले आणि सारा प्रकार चट्कन् त्याच्या ध्यानांत आला. धनंजयाची पत्नी सुधीरला मारीत होती, काठीचे सप्सप् आवाज ऐकूं येत होते, त्या मागोमाग सुधीरचें विव्हळणेंही.

सुधीरचें विव्हळणें वाढूं लागलें तसतशी विश्वनाथाच्या हृदयांत कालवाकालव होऊं लागली. धनंजयाच्या पत्नीची मुद्रा आणि वर्तन आतांपर्यंत त्याला अतिशय सौम्य वाटत होतें. अतिशय सोशिक स्वभावाची ती स्त्री असावी अशी त्याची त्या क्षणापर्यंत कल्पना होती. निदान ती दुष्ट स्वभावाची नसेल असें त्याला वाटत होतें.

परंतु घडत होतें सारें उलटेंच! ती सुधीरला गुराखारखी बडवीत

अनुक्रम ३२६२३
क्रमांक


होती आणि सुधीरच्या विव्हळण्याची तिळ खंतही वाटत नव्हतीसें दिसत होतें.

कांहीं क्षण निघून गेले. सुधीरचें विव्हळणें कमी कमी होत शेवटीं ऐकूं येईनासें झालें. कांहींच घडलें नाहीं अशी शांतता त्या घरांत पसरली. विश्वनाथ या कुशीवरून त्या कुशीवर वळला. परंतु त्याला झोंप मात्र येईना. त्याच्या कानाला अजूनही सुधीरचें विव्हळणें ऐकूं येत होतें. त्याच्या मनाला जिज्ञासा लागून राहिली. सुधीरला आपल्या घरीं आणून परवांच आणलेलीं बिस्कीटें त्याला देऊन त्याचें सहास्य वदन बघण्याची इच्छाही त्याला होऊं लागली. परंतु धनंजय घरीं नसतांना त्याच्या घरांत प्रवेश मिळविण्याची कल्पना त्याच्या सुसंस्कृत मनाला पटली नाहीं. सुधीरला जवळ घेण्याची त्याची इच्छा बाकी वाढतच होती.

शेवटीं तो उठला. नळ आले होते. खांद्यावर टॉवेल टाकून तो नळावर आला. त्यानें येतांना धनंजयाच्या घरांत दृष्टि टाकली. आश्चर्यानें त्याचें सर्वांग थरारलें. सुधीरची आई त्याला पाठमोरी भिंतीला टेंकून बसली होती. तिचा अर्धवट चेहेरा विश्वनाथाला दिसत होता. सुधीरला तिनें मांडीवर घेतलें होतें. सुधीरला मधूनमधून हुंदके येत होते. बरोबर आहे. आईची माया क्रोधापेक्षां कितीतरी पटीनें मोठी आहे हें समजल्यावर मुलाला असे हुंदके येणारच. सुधीरला घेऊन धनंजयाची पत्नी बसली आहे या घटनेचें विश्वनाथाला आश्चर्य वाटलें नाहीं. त्याला आश्चर्य वाटलें तिला स्वतःला रडतांना पाहून! तिच्या चेहेऱ्याचा डावा भाग विश्वनाथाला नळावरून दिसत होता. तिनें आपली मान विमनस्कतेनं भिंतीला टेंकविल्यासारखी दिसत होती. तिच्या डाव्या गालावरून मात्र आंसवांच्या धारा सारख्या वहात होत्या.

त्या विमनस्कतेत विश्वनाथ नळावर आल्याची चाहूलसुद्धां तिला लागली नाहीं. विश्वनाथाला माहीत नसलेल्या कुठल्यातरी असीम दुःखांत ती बुडून गेल्यासारखी दिसत होती आणि त्या दुःखाची परकाष्ठा झालेली होती म्हणूनच कीं काय ती आपल्याला आणि आजूबाजूच्या परिस्थितीलाही विसरून गेली होती.

विश्वनाथाला पेंच पडला. त्याची जिज्ञासा आणखी वाढीला लागली. सुधीरला आईनें मारण्याचें कारण विचारण्यासाठीं त्याचें अंतःकरण धडपडूं लागलें. परंतु उघड उघड त्याला बोलाविण्याचा त्याला धीर होईना. तसें करणें त्याला प्रशस्तही वाटेना. शेवटीं त्यानें वेगानें नळ सुरू केला. पाण्याच्या आवाजानें तरी धनंजयाची पत्नी भानावर येईल अशी त्याची समजूत होती; आणि ती खरीही ठरली. नळाची चाहूल लागतांच ती भानावर आली. तिनें एकदां विश्वनाथाकडे पाहिल्यासारखं केलें. परंतु त्याचें आपल्याकडे लक्ष नाहीं हें पाहिल्यावर मात्र तिला कमालीचें समाधान वाटलें. आपले अश्रु निपटीत ती झट्कन् घरांत निघून गेली. सुधीरची फुसफुस आतां पूर्णपणें बंद झाली होती.

“ सुधीर, बाळ, तेवढी बादली नळाखालीं ठेवून ये रे राजा—” सुधीरच्या आईचे शब्द विश्वनाथाला ऐकूं आले आणि लगेच सुधीरची बालमूर्ती बादली घेऊन येतांना त्याला दिसली. गुलाम आतां हंसत होता. विश्वनाथाला वाटलं, ‘ आईची माया म्हणजे एक प्रभावी जादूची कांडी आहे. तिच्या मायेची पाखर अपत्यावर पडली कीं रडवी मुद्रा क्षणांत हंसरी होते. दुःखाचा विसर पाडण्याची शक्ति आईच्या मायेंत आहे ’ आणि क्षणापूर्वीं आक्रंदन करणाऱ्या सुधीरची आतांची हंसरी मुद्रा पाहून कुणालाही हें सहज पटलें असतें.

“ काय सुधीर, आज तूं का पाणी भरणार आहेस ?—” विश्वनाथानें विचारलें.

“ हो—” लाजत नि हंसत सुधीर इतकेंच म्हणाला,

“ वा वा ! मग बक्षीस द्यायला पाहिजे बरं का तुला कांहींतरी. चल आमच्याकडे. छानशीं बिस्कीटं आणलीं आहेत. चला—”

चार वर्षांचं लहान पोर तें ! त्याच्या अंगीं कुठला मानभावीपणा वा अहंकार ! कोणी ये म्हटलं कीं यायचं. कोणी कांहीं देत असेल तें घ्यायचं, हाच त्याचा कर्मयोग.

सुधीरनें आणलेली बादली नळाखालीं लावून विश्वनाथानें त्याला उचलून घेतलें. बोबड्या भाषेंत त्याच्याशीं बोलत तो आपल्या घरांत गेला

आणि दोन बिस्किटें त्यानें त्याच्यापुढें केलीं. सुधीर मटमट करीत खाऊं लागला. बिस्किटें खाणाऱ्या सुधीरच्या बालमूर्तीकडे विश्वनाथ कांहीं काळ तसाच पाहत राहिला. आपल्याला जें विचारावयाचें तें कसें विचारावें यावर विचार करण्यांत त्यानें आणखी कांहीं क्षण घालविले. " काय सुधीर, काम ऐकलं नाहीं म्हणून आईनें आज मार दिला ना ?—"

विश्वनाथाच्या या प्रश्नावर सुधीरनें घोंटाळ्यांत पडल्याप्रमाणें मुद्रा केली. परंतु मिळालेल्या माराची आठवण दिल्याबरोबर त्याला पुन्हां अस्पष्टसा हुंदका आला. विश्वनाथानें झट्कन् एक बिस्किट त्याचेपुढें धरलें. सुधीरला आलेला हुंदका आंतच विरला. नंतर विश्वनाथानें युक्तीनें आईनें त्याला मारण्याचें कारण विचारलें. सुधीरनें आपल्या बोबड्या भाषेंत तें सांगितलें. आमच्या वाड्यासमोर एक तरुण जोडपें रहातें. सुधीर आज त्यांच्याकडे गेला होता. तिथले पतिपत्नींचे प्रेमळ संवाद त्यानें ऐकले होते. त्या दोघांची मोकळी वागणूक त्यानें बघितली होती. घरीं आल्यावर बालवृत्तीच्या जिज्ञासेनें त्यानें आईला विचारलें होतें. " आई त्यांच्यासारखें बाबा कां ग नाहीं बोलत तुझ्याशीं ? समोरच्या काकूंप्रमाणें तूं बाबांशीं कां बोलत नाहींस ? "

येवढा साधा प्रश्न ! आणि तोही सुधीरसारख्या बालमनानें विचारलेला ! वास्तविक क्रोधाविष्ट होऊन मातेनें मुलाला गुरासारखें मारण्याइतकें त्या सरळ प्रश्नांत काय होतें ? विश्वनाथाच्या मनांत असाच विचार आला. त्या प्रश्नाच्या आगमनाबरोबर त्याची जिज्ञासा वाढली. धनंजय पतिपत्नींच्या संसारांत कांहीं तरी गौप्य आहे ही त्याची शंका अधिकच दृढ झाली. आणखी एक विचार त्याच्या मनांत आला. धनंजयाच्या पत्नीला सासू नसली तरी धनंजयाच्या विचित्र स्वभावाचा आणि विचित्र राहणीचा सासुरवास सहन करावा लागत असावा. धनंजय दिसावयास साधा आणि भोळसर असला तरी त्याची वृत्ति बाकी अतिशय दुष्ट असली पाहिजे. धनंजयाच्या सहवासांत तिचा छळ होत असावा आणि तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्याचें दिव्य तिला करावें लागत असावें. वरून शांत आणि थंड दिसणारीं माणसं ' प्रेमपिसाट ' अगर ' प्रेमपिपासू ' असतात असें विश्वनाथाच्या वाचनांत

अनेक वेळां आलें होतें. पत्नीशीं पशुवृत्तीनें वागल्याशिवाय, तिचा छळ केल्याशिवाय, किंबहुना तिला शारीरिक पीडा दिल्याशिवाय, ज्याची मन:शांति नि त्याचबरोबर कामशांति होत नाहीं अशा प्रेमपिपासु पशुवृत्तींतील माणसांपैकीं धनंजयही असला पाहिजे असें त्याला वाटलें. मनांत उद्भवलेल्या या विचित्र शंकेची शहानिशा करावयाचें तो ठरवूं लागला.

सुधीरला घेऊन तो त्याला पोंचविण्याकरितां गेला तेव्हां धनंजयाची पत्नी नळावर उभी होती. विश्वनाथानें तिच्याकडे पाहिलें. गेल्या महिन्या-दीड महिन्याच्या दीर्घ कालावधींत आजच त्यानें तिच्याकडे रोखून आणि लक्षपूर्वक पाहिलें. ती सुंदर तर होतीच परंतु त्या सौंदर्याला भडकपणा मात्र नव्हता. डोळे मोठाले आणि मोहक होते, परंतु त्यांत फाजील चमक नव्हती. तिच्याकडे इतकें लक्षपूर्व पाहिल्यावर ती अतिशय सौम्य स्वभावाची, स्नेहमय आणि शांत स्वभावाची स्त्री असावी असा आणि येवढाच निष्कर्ष विश्वनाथानें काढला. मात्र तिच्या मुद्रेवरील कुठल्या तरी कोपऱ्यांत विषादाची आणि उदासीनतेची छाया पसरली असल्याचें त्याच्या दृष्टींतून सुटलें नाहीं.

विश्वनाथ बैठकीच्या खोलींत आला तेव्हां धनंजयाशीं कांहीं ना कांहीं निमित्तानें ओळख करून जमल्यास त्या ओळखीचें स्नेहांत रूपांतर करावें या विचारांतच! आतांपर्यंत धनंजय आपणहून त्याच्याशीं एक शब्दही बोलला नव्हता आणि त्याचा असा विचित्र स्वभाव पाहून आपणहून त्याच्याशीं बोलण्याचें धैर्य विश्वनाथाला झालें नव्हतें. परंतु धनंजयाच्या पत्नीची मुद्रा पाहिल्यावर मात्र त्याला राहवेना. त्याच्या दृष्टीसमोरून धनंजयाच्या पत्नीची मुद्रा सरकूं लागली. धवल वस्त्रावर शाईचा मोठा काळा ठिपका पडावा तशी त्याला तिची मुद्रा भासली.

संध्याकाळीं धनंजय घरीं आला. आल्याबरोबर नेहमींप्रमाणें कोणाशीं कांहींही न बोलता खुर्चीवर बसला. कपडे उतरवीत असतांना त्यानें सुधीरला म्हटलें, " बाळ सुधीर, जा मी आलों आहें म्हणून सांग —"

थोडयाच वेळांत चहाचा पेला घेऊन त्यांची पत्नी आली. नेहमींच्या शांततेंत धनंजयाचें चहा पिणें आटोपलें. नंतर जेव्हां तो पडवींत आला तेव्हा विश्वनाथाला चांगली संधि मिळाली. त्यानें ती वाया दवडली नाहीं.

" बरं का प्रोफेसर साहेब, आज तुमचे युवराज आमच्याकडे आले होते—" किंचित् हंसत विश्वनाथ म्हणाला.

" खरं ? अरे वा !" बस्. इतकेंच बोलून धनंजय थांबला.

विश्वनाथला प्रश्न पडला आतां संभाषण कसें चालू ठेवावयाचें ? किंचित्काळ विचार करून त्यानें विचारलें,

" काय कॉलेजचं गॅदरिंग वगैरे कधीं आहे ? "

" गॅदरिंग ? त्याला तर अजून महिना आहे. कां बुवा ? "

" कांहीं नाहीं. सहज विचारलं. "

निष्पत्तिहीन असा हा संवाद चालला होता. विश्वनाथ कांहीं तरी विचारीत होता आणि धनंजय कांहींतरी उत्तर देत होता. दोघांच्याही बोलण्यांतून कांहीं निष्पत्ति निघत नव्हती.

एक गोष्ट मात्र झाली. आपल्याला वाटला तितका हा गृहस्थ बोलून फटकळ नाहीं याची विश्वनाथाला कल्पना आली. त्याचा धीर चेपला.

त्यानंतरच्या दोनतीन दिवसांत विश्वनाथ कांहींतरी निमित्त काढून धनंजयाशीं बोलला नाहीं असें घडलेंच नाहीं. चवथ्या दिवशीं तर तोंडांत ब्रश अडकवून नळावर उभे असतांना राजकारणावर अल्प चर्चा करण्यासही विश्वनाथानें कमी केलें नाहीं.

एक गोष्ट विश्वनाथाच्या आणखी ध्यानांत आली. ती हीच कीं, त्याच्याशीं बोलतांना धनंजयाला आनंद होत होता. किंबहुना तो जितकें जास्त बोले तितका त्याला आनंद होई. विश्वनाथाच्या प्रश्नांचें तो सहास्य उत्तरानें स्वागत करी. विश्वनाथालाहि तो कांहीं विचारी !

भिडस्तपणा आणि औपचारिकपणा यांचे पडदे क्षणांत विरळ झाले. हळूहळू दोघांच्याही बोलण्यांत मनमोकळेपणा येऊं लागला. विचित्र स्वभावाचा भासणारा धनंजय ऑफिसमधून येतांच, घरांत शिरतांशिरतां

" अहो विश्वनाथ, आहांत का घरीं ? " अशी आरोळी मारूं लागला. पुढें पुढें तर धनंजय विश्वनाथाला आपल्याकडे चहाला बोलावूं लागला. दोन चुकलेले वाटसरू पुन्हा एकत्र यावे तसेंच धनंजय आणि विश्वनाथाच्या बाबतींत झालें होतें.

जेव्हां जेव्हां चहाला विश्वनाथ धनंजयाकडे गेला तेव्हां तेव्हां त्यानें त्याला त्याच्या पत्नीशीं बोलतांना मात्र पाहिलें नाहीं. पत्नी चहाचे कप घेऊन आली कीं तो तिच्याकडे दृष्टिक्षेपसुद्धां न टाकतां ते कप हातांत घेई. आली तशी त्याची पत्नी न बोलतांच आणि न थांबतांच परत जाई. आपल्या बोलण्यांत आपल्या पत्नीचा उल्लेखसुद्धां येणार नाहीं याचीही धनंजय काळजी घेई.

धनंजय आणि विश्वनाथ यांच्यांत बरेंच खेळीमेळीचें वातावरण निर्माण झालें. एकदां विश्वनाथ ऑफिसमधून रात्रीं नवाच्या सुमाराला परत आला तेव्हां धनंजय हातांत 'दासबोध' घेऊन ओंठांतल्या ओंठात त्यांतील श्लोक गुणगुणत होता. त्याच्या चेहेऱ्यावर विषादाची दाट छाया पसरलेली दिसत होती. संसाराला कंटाळून विरक्तीचा मार्ग शोधणाऱ्या वैराग्याप्रमाणें त्याची मुद्रा भासत होती. तो दासबोध वाचण्यांत हरपला होता.

त्याची तंद्री भंग करण्याचें विश्वनाथाच्या जिवावर आलें. दाराचें कुलूप काढून तो आंत शिरला. कोट काढीत असतांनाच त्याच्या कानांवर हांक ऐकूं आली—" विश्वनाथ, अहो, विश्वनाथ—"

गेल्या काहीं दिवसांचा, रात्रीं बाराबारा वाजेपर्यंत गप्पा मारीत बसण्याचा त्या दोघांचा नियमच होऊन बसला होता. आज त्यांत खंड पडणार असें विश्वनाथाला वाटलें होतें. पुन्हा हांक ऐकूं आली.

' या हो विश्वनाथ !—"

विश्वनाथ दबकतच आंत शिरला. धनंजयाची केविलवाणी मुद्रा पाहून तर तो आश्चर्यातच पडला.

" या विश्वनाथ. केव्हांची वाट पहातों आहें मी तुमची. या या जरा गप्पा मारूं झोंप येईपर्यंत. "

विश्वनाथाला आश्चर्य वाटलें. तरुण माणूस, येवढं पिठासारखं चांदणं पडलं आहे. गुलाबी थंडी चारीही बाजूंना विखुरली आहे. घरांत तरुण आणि सुंदर पत्नी आहे. असें असून हा आपल्याला गप्पा मारण्यास सांगत आहे याचें त्याला आश्चर्य वाटलें. गेले आठदहा दिवस विश्वनाथ त्याच्याशीं बाराबारा वाजेपर्यंत गप्पा छाटीत बसला होता. त्या अवधींत त्याला कधीं आपल्या पत्नीचें स्मरणही झालें नव्हतें. गप्पा करीत करीत जेव्हां त्याचा शब्द घोगरा येऊं लागे तेव्हां विश्वनाथ निघून जात असे, तरुण मंडळी रात्रीं बायकोशिवाय इतरांचा सहवास बहुधा पसंत करीत नाहींत. परंतु धनंजयाचें मात्र जगाविरहितच! विश्वनाथाला आपणहून गप्पा मारण्यास तो बोलावीत होता. तत्पूर्वी तो दासबोध वाचीत होता. सारेंच विचित्र! चमत्कारिक!!

विश्वनाथ आंत आला. हंसत हंसत तो म्हणाला,

" मुद्दामच नाहीं आलों मी आज! म्हटलं कशाला अशा भलत्या वेळीं तुमच्या पतिपत्नींत व्यत्यय आणायचा? गेले आठ दिवस तर पहारेकऱ्याप्रमाणें मी बारा बारा वाजेपर्यंत तुमच्यावर जणुं पहाराच ठेवतों आहें—" हंसत हंसतच विश्वनाथानें आपलें वाक्य संपविलें.

धनंजय हंसला नाहीं. उलट तो अधिकच विषण्ण झाला. त्याच्या कपाळावर बारीक आंठ्यांचें जाळें विणलें गेलें. आणि मग तो बोलला अकस्मात् पुराचा लोंढा यावा त्याप्रमाणें!—

" नाहीं नाहीं विश्वनाथ! दिवसां नाहीं आलांत तरी चालेल. रात्रीं मला एकटं नका सोडीत जाऊं. झोंप लागेपर्यंत माझ्याशीं गप्पा करीत जा. मला रात्रीं एकटं नका सोडूं!— "

एकटा! घरांत बरोबरीची बायको असल्यावर त्याला एकटेपणा कां वाटावा? विश्वनाथ दिङ्मूढ झाला.

" चला, सिनेमाला चलतां?" धनंजयानें विचारलें.

" कुठल्या?—"

" जाऊं झालं कुठल्यातरी!"

विश्वनाथानें एकच निष्कर्ष काढला—झोंप लागेपर्यंत त्याला वेळ काढावयाचा आहे. बाकी यामधील रहस्याचा त्याला उलगडा होईना!

चित्रपट पाहून परततांना दोघेही कांहीं बोलत नव्हते. विश्वनाथाला तें रहस्य समजावून घेण्याची मनस्वी उत्कंठा लागली होती. कसें बोलावें हें न सुचल्यामुळें त्याच्या पोटांत कालवाकालव सुरू झाली होती. शेवटीं त्यानें धीर करून विचारलें,

" धनंजय, एक विचारूं—"

" अं—" धनंजय घुटमळला. किंचित् काल थांबून मग तो म्हणाला, " हो हो, विचाराना ! "

" तुम्हांला कसलं दुःख आहे का ? तुमचं घरांतलं औदासीन्य, बायकोबद्दल बेफिकीरी, या सर्व गोष्टी मला कशा विचित्र वाटतात ! यामागें कांहींतरी रहस्य असलं पाहिजे असं मला वाटतं ! तुमच्या दुःख-निवारणाचा एखादा मार्ग सुचवितां आला तर मी सुचवूं शकेन. "

" हं ! " धनंजय थांबला. त्यानें ओंठ घट्ट आवळून धरले होते. त्याची मुद्रा घामानें डबडबल्याप्रमाणें दिसूं लागली.

" हो. कुणाजवळ तरी मला तें सांगायचंच आहे. पण बोलून सांगण्याचं माझ्यांत धैर्य नाहीं. उद्यां तुम्हांला सारं समजलं तर नाहीं का चालणार ?—"

सरळ स्वभावाच्या त्या माणसाची विश्वनाथाला कींव आली, वाईटही वाटलें.

एकही शब्द मुखावाटें न काढतां त्यांनीं उरलेला मार्ग आक्रमिला.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच धनंजयानें विश्वनाथाच्या घराचें दार ठोठावलें. विश्वनाथ उठलासुद्धां नव्हता. दारावरच्या थापा ऐकून तो उठला आणि त्यानें दार उघडलें. तो कांहीं बोलण्यापूर्वींच धनंजय बोलला,

" हें घ्या. हें सर्व वाचून काढा. तोंडीं सांगण्याचं माझ्यांत धैर्य नाहीं. " एक जाडजूड पाकीट त्यानें विश्वनाथाच्या हातीं ठेवलें आणि तो निघून गेला. विश्वनाथानें पाकीट उघडलें. आंतील कागद काढून तो वाचूं लागला,

" प्रिय विश्वनाथ,—

काल सिनेमाहून परतल्यावर हें लिहिण्याकरितां मी बसलों आहें. आतांपर्यंत, कुणाला तरी माझं दुःख सांगून टाकावं असं मला फार फार वाटत होतं. परंतु मला तसं कोणीं विचारलंच नव्हतं. काल तुम्हीं विचारलंत.

तुम्ही रहातां त्या जागेंत यापूर्वी दोनतीन बिऱ्हाडं येऊन गेलीं. त्यांना माझा जीवनक्रम पाहून कुतूहल वाटे. त्यांनीं आपसांत तशी कुजबूजही केली. परंतु माझ्या या विचित्र वर्तनाची कारणमीमांसा शोधण्याचा कोणीं प्रयत्न केला नाहीं. इतकेंच काय, माझ्याशीं कोणी बोललें देखील नाहीं. अर्थात् याला माझा विचित्र स्वभाव कारणीभूत झाला असेल.

माझा जीवनक्रम विचित्र आहे हें मी नाकबूल करीत नाहीं. परंतु मला एवढंच म्हणायचं आहे कीं माझी प्रकृति विचित्र नाहीं. कॉलेज मध्यें असतांना अतिशय खेळकर स्वभावाचा म्हणून मी प्रसिद्ध होतों. कॉलेजांत आणि कॉलेजबाहेरील जीवनांत मी पुरता रंगून गेलों होतों. अतिशय बोलका म्हणून आजूबाजूचें जग मला ओळखीत होतें.

आज मी सर्वांना विचित्र भासतों आहें. पण मी विचित्र झालों आहे. परिस्थितीनें मला विचित्र केलें आहे. घरांत मी माझ्या पत्नीशीं बोलत नाहीं. मुलालाही क्वचित्च जवळ घेतों. महिने निघून जातात संभाषणावांचून! आजूबाजूचे लोक आश्चर्य करतात. कोणीं मला तत्त्वज्ञानी ठरवून टाकलं आहे. ' व्यासंगामुळें याचा स्वभाव असा बनला आहे.' असं लोकांना बोलतांनाही मी ऐकलं आहे. कांहींनीं मला क्रूर वृत्तीचा म्हणून संबोधलं आहे. कांहींना वाटतं, मी माझ्या पत्नीला सासुरवास करतों.

पण माझी प्रकृति तशी नाहीं. हाडाचा मी दुष्ट नाहीं. परिस्थितीनें मला दुष्ट केलें आहे असेंही मला वाटत नाहीं. माझ्या वागण्यांत गूढ आणि विचित्रपणा मात्र आला आहे. माथेफिरू माणसाप्रमाणें मी वागतों, हेंही खरें आहे.

हें सर्व झालें त्याला कारण माझ्यावर झालेला आघात ! कुणींतरी माणसाला भिंतींत चिणून मारण्याचा प्रयत्न केला तर त्याला काय वाटेल? सर्व प्रियजनांत प्रियतर व्यक्तीनें विश्वासघात केल्याचं समजल्यावर माणसाला कसं वाटेल ? तो क्रूर होईल नाहीं तर वेडा होईल !

तुम्हांला खरंही वाटणार नाहीं. शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत लग्न न करण्याचं माझं ठरलं होतं. शिक्षण सुरू असतांना मला कोणत्याही स्त्रीचा सहवास लाभला नव्हता. मी तसा तो मिळविण्याचा प्रयत्नही कधीं केला नव्हता. एकमेकांना न ओळखणाऱ्या पतिपत्नींची लग्न झाल्यावर पहिल्या रात्रीं जी भेट होते, तसल्या भेटींत मला जास्त काव्य भरलें आहेसें वाटत होतें. एकमेकांना बिलकूल न ओळखणारीं पतिपत्नीला पहिल्या रात्रीं शयनगृहांत गेल्यावर आधीं कोणी बोलायचं, कसं बोलायचं, किंचित् खोकल्यासारखं करून दोघांपैकीं नवरीनें आपण आल्याची वर्दी द्यायची. वरानें छाती भरून आल्यामुळें, घाबरत वधूकडे पहायचं ! तिनें मग खूप लाजायचं. त्यानें उठून तिचा हात घाबरतच हातीं घ्यायचा. घाबरल्यामुळें तिचे जड श्वासोच्छ्वास त्याला ऐकूं यायचे. मग दोघांच्याही हाताच्या मिठया परस्पर विश्वासानं घट्ट व्हायच्या !!

मला वाटतं यांत खरं काव्य आहे. तेव्हां वाटत होतं—अजूनही वाटतं आहे. येवढ्याचकरितां मी लग्नापूर्वीं स्त्रीसहवासाची अभिलाषाच कधीं बाळगली नाहीं.

लग्न झाल्यावर मला ती काव्यमय घडी अनुभवण्यास मिळाली. पण अर्धवट ! प्रणयाचे खेळ खेळणें झाल्यावर, काव्यमय आनंदांतून मीं बेहोष आनंदांत मग्न व्हावयाचें ठरविल्यावर, ज्या कृतीला विद्वानांनीं रतीच्या नांवानें संबोधलें आहे त्या क्रीडेचा बेहोष आनंद लुटण्याचें मी ठरविल्यावर......

मला समजलें कीं, मी जीवन हरलों. संसारांत मी आतां अयशस्वी होणार. मी वेडा होणार, नाहींतर दुष्ट होणार—क्रूर होणार !

माझ्या आयुष्यांत प्रथमच प्रवेश केलेल्या स्त्रीला—माझ्या पत्नीला—

अन्य पुरुषाचा विटाळ झालेला होता. तिला दिवस गेले होते. तिच्या पोटांत पिंड तयार होत होता ! येवढेंच मी लिहूं शकतों. अधिक खोल वर्णन करून सांगणें मला जमणार नाहीं !!

पहिल्या रात्रीचें तें काव्य अर्धवट सोडूनच मीं शयनगृहाचा त्याग केला. माझें मस्तक गरगरूं लागलें. दृष्टी जड झाली. घसा सुकून गेला. नेमका माझ्या काळजावर कुणींतरी भयंकर तीर मारल्यासारखं मला झालं !

मी संतापलों. संतापानें वेडा होण्याच्या पंथाला लागलों. तसेंच घरांत जाऊन पत्नीच्या नरडीचा घोंट घेऊन त्या काव्याची समाप्ति करावी अशी इच्छा मला होऊं लागली. क्रौर्याकडे माझ्या मनाची प्रवृत्ति होऊं लागली.

इतक्यांत माझ्या कानांवर विव्हळण्याचे सूर पडले. माझी पत्नी आंत रडत होती. तिचें विव्हळणें माझ्या हृदयाशीं जाऊन भिडलें. मी तसाच बसून राहिलों. मग कांहीं सुचत नव्हतें. इतक्यांत माझी पत्नी दारांत आली. हृदय फुटून निघेल अशा करुणायुक्त स्वरानें आक्रोश करीत ती म्हणाली,

'खरंच चुकलें मी. मला क्षमा करा. मला पदरांत घ्या ! माझा त्याग करूं नका. हवं तर तुमच्या हातांनीं माझा गळा दाबून प्राण घ्या.' तो आक्रोश मला ऐकवला नाहीं. ती बोलतच होती :

'माझा इलाज नव्हता. मी स्त्री आहे. दुर्बल आहे. माझ्या दुर्बलतेचा फायदा घेण्यांत आला. मी स्त्री आहे. माझी कमजोरी तुमच्या सुसंस्कृत मनाला उमगत नाहीं काय ?—सांगा—'

मी वेडा होणार होतों. क्रूर होणेंही शक्य होतें. पण तसें झालें नाहीं. उत्तम संस्कार झालेलें माझें मन जागें झालें. हिंदु धर्मातील पंधरा आज्ञा लिहून ठेवणाऱ्या मनूच्या संदेशाचें मला स्मरण झालें—

'स्त्री दुर्बल आहे. पण ती नादान मात्र नाहीं. ती कामविकाराला बळी पडते हा तिचा निसर्गधर्म आहे, परंतु तो दोष तिचा नाहीं. तिला कामविकारास प्रवृत्त करणाराच खरा दोषी असतो.'

त्याच बरोबर मला पुराणांतल्या एका राजाचें स्मरण झालें. एका

परकीयानें त्याला विचारलें, ‘ राजा, तुझें राज्य कसें आहे ? तुझ्या राज्यांतील प्रजा कशी आहे ? ’ यावर त्या राजानें दिलेलें उत्तर—

‘ माझी प्रजा शूर आहे, पापाला भिणारी आहे. माझ्या प्रजेंत संत आहेत. विद्वान् आहेत. स्वार्थी आणि भोंदू लोक माझ्या राज्यांत नाहींत. आणि स्वैर तर नाहींतच, मग स्वैरिणी कुठून सांपडणार ! ’

त्या राजाच्या उद्गारांतून एकच सूर निघतो—‘ स्त्री जात्याच स्वैरिणी नसते. समाजांतील स्वैर तिला स्वैरिणी बनवितात. ’

त्या दिवशीं माझ्या भावनांचा प्रक्षोभ थांबला. परंतु माझ्या बुद्धीचें समाधान झालें नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, माझा स्वभाव विचित्र बसला !

मी माझ्या पत्नीला डॉक्टरकडे नेलें नाहीं. माझ्या लग्नानंतर सहाच महिन्यांनीं सुधीरचा जन्म झाला. मात्र मी माझें गांव सोडलें आणि या गांवांत वास्तव्य करण्यास आलों. सुधीर माझा मुलगा नाहीं. पण तो एक निष्पाप जीव आहे. माझ्यापासून न जन्मलेल्या त्या अर्भकाची हत्या करण्याचें असंस्कृत आणि रानटी वर्तन माझ्या हातून घडलें नाहीं.

माझं लग्न होऊन चार वर्षें झालीं आहेत. पण पत्नीच्या शरिराला स्पर्श करणें माझ्या बुद्धीला पटत नाहीं. तिला हा वनवास सहन करावा लागतो हें खरें असलें तरी मी स्वैर झालों आहें असें नाहीं. मी सुद्धां आज चार वर्षें माझी वैषयिक भूक आवरून हा विरह–हा वनवास–सहन करतों आहें.

पत्नीचें दुःख मला पाहवत नाहीं. तिच्यांत आणि माझ्यांत उभी असलेली ही बुद्धीची भिंत ओलांडण्याचा मी प्रयत्न करतों, पण साऱ्या स्मृति एकवटून माझ्या डोक्यांत गर्दी करतात आणि माझा हेतु सिद्धीस जात नाहीं.

पति सन्निध असून सहन करावा लागणाऱ्या विरहानें पोळल्यामुळें ती सुधीरवर चिडचिड करते, आणि माझी वागणूक विचित्र होऊन बसली आहे.

माझी ती खूप काळजी घेते. मीही तिला कधीं दुखवीत नाहीं. रात्र झाली कीं ती एका खोलींत पडते. मी माझें मन

दासबोध आणि गीता यांसारखे ग्रंथ वाचण्यांत गुंतवितों. रात्र झाली आणि वाचनाचा कंटाळा आला कीं मला भीति वाटते. न जाणो पुन्हा सूडाची भावना तर माझ्या मनांत प्रज्वलित होणार नाहीं ? कांहीं क्रूर कृत्य तर आपल्या हातून घडणार नाहीं ?

बेइमान बायकोवर नवऱ्यानें कुऱ्हाडीचे घाव घातल्याचीं उदाहरणं थोडीं का आहेत ?

तो प्रसंग विसरण्याचे माझे प्रयत्न चालू आहेत. त्या प्रसंगाचें भयानक स्वरूप कमी झालें कीं मला खात्री आहे, मी आमच्या मधली ही भिंत ओलांडूं शकेन. तिला माझ्या हृदयाशीं कवटाळूं शकेन. इतके दिवस पाळलेलें मौन सोडून तिच्याशीं खूप बोलूं शकेन. चुकलेल्याला किंवा अपराध्याला प्रायश्चित्त सांगून पुन्हा त्याला जगण्याचा हक्क देण्याचें आपल्या या हिंदुधर्मांत सांगितलें आहे. हिंदुधर्मांतील उदात्त तत्त्वांपैकीं तें एक तत्त्व आहे.

हिंदु धर्माचे संस्कार झालेल्या मलाही तेंच करावयाचें आहे. चार वर्षांचा विरह हें कांहीं लहानसहान प्रायश्चित्त नाहीं. माझी पत्नी म्हणून जगण्याचा आतां तिला हक्क आहे असें मला आतांशा वाटूं लागलें आहे.

माझी खात्री आहे हा वनवास आज ना उद्या संपेल. आमच्या दोघांतील ही कोंडी फुटेल. मनांतलें किल्मीष धुऊन आम्ही एक होऊं.

त्या दिवसाकडे दृष्टी लावून मी बसलों आहे.

हे कागद मी आनंदानें लिहून काढले. आतांच ते तुम्हांला नेऊन द्यावे असेंही मला वाटतें, परंतु तुमची निद्रा भंग करण्याचें माझ्या जिवावर आलें आहे.

'धनंजय'

एकदां, दोनदां, तीनदां ते कागद वाचून विश्वनाथाचें समाधान होईना. तो खिडकीशीं आला. त्याची दृष्टि बाहेर गेली. धनंजय सुधीरला घेऊन पडवींत उभा होता.

अत्यादरानें त्याचें मस्तक विनम्र झालें.

# कुस्करलेलं फूल : : १

आली दिल्ली! यमुनेचा पूल, तुरळक तुरळक दिसूं लागणारीं उंच घरं, रुळांचं जाळं आणि शेवटीं केबिन दृष्टीस पडतांच, दिल्ली आल्याबद्दल तिची खात्री झाली. खिडकींतून बाहेर तोंड काढून तिनें पाहिलं. त्या रेल्वे रुळांच्या अफाट जाळ्यांतून तिची गाडी आपला नक्की मार्ग ओळखून बेधडक चालली होती. निर्जीव गाडीला देखिल आपला नक्की मार्ग हुडकून काढतां येतो. पण माणसाचा मार्ग मात्र अनेक वेळां चुकत असतो. आपल्या आयुष्याच्या गाडीला आतां कोणता मार्ग सांपडणार? तिनें परत डब्यांत पाहिलं. तिच्याच सारख्या अनेक अभागिनी जवळ आलेल्या दिल्लीकडे आशाळभूतपणानें पाहत होत्या. पण पुढें काय? शेवटीं दिल्लीजवळ आली. पण पुढें काय? केव्हांपासून हा विचार सारखा तिच्या मनांत थैमान घालीत होता. दिल्लीला गेल्यावर तरी आपण काय करायचं? कुणाच्या तोंडाकडे पहायचं? आपलं म्हणून म्हणायला आतां या जगांत असं कोण उरलं आहे! आणि आपलं कोणी असलंच तरी तें आपल्याला 'आपलं' म्हणून म्हणायला तयार होईल का?

आणि याच वेळीं गाडी प्लॅटफार्मला येऊन उभी राहिली. स्टेशनवर नेहमीं ऐकूं येणारा 'पान बिडी सिगरेटचा' गोंगाट ऐकूं येत नव्हता, तर तिथें एक प्रकारची शांतता नांदत होती. हळूच खिडकींतून तिनें बाहेर पाहिलं. कितीतरी लोक जमले होते. पण ते सारे शांतपणानें उभे होते. त्यांत स्त्रियांचाच भरणा अधिक होता आणि

त्यांच्यां सारख्या पोशाखावरून त्या बहुतेक स्वयंसेविका असाव्यात असा तिनें अंदाज केला. या जमलेल्या लोकांच्या तोंडावर सरसहा एक विचित्र छटा दिसत होती. कुणाबद्दल तरी दया कळवळा, कींव, अशाच पैकीं कांहीतरी या साऱ्या लोकांना वाटत असावं असं सहज ओळखतां येण्यासारखं होतं. आणि तें लक्षांत येतांच ती एकदम दचकली. तिनें खिडकींतून बाहेर काढलेलं आपलं तोंड चट्कन् आंतल्या बाजूला वळवलं. आपली दिल्ली आली ही सुखात्मक भावना विरून आतां आपलं हें काळं तोंड आपल्या दिल्लीला दाखवावं लागणार या विचारानं तिला लाजेनं मेल्यासारखं झालं. एकाएकीं अश्रु उभे राहिलेल्या डोळ्यांनीं तिनें डब्यांतल्या आपल्या इतर सहप्रवासिनींकडे पाहिलं. त्यापैकीं कित्येकींच्या डोळ्यांतून अश्रु वहात होते, तर कित्येकींनीं अंगावरल्या ओढणींत आपलं तोंड झांकून घेतलं होतं. एक पोरगेलेशी तरुणी तर ओक्साबोक्सी रडूं लागली होती. थोड्या वेळापूर्वी आतां आपल्याला आपल्या मायेची मंडळी भेटतील या कल्पनेनं आनंदित असलेल्या त्या सर्वजणीं आतां आपलं हें काळं तोंड पाहून आपल्याला काय काय ऐकावं लागेल आणि सहन करावं लागेल या कल्पनेनं हवालदिल झाल्या होत्या आणि तें साहजिकच होतं. कारण त्या सर्व अपहृत स्त्रिया होत्या. मोठ्या प्रयासानं भारत सरकारनें—पाकिस्तान-मधून या पळवून नेलेल्या अबलांची सोडवणूक करून त्यांना परत आणलेलं होतं. या क्षणीं त्यांना त्यांच्यावर बेतलेल्या दुर्धर प्रसंगांची जरी विस्मृति झाली असली, तरी त्यामुळें जीवनाला लागलेल्या कलंकाची बोचणीं त्यांच्या अंतःकरणांत सारखी सलत होती. परत आपल्या माणसांत येऊन पडण्याच्या सुखापेक्षां मरण आलं असतं तर बरं झालं असतं असं लाजेनें चूर झालेल्या त्यांपैकीं कित्येकींना वाटलं असेल !

पण त्यांना या मनःस्थितींत फार वेळ रहावं लागलं नाहीं. गाडी थांबतांच एकदम जिकडे तिकडे गडबड सुरू झाली. आपल्या या दुःखी भागिनींचं स्वागत करून त्यांना सर्व प्रकारचं सहाय्य करण्याच्या विचारानं प्लॅट-फॉर्मवर जमलेल्या स्वयंसेविका आणि शाळा—कॉलेजांतील विद्यार्थिनी

धांवून गाडीकडे गेल्या आणि मोठ्या सहानुभूतीनं त्यांनीं त्यांना गाडीं-तून बाहेर आणलं. जमलेल्या लोकांत या आलेल्या स्त्रियांचे कितीतरी नातेवाईक आणि परिचित लोक होते. ते चट्‌कन पुढें धांवले आणि त्यांनीं आपल्या बायांचा शोध चालवला.

ती देखील त्या जमावाकडे आशाळभूत नजरेनें पाहात गाडीखाली उभी राहिली. पुन्हां पुन्हा डोळ्यांत उभ्या राहणाऱ्या अश्रूंना अंगा-वरच्या ओढणीनं पुसून ती धुंदावलेल्या दृष्टीनें इकडे तिकडे पाहत होती. पिताजी, भय्या किंवा भाबी यांपैकीं कुणी तरी नक्कीच आलं असावं अशी तिची कल्पना होती, आणखी कोणीं नाहीं आलं तरी निदान लहनासिंग खात्रीनं येईल याबद्दल तिला शंकाच नव्हती. तिचा प्रियकर लहना?—त्याच्या करितांच तर ती आजून जिवंत राहिली होती.

तिनें समोर पाहिलं. कित्येक मातांनीं आपल्या मुलींना पोटाशीं आवळून धरलं होतं आणि दोघी सारख्या रडत होत्या, तर कित्येकींचे पिता पोटाशीं धरलेल्या मुलींच्या पाठींवरून मूक रुदन करित हात फिर-वींत होते. डाव्या हातांनीं छातीशीं घट्ट आंवळून कित्येक पति आपल्या पत्नीचे उजव्या हातानें डोळे पुशीत स्वतःचें अश्रु आवरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते, आणि दोनचार बालक कितीतरी दिवसांनीं पुन्हा दिसलेल्या आपल्या मातांच्या वक्षस्थलांत आपलं डोकं लपविण्याकरितां धडपडत होते—पण आपल्याकडे मात्र कोणीच कसं येत नाहीं? लहना—लहनासिंग,—कुठें आहेस तूं? ये रे ये, ही पहा मी इथें उभी आहे.

आणि शेवटीं अधीर होऊन तिनें खरंच मोठ्यानं हांका मारायला सुरवात केली. 'लहना—लहनासिंग—'

तीनचार वेळां हांका मारूनही तिला प्रत्युत्तर मिळालं नाहीं. तिचा जीव कासावीस झाला. आवाजांत जोर उरला नाहीं. आणि ती मट्‌कन् खाली बसली. 'आपलं कोणी नाहीं—या इथं इतके लोक जमले आहेत. पण त्यापैकीं आपलं मात्र कोणी नाहीं'—या जाणिवेनं तिच्या डोळ्यापुढें अंधारी आली. शेजारची गाडी, प्लॅटफॉर्म, सारं स्टेशन, एकदम गर-

गर फिरूं लागलं आहे असं तिला वाटलं, आणि स्वतःला सावरण्याकरितां तिनें भुईवर हात टेकला. जसं कांहीं जमीन पकडल्यानं तिला येणारी घेरी थांबणार होती! इतक्यांत कुणीतरी आपल्या पाठीवर मायेनं हात ठेवल्याचं तिला जाणवलं, आणि सहानुभूतीनं उच्चारलेले शब्द ऐकूं आले—' बेहेन !—'

तिनें वर पाहिलं. खादीची शुभ्र साडी नेसलेली एक तरुण मुलगी वांकून तिच्या शेजारीं उभी होती आणि मायेनं तिच्या पाठीवर हात फिरवीत होती. त्या स्पर्शांत तिला कमालीचा जिव्हाळा जाणवला. ज्या सहानुभूतीच्या स्पर्शाकरितां आज ती कित्येक दिवसांपासून तळमळत होती, तो स्पर्श लाभल्यानं या क्षणीं तिला आनंद वाटत होता. किती तरी क्षण ती त्या प्रेमळ मूर्तीकडे पाहतच राहिली. पण तिनें तिला जास्त वेळ तसं पाहूं दिलं नाहीं. किंचित् तिचा खांदा हालवीत त्या स्वयंसेविकेनं अत्यंत मृदु स्वरांत तिला विचारलं ' बेहेन, क्या आपको लेने कोई नहीं आया ? '

आशाळभूत नजरेनं तिनें पुन्हा एकदां चोहोंकडे दृष्टि फिरवली. पण ओळखीचं असं तिला कोणीच दिसलं नाहीं. " लहनासिंगखात्रीनं तो तिला विसरला, नाहींतर तिला घ्यायला नसता का आला तो ? पण आपण आज येणार हें त्याला माहीतच नसलं तर! पण मग हे इतके लोक आलेत त्यांना कसं माहीत होतं! नाहीं, नाहीं, तो आतां आपल्याला भेटणार नाहीं. आपल्या माथ्यावर कलंकाचा एवढा मोठा टिळा लागला असतांना आतां तो आपल्याकडे पहायला तरी तयार होईल का ? किती वेडी मी ! तो येईल अशी उगाच आशा धरून बसलें होतें " या विचाराबरोबरच न कळत तिनें एक दीर्घ निश्वास सोडला. मग तिच्या लक्षांत आलं कीं, मायेनं आपल्या खांद्यांवर हात ठेवून उभ्या असलेल्या त्या प्रेमळ मूर्तीनं आपल्याला कांहींतरी प्रश्न विचारला असून आपण अजून त्याचं उत्तर दिलेलं नाहीं. म्हणून ती तोंड वळवून असहाय नजरेनं त्या स्वयंसेविकेकडे पाहूं लागली. तिलाही तिच्या प्रश्नाचं उत्तर हवं होतं असं नाहीं, तिनें तें ओळखलंच होतं

पुन्हा कांहीं न विचारतां तिनें तिचा हात धरला आणि हळूहळू ती तिला स्टेशनच्या बाहेर घेऊन गेली.

बाहेर बंद मोटारगाड्या उभ्या होत्या. त्या बहुतेक भरल्या होत्या. ज्यांचे नातेवाईक आले होते ते आपल्या बायांना घेऊन गेले. पण ज्यांना कोणीच न्यायला आलं नाहीं अशा कितीतरी अभागिनी त्या मोटारींत बसल्या होत्या. त्यांतल्याच एका मोटारींत तिला नेऊन बसवण्यांत आलं आणि लगेच मोटार सुरू झाली.

गाडींत बसल्यावर तिनें पाहिलं. तिच्या बरोबरच आलेल्या होत्या त्या! एकंदरींत जगाच्या बाजारांत आज इतके प्राणी निकामी ठरले तर? मग हे निकामी जिव जगवताहेत कशाला? पट्कन् मोटारींतून उडी मारावी असा एक विचार तिच्या मनांत येऊन गेला आणि मग त्याच बरोबर दुसरा विचार आला कीं, एकाहून एक भयंकर प्रसंग आपल्यावर ओढवले असतांना आपण त्या वेळीं मरणाचा विचार का केला नाहीं? कां म्हणून जगलों आपण आतांपर्यंत? लहना—लहनासिंग! हो, लहनासिंगची ओढ आपल्याला मरूं देत नव्हती. तो पुन्हा आपल्याला भेटेल. आपण आपलीं सुखस्वप्नं खरी करूं शकूं—याच आशेनं आपण आजवर आपला जीव जगवला. पण तें सारं संपलं. आतां जगण्यासारखं आपल्याजवळ कांहींच उरलं नाहीं. मग आतां कशाला जगायचं! पण निदान त्या वेळीं तरी तिला मोटारींतून उडी घेतां आली नाहीं. मोटारी कॅंप जवळ येऊन उभ्या राहिल्या.

शरणार्थी लोकांचे केवढे विशाल कॅंप ते! हे एवढे लोक कसे, कोठून आणि कोणीं आणले याची माहिती वर्तमान पत्रांतून वाचायला मिळत असली तरी तो अफाट जनसमूह प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिला म्हणजे मन थक्क होऊन जातं. विपत्ति, दैन्य, दुःख, यांनीं जसा कांहीं प्रत्यक्ष अवतारच धारण केला होता. आजार, बाळंतपणं, लहान मुलांचे मृत्यु, वृद्धांचं विव्हळणं हें सर्व पाहून वाटे, कां हें सारं त्यांच्यावर ओढवलं? कोणत्या अपराधाचं हें भयंकर शासन तें भोगीत होते? 'भारतवासी' हाच त्यांचा सर्वांत मोठा अपराध! पण या केलेल्या चुकांचं परिमार्जनही सरकाराकडून अत्यंत दक्षतेनें होत असलेलं दिसून

येत होतं. एखाद्या लहानशा समारंभाची व्यवस्था करतांना नाकीं नव येतात. पण या लक्षावधि लोकांची शक्य ती व्यवस्था करण्याचे आटोकाट प्रयत्न होत असलेले दिसून येत होते. साधारण का काम होतं हें! शरणार्थी लोकांना पुरवलेल्या निव्वळ कांबळीं आणि रजायांचा जरी ढीग एकत्र केला तरी तो एवढा मोठा डोंगर झाला असता कीं, तो माणसाला उल्लंघतां आला नसता.

पण या अपहृत स्त्रियांची व्यवस्था त्या मोठया कँपमधून न करतां स्वतंत्र घेतलेल्या एका मोठया थोरल्या बिल्डिंगमध्यें करण्यांत आली. तिथें त्यांची उत्तम व्यवस्था ठेवण्यांत आली. सारं जग आपल्याकडे तिरस्कारानं पाहील. समाजाचा कलंक म्हणून आपला उल्लेख केला जाईल-अशी जी तिला भीति वाटत होती ती निराधार ठरली. सुचेता कृपालानी, रामेश्वरी नेहरू, राजकुमारी अमृतकुंवर आणि इतर किती तरी देशसेविका तिच्याकडे चौकशीला येत, तिचं नांव, गांव, वगैरे विचारीत आणि तिच्या मंडळींचा शोध लावीत आहोंत असं तिला आश्वासन देत. ती नियमानं वर्तमान पत्रांतील शरणार्थी लोकांसंबंधीं बातम्या वाचायची, रेडियो ऐकायची, पण तिला हवी असलेली माहिती कुठेंच सांपडत नव्हती.

दिवसामागून दिवस जात होते, पण तिला कोणाचाच शोध लागत नव्हता. शेवटीं एक दिवस तिला खात्याकडून बातमी मिळाली, तिचा लहनासिंग लाहोरहून अमृतसरला जात असतांना गाडींत मारला गेला. लहना गेला! ज्याच्या करितां इतक्या हाल अपेष्टांतूनही आपण आपला जीव जगवला तो आपला लहनासिंग आपल्याला सोडून गेला! मग आतां आपण तरी कशाला जगायचं! कुणाकरितां जगायचं! सहज प्राण कसा देतां येईल याचा ती विचार करूं लागली. पण तिचीही मनःस्थिति व्यवस्थापिकेच्या लक्षांत आली होती. ती अगदीं बारकाईनें तिच्यावर लक्ष ठेवीत असे. त्यामुळें तिला हवी ती संधि सांपडत नव्हती. शेवटीं एके दिवशीं ती व्यवस्थापिका तिला आपल्या खोलींत घेऊन गेली. अंथरलेल्या सतरंजीवर तिला आपल्या शेजारीं बसवून घेऊन अत्यंत कनवाळू स्वरानें ती म्हणाली, "बेहेन, तुझी सारी माहिती मला मिळाली आहे. तूं ज्या नरकयातना भोगल्या आहेस त्यांची मला

कल्पना आहे. तुझ्या सारख्या सुकुमावर मुलीला इतके भयंकर कष्ट सोसावे लागले हें ऐकून दगडाला देखील पाझर फुटेल. पण वेहेन, केवळ एवढ्यामुळेंच तू आपल्या जिवाचं कांहीं बरं वाईट करावंस हें मला पटत नाहीं. जगांत अनेक दु:ख आहेत त्याचप्रमाणें तीं भोगणारी माणसं देखील अनेक आहेत. पण दु:खांना भिऊन आत्मघात करायचं ठरवलं तर मग जीवनाचा अर्थच काय ? दु:खांशीं झुंजत जगण्यातच खरं महत्त्व आहे. दु:खांच्या झळीनंच जीवनांचं आकर्षण वाढत असतं. तुझ्यापुढं केवढं मोठं आयुष्य आहे ! तें पुन्हा सुफलित कर. करपलेली बाग पुन्हा लावतात तसं ! अशी निराश होऊं नकोस आणि आत्म-हत्येचा विचार तर चुकून मनांत आणूं नकोस. अशी पदर पसरून मी तुझ्याजवळ भिक्षा मागतें. ”

ती कांहीं बोलली नाहीं. पण तिच्या मनांत तुफान उसळलं. जग-ण्याचा ज्याप्रमाणें आपल्याला अधिकार नाहीं त्याप्रमाणें मरणाचा तरी आपल्याला काय अधिकार आहे ? आपण स्वत: होऊन असं काय केलं——जाणूनबुजून असं कोणतं पाप केलं–म्हणून आपण आत्मघात करावा ! पण लहनासिंग ! त्याच्यावांचून कसं जगायचं ! यावर तिचं तिलाच हसूं आलं. आजपर्यंत आपलीं अत्यंत आवडती अशीं किती तरी माणसं गेलीं. त्याही वेळेस आपल्याला असंच वाटलं होतं. पण कालांतरानें आपण तें दु:ख विसरूं शकलों. प्रेम नाहीं विसरतां येणार, पण प्रेमभंगाचा दु:ख तर खात्रीनं कमी होत जाईल. आणि इतकं सारं आपल्या जीवनांत घडून आल्यावर भावनांचे हे नाजुक चाळे आपण चालूं तरी कशाला द्यायचे ! हो, अगदीं भावनाशून्य जीवन, अर्थ विरहीत जीवन ! जगायचंच झालं तर प्रवाहपतिताप्रमाणें पाण्याच्या भोंवऱ्यांत सांपडलेल्या माणसानें करायचं तरी काय दुसरं ! झंझावातानें उडत सुटलेल्या पाचोळ्यानं कुठल्याजागीं जाऊन थांबायचं. ध्येय आपल्या उराशीं बाळगायचं असतं ! पाहूं या आणखी जीवनांत काय काय घडतं तें !

आणि तिचा जगण्याचा मोह वाढत चालला. कल्पनातीत प्रसंग ओढवल्यानें पुढें काय होतं हें पाहण्याइतकं आतां तिचं मन तयार झालं

होतं. भविष्याविषयींच्या उत्सुकतेनें ती जगायला तयार झाली. आणि एक दिवस एक गंमत घडून आली.

आश्रमांत कांहीं तरुण लोक आले होते. वर्तमानपत्रांतून आणि जाहीर व्याख्यानांतून केलेल्या प्रचाराचा आणि विनंतीचा तो परिणाम होता. कांहीं एक अपराध नसतांना भरलेल्या संसारांतून उचलून नेऊन भ्रष्टलेल्या स्त्रियांच्या उद्धाराकरितां तें तरुण तिथें आले होते. राजकारणांतल्या उलटसुलट डावपेंचाला बळी पडलेल्या त्या असहाय अबलांना शक्य ती मदत करण्याच्या ध्येयानें प्रेरित होऊन ते तरुण धांवून आले होते. शीलभ्रष्ट स्त्री म्हणजे मातीसमान असं मानणाऱ्या हिंदु समाजांत जन्म घेऊन देखील प्राप्त परिस्थितींत योग्य मार्ग काढून या मृतवत् स्त्रियांचं जीवन पुन्हा सुफलित करण्याचं कंकण त्या तरुणांनीं बांधलं होतं. अंगिकारलेल्या ध्येयाचं तेज त्या तरुणांच्या चेहऱ्यांवर फांकलं होतं. त्यांतल्याच एकाकडे तिचं लक्ष गेलं आणि एकदम दचकली. लहनासिंग तर नाहीं तो ? तेवढीच उंची, तसलंच भव्य कपाळ, भुरुभुरु उडणारे किंचित् पिंगट केस देखील अगदीं सारखेच आणि डोळे ते तर जसे कांहीं आपल्याच शोधांत गुंतले असून आपण दिसत नाहीं म्हणून निराशा आणि करुणा यांनीं भरून आल्यासारखे दिसताहेत ! लहनासिंग—लहना—नाहीं तो लहनासिंग नाहीं. एवढं आपलं भाग्य कुठलं घड असायला !

आणि याच वेळीं त्या तरुणाची देखील तिच्याकडे दृष्टि वळली. तिला पाहतांच त्याच्या चेहऱ्यावरील भाव झरझर बदलत गेले. कितीतरी वेळ तो सारखा तिच्याकडे पाहत होता. त्यानें असंच पाहत रहावं असं तिला देखील वाटत होतं. पण असं पाहणं चांगलं नव्हे हें लक्षांत येऊनच कीं काय त्यानें आपली नजर दुसरीकडे वळवली आणि तो परत फिरला. जातांना तो पायांना जसा कांहीं ओढून नेत आहे हें कोणाच्याहि लक्षांत आलं असतं. तो निघून गेल्यानं तिला देखील अगदीं एकट्या एकट्यासारखं वाटूं लागलं. ती चटकन् जागेवरून उठली नाहीं. मनाचे आतां कुठलेच लाड पुरवायचे नाहींत असंच ती ठरवीत असावी.

दुपारीं मुख्य व्यवस्थापिकेनें तिच्या जवळ तिच्या लग्नाविषयीं गोष्ट काढून पाहिली. लग्न–किती आश्चर्य वाटलं तिला तो शब्द ऐकून ! केवळ सहा महिने रावणाकडे रहावं लागल्यानं संसारांतून परित्यक्त केलेली सीता ज्या समाजांत जन्माला आली त्याच समाजांत जन्माला येऊन आणि आपल्या भ्रष्ट जीवनाचा इतिहास आपल्या कपाळावर लिहिला असून देखील आपलं लग्न होणार ! हंसावं कीं रडावं तेंच तिला कळेना. उगाच कोणाला फसवून आपलं लग्न व्हावं असं तिला वाटेना. आणि आपली खरी माहिती कळल्यावर आपल्याशीं लग्न करा-यला कोणी तयार होईल यावर तिचा विश्वास बसेना. हिंदु समाजाच्या नादानीची तिला नव्यानें ओळख व्हायची नव्हती. जन्मापासून ती त्याला ओळखीत होती. हिंदु समाज जर इतका उदार असता तर आज दरवर्षाला हजारों भगिनींना वेश्याव्यवसाय पत्करावा लागला नसता आणि लाखो असहाय अबलांना जबरदस्तीनें कां होईना पण परक्या धर्माला कवटाळून जीवन रखडण्याची पाळी आली नसती.

तिनें व्यवस्थापिकेला कांहींच उत्तर दिलं नाहीं. तिच्या मनांत विचारांची वावटळ उसळली होती. तिला आपलं बालपण आठवत होतं, शाळेंतलं जीवन आठवत होतं, तरुणपण आठवत होतं आणि लहनासिंगबरोबर घालवलेले प्रेमप्रसंग डोळ्यांपुढें उभे राहात होते. त्या दोघांचं लौकरच लग्न होणार होतं, पण पंजाबची फाळणी झाली आणि लग्नाऐवजीं त्या नरपशुंनीं आपल्या देहाचे केलेलें अनन्वित हाल तिच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. तिला घेरी आल्यासारखं वाटलं–तिनें शेजा-रचा कठडा घट्ट धरला. आयुष्यांत हें सारं झालं असतांना आतां लग्न ! किती अशक्य, अगदीं असंभव्य !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं व्यवस्थापिकेनें तिला आपल्या ऑफिसरूम-मध्यें बोलावणं पाठवलं. ती तिथें जातांच बाईनीं प्रश्न टाकला, “एक तरुण गृहस्थ तुझ्याशीं लग्न करूं इच्छितात. त्यांना तुझी सारी खरी हकीकत सांगितली आहे. तरी ते लग्नाला तयार आहेत. तुझं काय म्हणणं आहे ?”

ती टकमक पाहतच राहिली. कांहीं क्षण तिला तें खरंच वाटेना. पण बाईनीं पुन्हा विचारलं तेव्हां ती म्हणाली, 'त्यांना मी परवडत असेन तर माझी हरकत नाहीं.'

बाईनीं बाहेर थांबलेल्या त्या तरुणाला आंत पाठविण्याविषयीं नोकराला सांगितलं. औदार्याचा आगर हा तरुण आहे तरी कसा हें पाहण्याकरितां तिचे डोळे उत्सुक झाले आणि याच वेळीं दार बाजूला लोटीत तो तरुण समोर येऊन उभा राहिला. तिनें डोळे उंच करून पाहिलं. तोच तो! काल सकाळीं पाहिलेलाच तरुण तिच्या समोर उभा होता. त्या ध्येयनिष्ठ उदार तरुणाच्या पायांवर डोकं ठेवावं असं तिला वाटलं. पण तसं करण्याचा तिला धीर झाला नाहीं. तिचे डोळे भरून आले, अश्रु गळूं लागले. तिचं मन त्या तरुणाला उद्देशून म्हणत होतं, 'पुढें सरका न् म्हणजे हे अश्रु तुमचे पवित्र पाय धुऊन काढतील.'

लौकरचाच मुहूर्त ठरला आणि आर्यसमाजांत वैदिक पद्धतीनं त्या दोघांचा विवाह झाला. तिच्या जीवनाचं नवं चित्र तयार होऊं लागलं आणि तें अत्यंत सुंदर रंगांनीं रंगविण्याचा तिनें मनाशीं निश्चय केला. पण—

लग्नाच्या दिवशीं सकाळपासूनच तिचा जीव घाबरत होता. तिला चमत्कारिक वाटत होतं. मधूनच डोळ्यांपुढें अंधारी येई. मळमळूं लागे आणि झोक जातोसा वाटे. जेमतेम विवाहसंस्कार पार पडला. आणि दुपारीं घरा शेजारींच असलेल्या एका लेडी डॉक्टरकडे ती प्रकृति दाखवायला गेली. नीट तपासून तिच्या प्रकृती विषयीं डॉक्टरनें जें काय निदान केलं तें ऐकून तिच्या पोटांत एकदम धस्स झालं. काय करावं तें तिला सुचेना. तशीच ती घरीं आली आणि तिनें धाडकन् बिछान्यावर अंग टाकलं. सभोंवतीं तिला तिचा नूतन संसार मांडलेला दिसत होता. सुंदर रंगांनीं तो सजवण्याला ती आतुर झालेली होती, पण ते सारे रंग आतां फिक्कट होत चालले आहेत असं तिला वाटूं लागलं. हात धुऊन मागें लागलेल्या आपल्या दुर्दैवाचे ते अमानुष खेळ पाहून तिच्या हृदयानें ठाव सोडला. उशींत तोंड खुपसून ती रडूं लागली.

पत्नीची ती विकलांग अवस्था पाहून त्या तरुणालाही भीति वाटूं लागली. एकदम हें असं काय झालं हें त्याच्याही लक्षांत येईना. चट्कन् पुढें होऊन त्यानें मायेनें तिच्या पाठीवर हात ठेवला. त्याचा तो मायाळू स्पर्श होतांच ती ताड्कन् उठून बाजूला झाली. तिचा सारा देह थरथर कांपत होता आणि रडून रडून डोळे सुजल्यासारखे दिसत होते. त्याला आपल्याजवळ येताना पाहून ती म्हणाली, 'माझ्याजवळ येऊं नका. मला स्पर्श करूं नका. मी पापीणच नव्हे तर भयंकर दुर्दैवी आहे. उदारपणानें तुम्ही माझ्यासारख्या कुस्करलेल्या फुलाचा स्वीकार केला—पायदळीं तुडवलं जाणारं निर्माल्य ध्येयनिष्ठेनं हृदयाशीं धरलं—पण एवढ्यानेंही माझं दुर्भाग्य प्रसन्न होऊं शकलं नाहीं. कुस्करलेलं फूल, पण त्याच्या पोटीं भयंकर विषारी बीज आहे याची तुम्हांला काय कल्पना ! मला देखील नव्हती. नाहींतर मी तुम्हांला या नसत्या संकटांत टाकलंच नसतं. मला आतांच डॉक्टरनें सांगितलं, माझ्या पोटांत दोन महिन्यांचा गर्भ आहे !...नरपशूंचं बीज माझ्या पोटांत !—हें भयंकर हलाहल नऊ महिन्यांपर्यंत सांभाळून मी माता होणार !—आई ग !—'

ती धाड्कन् जमिनीवर पडली. तिची शुद्धि गेली होती. या प्रसंगानें तो देखील हतबुद्ध झाला. या प्रश्नाचा त्यानेंही विचार केला नव्हता. चार तासांपूर्वी अग्नि ब्राह्मणांसमोर जिचं पाणिग्रहण केलं तिच्या पोटीं असलं भयंकर विष फोंफावत असेल याची त्याला कल्पनाही नव्हती. त्याचं ध्येयनिष्ठ मन चळूं लागलं. पापाचं हें शल्य सारखं बोंचत असतांना आपण संसार सुखानं कसा साजरा करणार ! छे, नाहींच तें ! सरळ हिला सोडून चालतं व्हावं हेंच बरं !

त्याचे पाय दाराकडे वळले, पण अस्ताव्यस्त स्थितींत पडलेल्या तिच्याकडे दृष्टि जातांच त्याचं हृदय भरून आलं. यांत हिचा काय अपराध! आणि अपराध नाहीं तर मग तिला शिक्षा तरी कशाबद्दल ! काय करावं या अबलेनं पुढें ? आणि आपण आपल्या निष्पाप पत्नीला सोडून चाललों. लाजेनं त्याची मान खालीं वळली. चट्कन् तो मागें फिरला. अत्यंत मायेनें आणि प्रेमानें त्यानें तें दुर्दैवानें कुस्करलेलं फूल उचलून

पलंगावर ठेवलं आणि पाण्याचे हबके तोंडावर मारून तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न चालवला. त्याचं मन आतां शांत झालं होतं आणि आपल्या पत्नीचं मन कसं शांत होईल अशी त्याला एकच काळजी उरली होती. आपल्या मांडीवर तिचं डोकं घेऊन एका हातानें वारा घालीत दुसऱ्या हातानें हळूहळू तिचे केंस सांवरीत शांतपणानें तो बसला होता.

हळूहळू तिनें डोळे उघडले. ती पूर्ण शुद्धीवर आली आणि त्याच्या मांडीवर आपलं डोकं ठेवलेलं पाहून उठण्याचा प्रयत्न करूं लागली. पण त्यानें तिला उठूं दिलं नाहीं. अत्यंत प्रेमळ शब्दांत तो म्हणाला, "उठूं नकोस. आतां माझ्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करूं नकोस. ज्या पवित्र बंधनानं आपण बांधलें गेलों त्यांत येणाऱ्या सुखदुःखांचे आतां आपण समान वांटेकरी आहोंत. आणि ज्यांत तुझा काडीचाही अपराध नाहीं त्याबद्दल दुःख करण्याचं तुला तरी काय कारण! माणसानं आपला धर्म सोडला तरी निसर्ग आपला धर्म पाळणारच! एका रंगाच्या गुलाबावर दुसऱ्या रंगाच्या गुलाबाचे डोळे बांधून मनासारख्या गुलाबांची पैदास करणाऱ्या स्वार्थी मानवानं आतां असल्या प्रसंगांचं स्वागत करायला नको का तयार व्हायला?"

"पण, हें असलं भयंकर ओझं वाहत मी कशी जगूं? आणि तुमच्या पवित्र देहाला स्पर्श तरी कशी करूं? त्यापेक्षां आतां मेलेलंच—" चट्कन् तिच्या तोंडावर हात ठेवून तो म्हणाला, 'हें असलं चुकून देखील बोलायचं नाहीं.' हें म्हणतांना त्याचा आवाज घोगरा झाला होता आणि तें लक्षांत येऊन तिला त्याच्या कोमल अंतःकरणाची साक्ष पटली. तिला आणखी भडभडून आलं. कसं बसं ती म्हणाली, 'पण सहन होत नाहीं हें! निदान हा जीव जन्माला आल्यावर त्याची विल्हेवाट लावल्याशिवाय मला तुमच्या सहवासांत राहतां येत नाहीं!' ती हुंदका देऊन रडूं लागली. तिच्या थरथरत्या शरिरावरून ममतेनं हात फिरवीत तो शांतपणानें म्हणाला, "तूं आतां कुठलाच विचार करूं नकोस. शांत हो अगदीं. ही असली चूक कुंतीनें केली होती म्हणून कर्णासारखा महारथी शत्रु पक्षाला जाऊन मिळाला. ही चूक बंगालनें केली आणि आपल्या सुपुत्रांना परके मानून आज त्या सुजलां-सुफलां भूमीचे दोन

तुकडे पाडले. याच चुकीनें आर्यांच्या या भारत वर्षात अकरा कोटि मुसलमान जन्माला घालून भारताचे दोन तुकडे पाडले. मुसलमान कांहीं अरबस्तानांतून आले नाहींत. इथेंच जन्मले, इथेंच वाढले आणि आपल्या चुकीच्या व्यवहारानें आपण मात्र आपल्या मातृभूमीची खांडोळीं केलीं पुरे झाल्या या चुका ! तुझं बाळ तें माझं बाळ !!! आपलं बाळ ! शांत हो, जिवाचा असा त्रागा करूं नकोस."

अत्यंत प्रेमानं त्यानें तिच्या अश्रूंनीं न्हालेल्या मुखावर आपले ओंठ टेंकले. जसे कांहीं दंवानें डंवरलेल्या फुलांवर पडलेलें सूर्य किरणच ! तिला वाटलं या औदार्याच्या मूर्तीचे पाय घट्ट धरून ते अश्रूंनीं धुवून काढावे. पण पाय दूर होते. ती त्याच्या हृदयावर होती. आणि तो तिला हालूं देत नव्हता.

प्रेमानें ओथंबलेल्या तिच्या डोळ्यांत स्वतःचं प्रतिबिंब पाहत पति म्हणाला, 'आपण आपल्या बाळाचं नांव कर्ण ठेवूं—करणसिंग !'

आणि त्याचा हात आपल्या गालावर दाबून धरीत पत्नी उत्तरली, 'जशी आपली इच्छा !'

राजीं ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३०/३८०
विभाग कां. वा.
क्रमांक २८९६
नों. दि. ११/७/५९

[या संग्रहांतील सर्व कथांची पूर्वप्रसिद्धी 'वाङ्मय-शोभा' मासिक]

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय
वा. क्र. २९९६ नों. दि.
वि. ....का. वा. क्र. ...
IRBK-0102996
IRBK-0102996